# भूतेश आख्यान परिचय.

इंदिरा प्रेसचे मालक रा. त्रिंबकराव आवटे यांनीं भूतेश आख्यानाची पोथी मला वाचण्यास दिली ती दौंडाजवळील मांडवगण येथील देशमुखांच्या घरची असून त्यांच्या घराण्यांत तिचें पठण अद्यापपर्यंत चालू आहे. त्यांत या घराण्यास देशमुखी कशी मिळाली याची आख्यायिका ग्रथित केलेली आहे. या ग्रंथाचे अध्याय ११ असून ओव्यांची संख्या १४४२ आहे. त्यांत वर्णिलेला प्रसंग बहिरी निजामशहाच्या वेळचा म्हणजे स्वराज्यस्थापनेपूर्वी शंभरवर्षांच्या सुमाराचा आहे. बहुतेक देसाई व देशमुख यांची उत्पत्ति दक्षिणेंत मुसलमान आल्यानंतर झाली; निदान त्यापूर्वीचा उल्लेख त्यांच्या संग्रहीं असलेल्या कागदपत्रांत अप्रत्यक्ष रीतीनेंहि आढळत नाहीं असें मला चारपांच देशमुखांचीं दप्तरें चाळून वाटलें होतें; तेंच मत या ग्रंथांतील आख्यायिकेनें खरें ठरतें. प्रस्तुत ग्रंथाचा रचनाकाळ श्रावण व. ३ सोमवार असा दिला आहे; परंतु त्यावरून वर्ष ठरवितां येत नाहीं. तथापि तो शिवकालीन नाहीं व इंग्रजीपूर्वींचा आहे असें त्यांतील भाषेवरून दिसतें. अक्षरांपैकीं अ आणि ण यांचीं वळणें जुन्या पद्धतीचीं (अ, ण आहेत.) मजकुराच्या दृष्टीनें त्यांतील कांहीं भाग महत्त्वाचा आहे. बहिरी निजामशहाच्या वेळीं हिंदु लोकांच्या राजकीय भावना कशा प्रकारच्या असत, त्यांच्या आकांक्षा किती संकुचित स्वरूपाच्या होत्या, बादशहाची सेवा करण्यांत व वतनें मिळविण्यांत किती थोरपणा मानीत, सामाजिक चालीरीति काय होत्या, वगैरेसंबंधींचें ठिकठिकाणीं चांगलें वर्णन आलें आहे. बाकी मळोजीच्या अद्भुत शक्तीचे मासले यांत वर्णिले आहेत ते बहुतेकांच्या ऐकण्यांतले आहेत. स्त्रियांचें सौंदर्य सांगतांना ज्याप्रमाणें चंद्रास आणलेंच पाहिजे त्याप्रमाणें जुन्या लोकांच्या शक्तीचें प्रदर्शन ऐकावयाचें म्हणजे खांब उचलून त्या खालीं बैटक अडकविणें, घोडे उचलून ठेवणें वगैरे गोष्टी यावयाच्याच. पण त्या वाचण्यास मिळण्याची सोय या ग्रंथांत आहे.

एकदां असुरांनीं देवांचा पराजय करून त्यांच्यावर वनावनांत लपून रहाण्याचा प्रसंग आणला, तेव्हां इंद्र (बृहस्पतीच्या सांगण्यावरून) ऋषि व देव

यांसह महादेवास शरण गेला. शंकरानें प्रसन्न होऊन चौकशी केली तेव्हां देव म्हणाले, " बळें घेतली आमरपुरी ॥ समस्ता घातले बाहेरी ॥ सुखों क्रीडती पृथ्वी माझारी ॥ गांजिती सर्व जनां " १–२१. नंतर शंकरानें आसुरांचा पराभव करून काशीवास पत्करला. पुढें मांडव्यऋषीनें तपश्चर्या करून त्यांना काशीहून मांडवगणास आणलें. हा ऋषि साळी पिकवून रोज मांडवगणाहून काशीस साळीचें पक्वान्न पोंचवीत असे. ही त्याची भक्ति पाहून " मीच तुझ्या ठिकाणास येतों " असें सांब म्हणाला; आणि शेषाद्रिपर्वताच्या पाठारीं तो प्रगट झाला.

अशा रीतीनें काशींत राहणारा देव मांडव्यक्षेत्रांत येऊन राहिल्यानंतर तो भूतरायास प्रसन्न होऊन जी कथा घडली ती यापुढें सांगितली आहे. पूर्वी या गांवास हेमपुरी असें नांव होतें; तें मांडव्यापासून मांडव्यक्षेत्र असें पडलें. त्या गांवाची मांडणी फार पाहण्याजोगी होती. भोंवतीं चौफेर परीघ असून त्यावर ध्वजा फडकत व ठिकठिकाणीं सुंदर चौक असून शहराची शोभा अमरावतीप्रमाणें होती. राजा शंकरभक्त असल्यामुळें शहरांतील सर्व लोकहि शिवध्यानांत मग्न असत. शिवाय " शूद्र वैश्य क्षेत्री ब्राह्मण ॥ आणीक याती नाना वर्ण ॥ तितुकियासी दंड करून ॥ शिवभजनीं लावितसे ॥ १–६० ॥ या शहराबाहेर राजाचा अंमल किती होता व तो प्रांत त्यास कसा मिळाला याचें वर्णन असें:—

त्रिंबक घोडप आदिकरून ॥ सत्ताविस गड राया स्वाधीन ॥ पातशाहि यख्त्यारी संपूर्ण ॥ यालागीं हवाला असे ॥ ६२ ॥ स्वाधीन कराया हेंचि कारण ॥ हे भूतराय प्रतापें करून ॥ दिल्हे पातशहासी घेऊन ॥ म्हणोनि हा गडपति॥६३॥ भूतरावो नामो धारण ॥ ठेवावया एकां कारण ॥ पीतयानें भूतेशा आराधून ॥ हा पुत्र मागीतला ॥ ६४ ॥ पूर्वीचाच पातशाही उमा [ म ? ] राव ॥ आसेजी हा भूतेशराव ॥ प्रताप आगळा शूरत्व ॥ प्रत्यक्ष रणसूर ॥ ६५ ॥ बेदरी प्रतिज्ञा बोलुन ॥ विडा पैजेचा उचलून ॥ निशिमाजि शिवनेरी घेउन ॥ दिधलि त्यासि ॥ ६६ ॥ पाहुनि सुखपूर्ण ॥ ग्रामदेश उत्तमस्थान ॥ अर्पिली होति राजियान ॥ दक्षिणेच्या ॥ ६७–१ ॥

स्वामिसेवा करीत, ईश्वरभजन करीत आणि नेमधर्म चालवीत तो राजा आपल्या स्थानीं स्वस्थ होता. एकदां सोमवारी एकादशीनिमित्त शिवालयांत अप्रतिम कीर्तन झालें. तें ऐकण्यास हा राजा व सर्व लोक गेले असतां सर्व लोकांना संतोष झाला. पण राजा मात्र दुःखित अंतःकरणानें परत आला. तेव्हां राणीनें दुःखाचें कारण विचारलें; त्यांत "कोन्ही परचक्र येऊन ॥ त्यानें केलें ग्रामदेश हानन ॥ म्हणोनि आले जी वर्तमान ॥ या लागि दुःखित ॥९३॥" असा एक प्रश्न होता. परंतु भूतेश म्हणाला "पूर्वी हरीनें हिमालयांत जाऊन मोठी तपश्चर्या केली व शंकरास प्रसन्न करून घेऊन आपल्या पोटीं मदन जन्मला पाहिजे असा वर घेतला; आणि त्यानंतर रुक्मिणीस मदन हा मुलगा झाला. त्याचप्रमाणें आपणास मूल नाहीं यामुळें मला वाईट वाटतें. राणी म्हणाली तुम्हाला वृद्धपण प्राप्त झालें; आतां मूल कसें होणार! तथापि तुम्ही विश्वनाथाची आराधना केल्यास तो मनोरथ पुरवील."

भुतेशराजास ही गोष्ट पटली. शिवालयांत जाऊन नवस करून तो 'म्हणे स्वामि तुं त्रिनेत्र ॥ मज द्यावे दोन पुत्र ॥ तुज वाहीन उभय नेत्र ॥ सत्य सत्य ही त्रिवाचा ॥२॥' नंतर त्यानें पूजा आरंभली ती अशी "मांडवगणापासुन योजन दुर ॥ पश्चमेस असे सिंगणापूर ॥ तेथें आसे एक कासार ॥ शिवाळे नाम तया ॥२२॥ ते तिर्थ महा पुण्यपावन ॥ तया माजी करी तो स्नान ॥ महा पातके जाति हरोन ॥ जन्मोजन्मींचीं ॥२३॥ आसे पर्वत पाठारि ॥ भयानक महावन घोरी ॥ तेथे लिंग स्थापना बरी ॥ केली आसे सींगण राजे ॥२४॥ तया कासारि आसे कमळणि ॥ हे ऐकुनी राये श्रवणि ॥ आपणाचि स्वये जाउनी ॥ तया पर्वता ॥२५॥ तया तिर्थि करूनि स्नान ॥ तिर्थाच्या उदकें घट भरूण ॥ करावया शिवाचें पूजन ॥ दृढभावें घेइ राजा ॥२६॥

राजाप्रमाणें राणीनेंही वनवास पत्करून घोर तपश्चर्या आरंभली. तेव्हां शंकरानें राजाची परीक्षा पाहाण्यासाठीं वाघाचें रूप घेऊन त्यास भेवडावण्याचा प्रयत्न केला. पण राजाला सर्वच ठिकाणीं शंकराची भावना असल्यामुळें त्यानें त्या वाघास न भितां नमस्कार केला. तेव्हां वाघ गुप्त झाला. नंतर बारा वर्षे तपश्चर्या झाल्यावर शंकरानें प्रसन्न होऊन वर दिला तो असा "तुज ऐसेंच दीधले पुत्रनिधान ॥ जो माझा मल्यादि प्रियेगण ॥ तोचि येयील तव उदरा ॥२४॥ त्याचीये बळापुढें ॥ देव दानव ते बापुडे ॥ परि किंचित् प्रताप जणापुढें ॥

दात्रील आपुला ॥२५॥ पुरविन तुमची आशा ॥ सर्वेच नेयीन कैलासा ॥ तुज दोन पुत्र दिधले नरेशा ॥ ते ऐक कैसे ॥२६॥ येक प्रतापी होइल ॥ एक मानव रूपे जन्मेल ॥ कल्याणदायक एक नांदेल ॥ एकच पुत्र तुझा ॥२७॥ एक निमित्यासि करण ॥ एकाचि वंशवृद्धी वाढवीन ॥ त्याचे करीन मी पाळण ॥ हा वर माझा ॥२८॥

नंतर शंकरानें सर्व देव जमले असतां आपल्या प्रियगणास आज्ञा केली कीं भीमेगोदेच्या मध्यभागीं ॥ मांडव्य स्थान प्रसिद्धजगीं ॥ तयाच्या येथें भक्तिलागीं ॥ आसे वो मी आक्षयीं ॥ १ ॥ तेथें भूतरायानें माझी सेवा केल्यामुळें त्याला पुत्र देईन असें वचन गेलें आहे. तेव्हां तूं त्याच्या पोटीं जन्मास ये. पुढें पस्तीस वर्षे झाली म्हणजे मी तुला कैलासास आणीन.

इकडे भूतराजाची राणी गर्भवती होऊन तिला मुलगा झाला त्याचें नांव मळोजी. पांचवें वर्षी त्याची मुंज केली. पुढें लग्न करावें असें वाटल्यावरून पुष्कळ मुली शोधल्या. शेवटीं सप्तश्रीरंग देशीच्या भूपतीची मुलगी पसंत पडून लग्नसमारंभ झाला. नंतर भूतरावानें कुटुंबानिशी जनस्थान, कुशावर्त, गंगाद्वार, त्रिंबकराज यांचें दर्शन घेऊन ब्रह्मगिरीची प्रदक्षिणा केली. तेव्हां ब्रह्मगिरीवर देव दगडाच्या रूपानें कां आहेत असा मळोजीनें प्रश्न केला. त्याचें उत्तर देतांना " एकदां ब्रह्मदेव यज्ञांत मोठी बायको सोडून धाकटीस पुण्याहवाचनास घेऊन बसला. तेव्हां मोठ्या बायकोनें सर्वच देवांना शाप दिला त्या योगानें त्यांना दगड, नदी वगैरे रूप आलें " ही गोष्ट भूतरावानें सांगितली. नंतर आपल्या गांवांत आल्यावर मळरायाचीं आणखी दोन लग्नें केलीं. मळराय सात वर्षाचा झाला तेव्हां भूतपतीची सेवा करून वळ मागून घ्यावें असें त्यास वाटलें.

नंतर मळोजीनें वेताळाची भक्ति करून कोणास न कळतां अहोरात्र तालीम केली. बारा वर्षे सेवा झाल्यावर वेताळ मनुष्यरूप घेऊन मळोजीबरोबर कुस्ती करूं लागला. एक दिवस आपण खालीं पडून वेताळानें मळोजीस पोटावर घेतला; मळोजीनें त्याच्या झिंज्या बळकटरीतीनें धरल्या. तेव्हां वेताळ म्हणाला ' तूं ज्याची भक्ति करतोस तो मीच आहें. ' नंतर मळोजीच्या मागण्यावरून वेताळानें आपलें स्वरूप दाखविलें. तेव्हां मळोजीनें ' मी सर्वांना आजिंक्य असावा ' असा वर मागून घेतला. तेव्हां भूतभैरवानें तीन ताईत

काढून मळोजीच्या दोन भुजांत दोन व एक मस्तकांत असे घातले व त्यामुळें तो आजिंक्य बनला.

पुढे एके रात्रीं मळोजीनें रानांत जाऊन गगनचुंबी वृक्ष उपटून टाकले; आणि त्या झाडांचा बागेभोंवतीं गराडा घातला. लोकांना आपल्या शक्तीची प्रचीति दाखविण्यासाठीं त्यानें हा प्रकार केला. सकाळीं लोकांनीं वृक्ष उपटलें गेल्याचें पाहिलें. तेव्हां त्यांना मोठें आश्चर्य वाटलें. व मारुतीचा अवतार कोठें तरी झाला असावा अशी त्यानीं अटकळ बांधली. रानाच्या वाटेनें मळोजी येतांना ज्यांनीं पाहिलें होतें, त्यानीं मळोजीचेंच हें काम असें ताडलें, पण इतरांना तें खरें वाटेना. पुढें त्या गांवावर परचक्रें आलीं. तेव्हां त्यांना एकट्यानें जिंकावें; त्यांची संपत्ति हिरून घरीं आणावी; मोठमोठ्या पहिलवानांचा अभिमान चालू देऊं नये असें मळोजीनें केलें. या वेळची राजकीय स्थिति अशी होती—

आविंश पातशाहा आमदानगरी ॥ दक्षिण देशीचे राज्य करी ॥ सैन्य असे लक्ष चारी त्याजपासि पैं ॥१७॥ बहिरि निजाम नाम साजे ॥ एक छत्रि करी राज्य ॥ धर्मनिती धर्मकाज ॥ चाले जो का ॥१८॥ योवनयाति आती दुष्ट जाण ॥ परि करि प्रजाचे पाळण ॥ त्याचे येथें असे ठाण ॥ मांडव्यगणी पै ॥१९॥ तयाचा सेवक एक निरंतर । असे येथें आमलदार । तयाते स्वहस्ते करभार ॥ वोपितसे राजा ॥२०॥ पूर्वी पातशाहि बेदर ॥ पुढे निर्मिले आमदानगर ॥ बहिरि निजाम निरंतर ॥ येथेच राज्य करी ॥२१॥ राज्य करि राजेंद्र ॥ म्हणवि दक्षणेचा इंद्र ॥ पक्षिया माजि खगेंद्र ॥ तैसा भूपाळा शिरोमणि ॥२२॥ ऐकोनि तयाचा दर्प शत्रु चळचळा कांपे ॥ सत्वरत्व करूनि समीप ॥ सेवा करूनि आसति ॥२३॥ कितियेक पराभविले देशांतरा ॥ वसति जाऊन गिरीकंदरा ॥ पडो नेदी तयाचा वारा ॥ ऐसे भये पळिती ॥२४॥ विशेष पाहून तयाचा प्रताप ॥ आवघे सेवक जाले भुप ॥ ऐसा तो प्रताप स्वरूप ॥ जन्मला म्लेंच्छ कुळीं ॥२५॥ परचक्राची संपत्ति ॥ मळोजीनें आणीली होती ॥ ती मागो लागली दुष्ट याति ॥ ग्रामातील आमलदार ॥२६॥

अमलदारांना झाडें कोणी उपटलीं याचा खरा ठिकाण लागला नव्हता व परचक्राची संपत्ति मळोजी हातीं देईना; तेव्हां अमलदारांनीं अर्जी लिहिली कीं, 'येथील उमयत भूतराव याच्या पोटीं एक बलाढ्य जेटी जन्मला आहे. तो प्रत्यक्ष काळ आहे, असा भासतो. तो सर्व पातशाही बुडवील; तुमचे निर्मूळ करील.

उमरावाच्या पोटीं जन्मला असून पातशाही त्याच्या खिजगणतींत नाहीं. पातशाही भोगीन असें तो म्हणत असल्याच्या गोष्टी आम्ही ऐकतों.' पत्रांतील मजकूर ऐकून निजामाचा 'चंद्र' उतरला; त्यानें उमरावांना "काय करावें" असा प्रश्न केला. तेव्हां रुस्तमखान वजीर म्हणाला "मी जेठी पाठवून त्याला आणवितों; तुम्ही धीर धरा." त्याप्रमाणें चौघे मल्ल तयार करून मांडवगणास पाठविले. ते मळोजीच्या घरीं गेले. तेव्हां प्रथम त्यांचे घोडे मळोजीनें उचलून पारावर ठेवले; आणि पुढें बोलतां बोलतां पायाच्या अंगठयानें त्यांच्या आंगरख्याचे दावण (म्हणजे घोळ) खांबाखालीं गुंतवला. त्यांना खाण्यास लोणी पावटे मिसळून दिले ते निसटून जात. त्यामुळें ते त्यांना खाता येईनात; पण मळोजीनें त्यांच्यासमोर बसून ते चुरून दाखविले. पुढें ते भेट देण्यासाठीं उठूं लागले तेव्हां दावण खांबाखालीं गुंतले होते! मळोजीनें आंगठयानें खांब उचलून दावण सोडविलें. नंतर त्यांना जेवण घालून बाहेर आणले. तों घोडे पारावर असलेले त्यांना दिसले! ते मळोजीनें उचलून खालीं आणून दिले. त्या मल्लांनीं झालेला प्रकार बादशहास सांगितला. ते म्हणाले "त्याचा शक्तिचा पार नाहिं ॥ तो बुडवील पातशाही ॥ सत्वर करावा उपाये ॥ ४-४४' मग प्रधानानें हजार माणसें पाठविलीं. मळोजीनें प्रथम त्यांना आपले दंड बांधूं दिले; आणि नंतर एकदम आसडून सर्वांचा प्राण घेतला.

ही बातमी कळल्यावर मळोजीस शिरपाव पाठवून दरबारांत आणावा व त्याची शक्ति समक्ष पहावी असें बादशानें ठरविलें. त्या अर्थाचें बादशहाचें पत्र पाहून मळोजीस आनंद झाला; आणि या निमित्तानें आपली कीर्ति वाढविण्याचें त्यानें ठरविलें. नंतर बापाची परवानगी घेऊन व आईस आणि निवडक लोकांस बरोबर घेऊन तो अमदानगरास गेला.

मळोजी आला हें ऐकून पातशाहानें त्याच्या स्वागतार्थ जाण्याविषयीं मंत्र्यांना सांगितलें. पण प्रधान कपटी असल्यामुळें तो युद्धसामुग्री घेऊन सैन्यासह निघाला. पुढें पायदळ, नंतर घोडेस्वार, नंतर हत्ती, नंतर बाणसामग्री घेतलेले रथी पठाण धनुर्ष्ये हातांत चढवून युद्धास निघाले. शिवाय "उल्हाट यंत्रें थोर थोर ॥ जुंपिले वृष आपार ॥ लोटिती गज देउनी शीर ॥ गोलंदाज फीरंगी ॥ ५—७ समुद्रबेटिच्या व्याति व्योवन ? ॥ कपीतान इापसान ॥ नानाजाति आवुंज जाण ॥ नृपा संग्रहीं आसती हे ॥ ८ ॥ मोगळ गोरे गाजरे ॥

दीसती उग्र बाबरे ॥ मोठ मोठे दबंरे ॥ गजस्कंदीं बैसले ॥ ९ ॥" अशा रीतीनें मोठ्या सैन्यानें येऊन मळोजींवर हल्ला केला. प्रथम मळोजी त्यांचें कौतुक पाहाण्यासाठीं स्वस्थ राहिला. 'उल्हाटयंत्राचा मार ॥ एकदाच केला भडमार ॥ तेंण दणाणलें आंबर ॥ महाणाकपे जहाला ॥ ५-१३" नंतर मळोजींनें प्रचंड झाडें उपटून लोकांना मार दिला, हत्ती भिरकावून दिले आणि पायदळ, घोडे, रथ हे तर रगड्यांत चुरडून गेले. हजारो लोक मेले व बाकीचे प्राण वाचविण्यासाठीं मळोजींस शरण आले. "आमुचा घात कासया करिसी ॥ जेणें युद्ध करावया आणिले तुजशीं ॥ ते पळाले दशदिशेसी ॥ गरीब अनाथा कां मारी ॥६१॥ हें तरव किल्येकानीं मळोजीपुढें मांडले. अशा प्रकारें मोठें घोरंदर युद्ध होऊन भूतकुमर यशवंत झाला. तेव्हां सुरवरांनीं आनंदानें त्याच्यावर पुष्पवृष्टी केली.

हें वर्तमान बादशहास लोकांनीं सांगितलें. ते म्हणाले "त्याची आरोळी ऐकताच वीरांचीं शस्त्रें गळालीं व कित्येकांना मूर्च्छा आली. तो मनुष्य नव्हे, तो रणभैरव दिसतो. "यासी कोण हातो फळी ॥ ऐसा कोण आहे बळी ॥ नसेल या भुमंडळीं ॥ ऐसें वाटतें ॥१६॥" अगस्तीनें जसें समुद्राचें आचमन केलें तसें हा तुझें राज्य मोडतो. "नृपा तुज मरण जवळ आलें ॥ नाहीं तरी शरण जाये वहिले ॥ ऐकतां मन दचकलें ॥ थोर भूपाचें ॥२९॥" मग पातशहानें दवंडी पिटवून लोकांना शांत केले आणि मळोजींशी सलोखा करण्यास प्रधानास फर्माविलें. इतक्यांत सूर्यास्त झाला; यामुळें मळोजींस रणांगणावरच राहावें लागलें. मग पहाटे उठून त्यानें स्नान व देवपूजा केली; आणि भोजन करून सिद्ध झाला. इतक्यांत त्याचा मेहुणा बाजी धाराराव यानें एकांतीं त्यास गाठून 'पातशहाच्या पोटीं कपट आहे तेव्हां तूं परत जा' असा उपदेश केला. तेव्हां मळोजी हांसून म्हणाला "माझ्यावर परमेश्वरी कृपा आहे; तुम्ही व्यर्थ चिंता करू नका." इतक्यांत प्रधान, वस्त्रें अलंकार घेऊन, पातशाहाच्या भेटीस मळोजींस बोलावण्यासाठीं आला. त्याप्रमाणें भेट झाल्यावर मळोजी व त्याची आई अहमदनगरांत मोठ्या वाड्यांत राहूं लागली.

नंतर दुर्मति प्रधान रुस्तुमखान पातशहास एकदां म्हणाला "माणीकमल्ल मोठा शक्तिमान आहे, त्याची मळोजींशीं कुस्ती लाऊन पहावी" हें म्हणणें पातशहास पटलें व मळोजींनींहि तें मान्य केलें.त्याप्रमाणें माणिकमल्लास पातशहानें बोलावणें पाठविलें; तेव्हां तो गर्विष्ठ मल्ल म्हणाला "माझ्या आंगीं हत्तीचें बळ आहे, मी अनेकांचे हातपाय मोडले आहेत, सर्व मल्लांचा मी काळ आहे, माझ्याबरोबर भिडणारा या जगांत कोणी नाहीं, तेव्हां माझा शिष्य कुस्तीस पाठवीन" हा निरोप ऐकून पातशहा रागावला; आणि माणिकमल्लास पुढें घालून आणण्याचा

हुकूम सोडला. तो कळतांच माणिकमल्ल हातांत वाघनखे, डोक्यास माणिकजडित टोप, कमरेस खंजीर व बिचवा, पायांत तोरडे आणि डोऱ्यांत मोत्याचे तुरे घालून निघाला. निघतांना त्यानें व त्याच्या सोबत्यांनी यथेच्छ सुरापान केलें. तो रस्त्यानें चालला तेव्हां त्याच्या शरीरावर अनेक बिरुदें व पुतळे बांधलेले दिसत होते. तो एखाद्या लहानशा हत्ती सारखा दिसत होता. एवढा अद्भुत शरीराचा मुलगा होण्याचें कारण असें होतें. त्याच्या आईनें एका अवलियास रोज जेवण घालण्याचा क्रम सात वर्षे ठेवला होता. एके दिवशीं आईनें कांहीं कामासाठीं बाहेर जातांना मुलीस रोट करण्यास सांगितलें होतें. तिनें अजगर रोट बनवून पात्राखालीं झाकून ठेवले. ते आईनें नेऊन अवलियास दिले. त्यावरून त्यानें तुला अजगरासारखा मुलगा होईल म्हणून आशीर्वाद दिला. तोच हा माणिकमल्ल.

तो आरोळी देऊन म्हणाला "मी हत्तीची फळी धरीन; मग माणसाचा मजपुढें काय पाड ? ज्याचें मरण ओढवलें असेल त्यानें मजपुढें उभें राहावें. वांचण्याची इच्छा असेल त्यानें माझ्यासमोर येऊ नये." मळोजी रागाऊन बोलला "उगीच पराक्रम न करतां वाया कशाला बोलतोस ? तूं अनाथ दीन लोकांना मारून गर्विष्ठ झाला आहेस. काय प्रताप असेल तो आतां दाखीव. मग माणिकमल्लानें पोषाक उतरून जमिनीवर मूठ मारून अंगास माती लावली. मळोजीनें एका दगडावर मूठ मारून त्याचें पीठ केलें आणि तें अंगास लाऊन कुस्तीस तयार झाला ! हा चमत्कार पाहून पातशाहा माणिकमल्लास म्हणाला "तुला आतां जीव वाचवावयाचा असेल तर परत ये." तेव्हां माणिकमल्लानें चिडून पसाभर माती मळोजीच्या डोळ्यांत फेकली व तो डोळे पुसूं लागला तेव्हां त्याच्या पोटावर व छातीवर माणिकानें गुद्दे मारले. तेव्हां मळोजीनें त्याचे पाय उचलून त्याला गरगर फिरविले आणि एका ठोशानें त्याचे डोकें फोडलें; त्यामुळें माणिकमल्ल तात्काळ मरण पावला. नंतर पातशहानें मळोजीस वस्त्रें अलंकार अर्पण केले.

नंतर वाघाशीं मळोजीनें कुस्ती करावी असें वजीराच्या सल्यानें पातशाहा म्हणाला. त्या प्रमाणें एक मोठा वाघ रानांतून आणून त्याच्या अंगावर सोडला. तेव्हां त्याचा जाभाडा चिरून मळोजी त्याच्या पोटांत शिरला आणि त्याला वाघानें खाल्याबद्दल पातशाहा शोक करतो इतक्यांत मळोजी वाघाचे पोट फाडून बाहेर आला. तेव्हां पातशाहा त्यास वस्त्रें देऊं लागला. वजीर म्हणाला 'त्याचें आंग रक्तानें भरलें आहे. त्यास आधीं स्नान करूं द्या.' त्याप्रमाणें त्याला स्नानासाठी एका खंदकावर नेलें. तेथें एक मोठी सुसर होती. ती जागा वजीरानें

मळोजीस मुद्दाम दाखविली. मळोजीनें सुपारीचीं दोन शकलें करून तीं बाहेर भिरकाऊन दिलीं.

या नंतर कांहीं दिवसांनीं गौडराजानें नजर केलेला एक हत्ती मळोजीच्या अंगावर सोडला. त्यानें त्याचे सुळे धरून त्यास तीन वेळा मागे लोटला आणि मग सभोवार भवंडून मळोजी म्हणाला " हा हत्ती सभेवर फेकूं कीं आकाशांत फेकूं ?" तेव्हां सर्व सभा भिऊन गेली. शेवटीं पातशाहानें " मळोजीस बैसउन मांडीयेवर ॥ दीधलें वस्त्रें अलंकार ॥ माझे सेवक नृपवर ॥ त्यामाजी श्रेष्ठ तु ॥ ७–१११ ॥ दीधलें खासे निशाण ॥ सर्व वर्तति तव आज्ञेन ॥ मीही असेन गा तव स्वाधीन ॥ मम राजे रक्षी हे ॥ ११२ ॥ मळोजी पुढें बोदायित ॥ नाम म्हणे विख्यात ॥ भूपतीराव कितावत ॥ दीधलें पातशाहानें ॥ ११३ ॥ "
तथापि त्या दुष्टबुद्धी प्रधानानें मळोजी पलंगावर निजला असता एके रात्रीं त्याला आल्हाद उचलवून पलंगासुद्धां विहिरींत टाकविला. परंतु जलदेवतांनीं त्याला सावरून पाताळांत नेला. नंतर शंकरानें त्याला परत मृत्युलोकीं आणून सोडलें.

यानंतर प्रधानानें विषाची गोळी मळोजीस खावयास घातली. पण कांहीं परिणाम झाला नाहीं.

शेवटीं एके दिवशीं पताशाहानें मळोजीस मांडीवर घेऊन विचारलें " मी तुला एक प्रश्न विचारणार आहे, पण त्याचें उत्तर देईन असें आधीं वचन पाहिजे. " त्याप्रमाणें वचन मिळाल्यावर पातशहा म्हणाला " तुला मरण आहे कीं नाहीं ? आणि तुला कोणता देव प्रसन्न आहे ? " मळोजीनें विचार केला कीं देवानें दिलेली मुदत संपत आली. तेव्हां " वंश उदरपोषणासी, वृत्ती मागावी राजयासी " असा विचार करून ती मागितली. पातशाहानें देशमुखी देऊन तीनशे साठ कडेवळितांच्या सनदा करून दिल्या. नंतर त्यानें आईस बोलावून सनदा तिच्या स्वाधीन केल्या आणि नंतर आपल्या हातानें भुज चिरून तांईत काढून टाकले; ते अदृश्य झाले; आणि शेवटीं त्यानें आपणच आपला गळा कापून घेतला.

भूतेश आख्यानांतील कांहीं गोष्टींचें येथें दिग्दर्शन केलें. ग्रंथपरिचय करून देण्यास यापेक्षां जास्त तपशील सांगण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

दत्तात्रय विष्णु आपटे.

पुढें छापलेलें भूतेशआख्यान हें इंदि[...]रा छाप[...]चे चालक रा. त्रिंबकराव आवटे सभासद भा. इ. सं. मंडळ, यांना नगर जिल्ह्यांत कात्राबाद मांडवगण येथील भूपतिराव देशमुख यांजकडे मिळालें. तें त्यांनीं मंड[...]ळाकडे [...]यावर रा. रा. दत्तोपंत आपटे बी. ए. या विद्वान् संशोधकांनी तें वाचून पाहून त्यां[...]चा [...]चय मंडळाचे सभासदांस निबंधद्वारां करून दिला.

हें काव्य रसाळ आहे. यांत भूपतिराव देशमुखांचे पूर्वज **मळोजी यादव** यांच्या पराक्रमाचें आणि उदयाचें काव्यमय वर्णनमय आहे. कवीचें नांव **आनंद** असावें असें अध्यायांचे अंतींच्या उल्लेखांवरून वाटतें. या आख्यानांत माहिती थोडीच आहे. बहिरी निजामशहा, रुस्तमखान, जोमाजी ( पृ. ६१ ), बाजी घारराव [ पृ. ३१ ], माणिकमल्ल, अशीं कांहीं व्यक्तींचीं आणि अमदानगर, त्रिंबक थोडप, शिवनेर, बेदर, सिंगणापुर, सप्तशृंग इ. स्थळांचीं नांवें या ग्रंथांत आलीं आहेत. बाकी सर्व भाग गोष्टीकथांचाच आहे. अखेर ग्रंथरचनासमाप्तिमिति आहे; पण त्यांत शक नाहीं. ग्रंथांत देवीचें देवालय, शिवालय, बेताळाचें ठिकाण यांचीं ही कांहीं वर्णनें आहेत. तीं आजच्या वस्तुस्थितीशीं ताडून पाहिलीं पाहिजेत. देशमुख घराण्यास सनदा दिल्याचा आणि किताब दिल्याचा जो उल्लेख कवीनें केला आहे त्या मूळ सनदाच शोधल्या पाहिजेत. श्री. भूपतिराव यांनी मनावर घेऊन त्या शोधून काढून प्रसिद्ध केल्या पाहिजेत. देशमुखाचें घराणें शिवभक्त असून खानदानी आहे. त्यांनीं आपलेजवळील सर्व संग्रह लावून त्यांतील लोकोपयोगी माहिती प्रासिद्ध करण्याची तजवीज केली पाहिजे. खरा इतिहास या अशा कागदांतूनच निघेल. कागद नसला म्हणजे मग नाइलाजानें काव्यें पुढें करावीं लागतात.

रा. आवटे यांनीं इच्छा दर्शविल्यावरून हा ग्रंथ प्रसिद्ध करण्याचा योग येत आहे. पुढें कागदपत्र सनदा वगैरे ही मिळतील तर तींहि या मालेंत प्रसिद्ध करण्याचा त्यांचा विचार आहे. रा. आवटे यांस आणि मंडळास तें यश देऊन उपकृत करणें श्री. भूपतिराव देशमुख यांचे हातीं आहे.

मूळ ग्रंथांतलि भाषेचें स्वरूप रा. आवटे यांनीं छापतेवेळीं थोडें बहुत बदललें असलें तरी अर्थबोधास अडथळा होत नाहीं.

भूतेशआख्यानासारखीं आख्यानें इतिहासास तादृश उपयोगी नसलीं तरी सामाजिक समजुतींच्या विकासाची परीक्षा करण्याच्या उपयुक्त साधनांत तीं अवश्य मोडतील. कपितान, हपसाण, उल्हाटयंत्र, बालविवाह, तालीम, फिरंगी, विषप्रयोग, बारा उमराव, महाराष्ट्र राजाचें नित्य पुराणश्रवण इ. बारीकसारीक उल्लेख ध्यानांत ठेवण्याजोगे आहेत. उपयोगी पडतील.

रा. आवटे-आपटे यांनी उत्साहांत पुढें होऊन भा. इ. सं मंडळाच्या पुरस्कृत ग्रंथमालेंत ही एक नवीन प्रकारची भर टाकिली यासाठीं त्यांचे आपण आभार मानिले पाहिजेत.

मार्गशीर्ष व. ८<br>१८४८ पुणें.

दत्तो वामन पोतदार.<br>चिटणीस, भारत-इतिहास-संशोधक-मंडळ.

# भूतेश आख्यान

## अध्याय पहिला

श्रीगणेशाय नमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः । श्रीभूतनाथ श्रीमळोजी पटे श्रीदाइताये नमः । श्रीमहादेव पंचवक्त्राय नमः ॥ जयजयाजी गजानना । भूतेश आख्यानाची मनकामना । माझी पुरवावी अनंत कल्याणा । वरदमूर्ति गणाधीशा ॥ १ ॥ नमो स्वामी सदाशिव । पुरवी मनोवृत्तीचा भाव । हें आख्यान स्वयमेव । बोलवी मज मुखीं ॥ २ ॥ तुम्ही निराकार निर्गुण । भक्तालागी जाला सगुण । अनाथ गांजिले पाहून । कृपा आली तुम्हांसी ॥ ३ ॥ असुर थोर माजले । सुरपद भ्रष्ट केले । पराभउनी लाविले । वस्ती गिरिकंदरीं ॥ ४ ॥ तव मनीं विचारी सहस्रनयन । विचार पुसावा कवणा लागुन । अष्टदिग्पाळासहित सचीरमण । पुसता जाला गुरूसी ॥ ५ ॥ शत्रूनें केली ऐसी गती । आम्ही भोगितो विपत्ती । ते भोगिती सुख संपत्ती । अमरावतीची पैं ॥ ६ ॥ आतां कवणा जावें शरण । कोण करील शत्रूचें निर्दाळण । पदीं स्थापील ऐसा कोण । स्मरावा देवो ॥ ७ ॥ तव बोले बहस्पती । स्मरावा तो कैलासपती । तो सिद्धि करील मनोवृत्ती । सर्वस्वे तुमची ॥ ८ ॥ मोडलें सृष्टीचें कर्म । जाला अवघा अधर्म । ऋषि याग सत्कर्म । चालों न देती ॥ ९ ॥ मग ऋषी देव मिळोन । गेले कैलासा शरण । स्तविते जाले उमारमण । ऐका जी कवणे परी ॥ १० ॥ जयजयाजी वृषभध्वजा । त्रिभुवनपती महाराजा । धावे सेवकाचिया काजा । पराभविलें दैत्यीं ॥ ११ ॥ जयजयाजी विरूपाक्षा । जयजयाजी अंतरसाक्षा । सेवेसी अंतरलों म्हणोनी शिक्षा । केली काय आम्हांसी ॥ १२ ॥ त्वां च कृपेनें वर देउनी । आम्हां स्थापिलें पदस्थानीं । असुरें पद भ्रष्ट केले शूळपाणी । म्हणोनी शरण आले जी ॥ १३ ॥ माता बाळकासी पायीं लोटी । परी ते चरणीं घाली मिठी । त्रैलोक्यनाथा धूर्जटी । आम्हांलागी तैसा तूं ॥ १४ ॥ नदियास ठाव नेदी समुद्र । तरी पुढें वयास

कोणता आधार । जळचरावरी कोपलें नीर । मग तया गती कोणती ॥ १५ ॥ तूं तर भक्तांचा सखा । अंतकाळींचा पाठिराखा । निर्वाणीं रक्षिले सेवका । गर्जती थोर पवाडे ॥ १६ ॥ सा चार आठरा पुराणें । वर्णिता भागले तुझे गुण । सहस्रमुख जाला तल्लीन । गुण तुझे वार्णिता ॥ १७ ॥ शिवा तुझें वरदान । आभंग आक्षयीं कल्याण । नव्हे कदा अकल्याण । ब्रीदावळी गाजे ॥ १८ ॥ तुझे अंकित म्हणविता । तुज माया नये कृपावंता । तेव्हां आम्हांसी कोण रक्षिता । तुजवांचून दुसरा॥ १९ ॥ तंव कृपेनें बोले गिरिजारमण । कोणें गांजिले रे तुम्हां लागुन । देव म्हणती स्वामी कृपाघन । आसुरें पराभविलें ॥ २० ॥ बळें घेतली अमरपुरी । समस्ता घातले बाहेरी । सुखीं क्रीडती पृथ्वी माझारी । गांजिती सर्व जना ॥ २१ ॥ मग कोपारूढ होऊन पंचवक्त्र । दैत्य मर्दावया चालिला त्रिनेत्र । वृषभारूढ होऊन सर्वत्र । गण घेतले समागमें ॥ २२ ॥ शंख चक्र त्रिशुळ करीं । घेऊं आले अमरपुरी । चालून आले दैत्य समरीं । युद्ध करावया ॥ २३ ॥ युद्ध जालें महा घोरांदर । तें सांगतां सविस्तर । वाढेल कथेचा विस्तार । या लागीं आटोपिलें ॥ २४ ॥ बळें वधुनीं दुर्जना । पदीं स्थापिलें सहस्रनयना । सुख देउनि संत मुनिजना । आपण राहिले काशी ॥२५॥ येथें यावया कार्य कारण । ऋषि मांडव्य विख्यात जाण । तेणें भक्ति उत्कृष्ट करून । आणिले या स्थळा ॥ २६ ॥ नित्य ऋषी साळी पिकऊन । त्याचे करी पक्वान्न अन्न । काशीस नेऊन शिवाकारण । नित्य नैवेद्य दाखवी ॥ २७ ॥ कितीएक लोटले संवत्सर । कृपेनें तोषला गौरीहर । प्रसन्न जाला कर्पूरगौर । तया ऋषीतें ॥२८॥ सांव म्हणे भक्तराया । मीच येतो तुझिया ठाया । कष्टलासी रे माझिया सखया । न येरे आतां येथें ॥ २९ ॥ मग शेषाद्रि पर्वताचे पाठारीं । प्रगटला तो मदनारी । कामधेनु अभिषेक करी । आपुलिया दुग्धाचा ॥ ३० ॥ आनंद जाला ऋषेश्वरा । हरुषें न माय अंबरा । दिव्य पूजा विश्वेश्वरा । नित्य करी मांडव्य ॥ ३१ ॥ आठ्याशी सहस्र मिळोन ऋषी । आले ह्या आश्रमासी । ऋषीयाग नेला सिद्धीसी । यालागीं सिद्धनाथ नाम ॥ ३२ ॥ ऐसा तूं त्रिलोचन । मी काय वर्णूं तुझे गुण । तूं निराकार स्वरूपीं निर्गुण । जे कां अगम्य ब्रह्मादिकां ॥३३ ऐसा तूं काशीनिवासी । प्रसन्न जाला भूतरायासी । ते कथा पुण्यपावन कैसी । सत्य वदवी स्वामियां ॥ ३४ ॥ मग ध्यानीं संचरोनी उमारमण । बोलविता जाला हें आख्यान । ऐकावें श्रोते संतजन । जे का असे वर्तले ॥ ३५ ॥

मांडव्य क्षेत्र प्राचीन नगरी । तेथं भूतेशेण राज्य करी । संपत्ती असे बहुत घरीं । जेविं धनपती ॥ ३६ ॥ परिसा नगरीचें वर्णन । कैसी निर्मिली रायान । पूर्वी हेमपुरी नामाभिधान । मांडव्यापासून हें नाम ॥ ३७ ॥ नगरी निर्मिली कळाकुसरी । रस्ते रचिले परोपरी । सप्तखणी दामोदरी । ठायीं ठायीं उभविल्या ॥ ३८ ॥ सुंदर निर्मिलीं मंदिरें । रंगविलीं रंगाकारें । चित्रें रेखिलीं नाना प्रकारें । पुतळे आकार निर्मिले ॥ ३९ ॥ पाताळ लोक मृत्युभुवन । अमरलोक सुरवरगण । आवघें लिहिलें त्रिभुवन । अवतार चरित्रें लिहिलीं ॥ ४० ॥ पूर्वी मयासुरान । निर्मिली होतीं धर्मसदन । तोच अर्थ चित्तीं धरून । किंचित भाव दाखविती ॥ ४१ ॥ भोंवते परिघ चौफेरी । हुडे उठविले गगनोदरीं । ध्वजा फडकती तयावरी । मंगळ तुरे गर्जती ॥ ४२ ॥ चौक दिसती साजिरे । सदनीं उभविले मनोहरे । जैसीं दिसतीं मंदिरें । अमरनगरीचीं ॥ ४३ ॥ बिल्व पारिजातक घरोघरीं । सत्यवादी नरनारी । दुःख दरिद्र सर्व नगरीं । कोण्हासीही असेना ॥ ४४ ॥ हातीं घेऊनिया स्मरणी । अवघेचि असती शिवध्यानीं । राज्यराहाटी पाहोनी नयनीं । तैसेच जन वर्तती ॥ ४५ ॥ नगरा भोंवती वृक्ष उत्तम । लाविले असेत नृपोत्तम । न पडे दृष्टीसीं ग्राम । तयाचिये दाटीं ॥ ४६ ॥ बाग निर्मिले नानापरी । दूत पाठवून देशांतरीं । वृक्ष मेळविले परोपरी । जे असती अपूर्व ॥ ४७ ॥ आम्र नारळी चंदन । कर्दळी खर्जुरी रातांजन । पुष्पें जाती बहुत मेळवून । नानापरीच्या लाविल्या ॥ ४८ वृक्ष फळले फळांकुत । मध्यें पक्षी गजबजात । मयोरे अनंदें नाचत । अपूर्व छाया पाहोनी ॥ ४९ ॥ तया छायेसी सुरगण । यावया इच्छी तयाचे मन । जैसें अमराचें खांडोवन । उपमेस दुसरें ॥ ५० ॥ नगरा भोंवती रचिली पवळी । तयावर लिहिली शिवनामावळी । यमा ऐसा असोनि बळी । रिघ न होय तयाचा ॥ ५१ ॥ घरोघरीं लक्ष्मी सधन । आनंदें निर्भय असे जन । जैसें इंद्राचें इंद्रभूवन । अमरावती दुसरी ॥ ५२ ॥ नगरी महापुण्यपावन । शिवउपासक आवघे जन । घरोघरीं वेदाध्ययन । असती हो द्विजाचया ॥ ५३ ॥ श्रौतस्मार्त घरोघरीं । आवघे च विप्र अग्नहोत्री । तितकियांचें नृप पाळण करी । अन्नवस्त्रें देउनीयां ॥ ५४ ॥ आवघेच ब्राह्मण पंडित । वेदशास्त्रें मुखोद्भव । भविष्य अर्थ जाणत । जैसें कां बृहस्पती ॥ ५५ ॥ जपतपध्यान अनुष्ठान । सर्वदां करिती योगसाधन । भ्रमत फिरती तीर्थाटण । दुजे मुनिवर जन्मले ॥ ५६ ॥ तपोतेजें तपळेती । केवळ योगीच दिसती ।

दर्शन होतां पातकें जाती । प्रतिसूर्य दुसरे ॥५७॥ राव तयांसी अनन्यशरण । सन्मानुनी तोषवी तयांचें मन । पडो नेदी कोठें न्यून । तयांचे सेवेसीं ॥५८॥ आपुलिया राज्याभीतरीं । नृपें पाठउनियां दंडधारी । शिक्षा दुष्ट जनांसी करी । शुद्ध मार्ग चालावया ॥५९॥ शूद्र वैश्य क्षत्रिय ब्राह्मण । आणीक याती नाना वर्ण । तितुकियांसी दंड करून । शिवभजनीं लावितसे ॥ ६० ॥ जैसें पूर्वी एकादशी व्रत । रुक्मांगद राजा चालवीत । नगरी नेली रमाकांत । तेचि परि येथें हो ॥ ६१ ॥ त्रिंबक घोडप आदिकरून । सत्तावीस गड राया स्वाधीन । पातशाही अख्त्यारी पूर्ण । यालागीं हवाला असे ॥ ६२ ॥ स्वाधीन करावया हेंचि कारण । हे भूतरायें प्रतापें करून । दिल्हे पातशाहासी घेऊन । म्हणोनि हा गडपती ॥ ६३ ॥ भूतरावो नाम धारण । ठेवावया ऐका कारण । पितयानें भूतेशा आराधून । हा पुत्र मागितला ॥ ६४ ॥ पूर्वींचाच पातशाही उमराव । असे जी हा भूतेशराव । प्रताप आगळा शूरत्व । प्रत्यक्ष रणशूर ॥६५॥ बेदरीं प्रतिज्ञा बोलून । विडा पैजेचा उचलून । निशिमाजीं शिवनेरी घेऊन । दिधली तयासी ॥ ६६ ॥ पाहुनी शूरत्व पूर्ण । ग्रामदेश उत्तम स्थान । अर्पिली होती राजियान । दक्षणेच्या ॥ ६७ ॥ स्वस्थ असे आपुले स्थानीं । स्वामिसेवेसी सादर मनीं । दिवस काळ गेले लोटुनी । याच परी पैं ॥६८॥ नेमधर्म चाले उत्तम । सत्कीर्ति जेवीं धर्म । क्षमा शांति नृपोत्तम । गुणातीत सागरु ॥६९॥ सर्वदां असे ईश्वरभजनीं । परनिंदा दोष नायिके श्रवणीं । वास्तव्य ज्याचें शिवधामिनीं । पुण्यपरायण जो ॥ ७० ॥ त्रिकाळ पुराणश्रवण । नित्य करी धर्मदान । दानशूर जेवीं कर्ण । विन्मुख नसे याचका ॥ ७१ ॥ सत्पात्र पाहोन ब्राह्मण । भावें करी तयाचें पूजन । इच्छिलें मागवी भोजन । तेंच पुरवितसे राजा ॥ ७२ ॥ स्वरूपें सुंदर सुलक्षण । नाना विद्या जयालागून । शास्त्रार्थ तया व्युत्पन्न । जेवीं पंडित दुसरा ॥ ७३ ॥ कळाकुसरी चातुर्यपण । दृष्टीस येतां निर्मी आपण । गायनकलेचें जया ज्ञान । गंधर्व जैसा स्वर्गींचा ॥ ७४ ॥ ऐसा सर्वगुणीं विराजीत । जन्मला असे पुण्यवंत । समुद्र मर्यादा न उल्लंघीत । तैसा नेमा न ढळे ॥७५॥ धर्म-नीति प्रजापालन । न करी कोणाचें हेळण । भूतदया हृदयीं पूर्ण । ब्राह्मणभक्त जो ॥ ७६ ॥ गुणगंभीर अति उदारु । धैर्यवंत जैसा मेरु । सत्य वदे युधिष्ठिरु । तैसा दुजा जन्मला ॥७७॥ न वदे कोणासी कठोर वचनीं । कुशब्द वाचा नसे स्वप्नीं । लीनता असे जयाचे मनीं । शशी ऐसा शीतळ ॥ ७८ ॥ सत्वा न टळे नरेंद्र । सत्वधीर हरि-

श्चंद्र । असोनी पृथ्वीचा इंद्र । झाला भिकारी ॥ ७९ ॥ सत्वासाठीं शरीर विकुनी । डोमाघरीं वाहिलें पाणी । धन्य सूर्यवंशीं जन्मोनी । वाढविली सत्कीर्ती ॥ ८० ॥ भूतशरायें आपुल्या राज्याभीतरीं । अन्नछत्र घातलीं श्रेष्ठ नगरीं । अन्न वांपी अनाथा भिकारी । श्रियाळा ऐसा पैं ॥ ८१ ॥ धन्य जयाची जननी जनिता । कीं प्रसवली ऐसिया सुता । थोर निर्मिता तो विधाता । भविष्यार्थ जाणोनी ॥ ८२ ॥ ऐसा निर्माविया काय कारण । याचे उदरीं अवतरले शिवगण । म्हणोनी सर्व सुलक्षणीं बरवेपण । निर्मिला राजा ॥८३॥ हें तर राज्य पुण्यपावन । उपमेसारिखी कीर्ति पूर्ण । आतां दुष्टासी म्हणती दुर्योधन । सद्गुणी यांस धर्म म्हणती ॥ ८४ ॥ सोमवार एकादशी । नेम असे त्या रायासी । कीर्तन करावें शिवालयासी । महा नामघोषें ॥ ८५ ॥ आपणही जावें श्रवणा । घेऊन जावें नगरजना । जाग्रण करुनी त्रिलोचना । श्रवणद्वारें भजावें ॥ ८६ ॥ एका पर्वकाळाचे अवसरीं । कीर्तन झालें राउळाभीतरीं । नृप आणि जन समग्री । ऐकावयासी गेले पैं ॥ ८७ ॥ झालें अप्रतीम कीर्तन । संतोषले अवघे जन । परि राजा दुःखित होऊन । गेला हो मंदिरा ॥ ८८ ॥ निद्रिस्त झाला सेजेवरी । भार्या चरणसेवा करी । परि राव मौन्यरूपें निर्धारी । न बोले स्त्रियेसी ॥ ८९ ॥ मग स्त्री म्हणे जी नरेंद्रा । कां हो उतरले मुखचंद्रा । कां न लागेसी तुम्हां निद्रा । स्वामिराया म्हणोनी ॥ ९० ॥ गुह्य बोलाना मजपासी । काय अंतरलें मी सेवेसी । तुमच्या चरणाची दृढ दासी । किमर्थ लोटितां पायानें ॥ ९१ ॥ किंवा झाल्या अपराधांच्या रासी । त्या आज स्मरल्या हृदयासी । त्याचा कोप उद्भवला मानसीं । स्वामिराया सुजाणा ॥ ९२ ॥ कोणी परचक्र येऊन । त्यानें केलें ग्रामदेशदहन । म्हणोनी आलें जी वर्तमान । यालागीं दुःखित ॥ ९३ ॥ कोणत्या सख्याचें झालें स्मरण । कोणाच्या दुःखें दुखवलें मन । किंवा झालें वनवासी कीर्तन । तें दुःख हृदयीं भेदलें ॥ ९४ ॥ हरिश्चंद्र नळाची कथा । वनवास पडला रघुनाथा । पुत्रशोक राया दशरथा । श्रावण माता पित्रासी ॥९५॥ मग नृप म्हणे प्रिये लागुन । अपूर्व झालें कीर्तन । तेणें भेदिलें माझें मन । तें का गुह्य सांगू गे ॥ ९६ ॥ सेज वाटती खदिरांगार । पुष्पें हार भासती विखार । तुझे पाणि खगांधार । लागतसे पायांसी ॥ ९७ ॥ तंव ती उभी टाकून । विनवितसे कर जोडून । काय जालें श्रवणकीर्तन । तें निरोपावें स्वामिना ॥९८॥ एक प्रिये द्वारका भुवनीं । कृष्ण परब्रह्म आणि रुक्मिणी । बैसली असे निजसदनीं । तंव तया काय

आठवलें ॥ ९९ ॥ भीमकी म्हणे जी विरंचिजनका । सुराधीशाचिया नायका । मज सुचले जी एक ऐका । दिनानाथा स्वामियां ॥ १०० ॥ तुमचा हा अवतार पूर्ण । साक्ष देती वेदपुराण । परि उदरीं नसे संतान । येणें शून्य दिसे कीं ॥ १ ॥ जयाचे पोटीं नाहीं पुत्र । तयाचेंहि व्यर्थ जन्मांत्र । नसे तयासी परत्र । ऐसें वेदशास्त्रें बोलती ॥ २ ॥ पुत्रावाचुनी रितें सदन । दीपकावांचून अंधार जाण । शरीर प्राणावाचून । तैसें मज हृदयीं वाटतें ॥ ३ ॥ तरी पुत्र देई ऐसा देवा । करी मातृपितृगणाची सेवा । जगत्र तोषे जयाच्या नांवा । ऐसें फळ अर्पी कां ॥ ४ ॥ विजयी शूर बत्तीस लक्षण । स्वरूपें सुंदर चांगुलपण । ऐसें वाटतें जैसा मदन । प्रत्यक्ष उदरासी यावा ॥५॥ हरि म्हणे रुक्मिणी लागुन । शिवें केला भस्म मदन । सुराधीशाचिया कार्याकारण । पूर्वींच तो निर्मिला ॥ ६ ॥ तरी तो मागावा शिवापासी । त्याजवांचून नये हातासी । मग वसुदेव देवकी बळिरामासी । सकळ यादवा बोलाविलें ॥ ७ ॥ तयासी आज्ञापी श्रीहरी । तुह्मी रक्षावी द्वारकापुरी । मग निघतां झडकरी । तपालागीं हिमांचला ॥ ८ ॥ हिमालयासी जाऊन । मांडलें तप दारुण । निराहार उपोषण । बैसला तये स्थळीं ॥ ९ ॥ जाला एक संवत्सर । तपें तोषला कर्पुरगौर । प्रकटतां जाला गिरिजावर । हरिहर भेटले ॥ १० ॥ हर ह्मणे रे प्राणसखया । तप आचरलासी किमर्थ कार्या । हरि म्हणे कैलासराया । पुत्र मदन देई कां ॥ ११ ॥ तंव शंकर वदे वरदान । हेंच भविष्यार्थ जाणोन । ठेविला होता तुज कारण । येईल तव उदरासी १२ ऐसा शिव जाला प्रसन्न । हरि आला द्वारके लागून । स्वल्प काळें रुक्मिणी गर्भीण । आला मदन उदरासी ॥ १३ ॥ आनंद जाला श्रीहरी । उत्सव केला द्वारका नगरीं । यादवाचिया वंशा माझारीं । मदनदीप लागला ॥ १४ ॥ जालें पूर्वाध्यायींचें कथन । आनंद जाला शिवपदीं लीन । विनावितो स्वामी कर जोडून । पुढें ग्रंथ वदवी हा ॥ १५ ॥ इति श्रीभूतेश आख्यान । वदविलें सिद्धेश्वरकृपेन । पुढें होऊन सावधान । श्रोतेहो कथा परिसावी ॥ ११६ ॥

# अध्याय दुसरा.

—⁂—

श्रीगणेशायनमः ॥ जयजयाजी पंचवदना । जयजयाजी पन्नगभूषणा । जयजयाजी निराकार निर्गुणा । पुढें आख्यान बोलवी ॥१॥ गिरिजा विनवी कर जोडून । श्रीकृष्ण तो अवतार पूर्ण । मग तो पुत्रासाठीं विपरीत मानून । किमर्थ गेला तपासी ॥२॥ ऐसें पुत्रसंततीचें दुःख । मानिती अवतारादिक । तें कैसें असेल सुख । पुत्रवंताचें जाणिजे ॥ ३ ॥ तैशा आपल्यासी कन्या सातजणी । परि पुत्र नसे वंशा लागुनी । म्हणोनी खेद पावो मनीं । रात्रंदिवस ॥ ४ ॥ स्त्रीचें नाम असे गिरिजा । तीस अंकीं घेऊनी भूतेश राजा । म्हणे पुत्रेविण कवण काजा । जन्म व्यर्थ आपुला ॥ ५ ॥ जन मज निपुत्रिक म्हणती । तेणें तळमळ मज वाटे चित्तीं । कैशी माझी कर्मगती । निर्मिली विधानें ॥ ६ ॥ पुत्रेंविण व्यर्थ जिणें । पुत्रेंविण धर्मदान । पुत्रेविण माहिमान । सर्व निरर्थक ॥ ७ ॥ जैसें सूर्याविण अंबर । किंवा दीपकावीण मंदिर । जळेंविण सरोवर । यापरी आपणा जालेंसें ॥ ८ ॥ ज्याचे कुळीं नाहीं जी दीप । तो जरी असेल पृथ्वीभूप । जैसें वैधव्येचें व्यर्थ स्वरूप । वन्हीमाजीं जाळावें ॥ ९ ॥ ऐसें उभयतां सद्गदित होऊन । अश्रुपात भरले नयन । म्हणे विधातिया आम्हां लागून । जन्मविलें कासयासी ॥ १० ॥ कांता रायाचें मुख न्याहाळी । तों शुभ्र रोम देखिला भाळीं । मग बोलती जाली वेल्हाळी । तया जी नृपासी ॥ ११ ॥ तुह्मा प्राप्त जालें वृद्धपण । आतां कैंचे जी पुत्रनिधान । आयुष्य गेलें व्यर्थ निघोन । पुत्र पुत्र म्हणोनियां ॥ १२ ॥ पुत्रदुःखाचा चिताग्नि । शरीर गेलें कृष होउनी । सुखसंपत्तीचे विलास मनीं । असोनी नाठवे ॥ १३ ॥ मग भार्या म्हणे जी स्वामीनाथा । तुह्मीं आराधावें विश्वनाथा । तो सत्य पुरवील मनोरथा । सर्वहि तुमचिया ॥ १४ ॥ येणें पुत्र बहुतासी दिधले । ते पुराणांतरीं वर्णिलें । येणें सेवक नाहीं फिरविले । कोण्ही ते विन्मुखी ॥ १५ ॥ याचें देणें असे थोर । नेणवे ब्रह्मादिका पार । करुनी मनाचा निर्धार । पुजावा सदाशिवा ॥ १६ ॥ नवस करावा अगोचर । जो कां असेल बहु दुर्धर । जेणें पावेल गौरीहर । अति सत्वर तुम्हासी ॥ १७ ॥ ऐकून स्त्रियेचें वचन । पश्चात्तापें तापला पूर्ण । ह्मणे कुळदैवत हा त्रिलोचन । याजवाचुनी

कोणा स्मरूं ॥ १८ ॥ मग जाऊनियां शिवालयासी । नमस्कार घातला सदाशिवासी । बोलता जाला थोर नवसासी । जो कां असे अगोचर ॥ १९ ॥ ह्मणे स्वामी तूं त्रिनेत्र । मज द्यावे दोन पुत्र । तुज वाहीन उभय नेत्र । सत्य सत्य ही त्रिवाचा ॥ २० ॥ सिद्धेश्वरा महाराजा । पूर्वापार दास मी तुझा । मग करिता जाला पूजा । तें ऐका कवणेपरी ॥२१॥ मांडवगणापासून योजन दूर । पश्चिमेस असे सिंगणापूर । तेथें असे एक कासार । शिवाळें नाम तया ॥ २२ ॥ तें तीर्थ महापुण्यपावन । तयामाजीं करितां स्नान । महा पातकें जाती हरोनी । जन्मोजन्मींची ॥ २३ ॥ असे पर्वत पाठारीं । भयानक महावन घोरी । तेथें लिंगस्थापना बरी । केली असे शिवगणराजे ॥ २४ ॥ वृक्ष भेदीत गेलें गगन । प्रवेश न होय चंडकीर्ण । तेथें पूर्वीच अधिष्ठान । असे गिरिजावराचें ॥ २५ ॥ तया कासारीं असे कमळिणी । हे ऐकूनी रायें श्रवणीं । आपणचि स्वयें जाउनी । तया पर्वता ॥ २६ ॥ तया तीर्थी करुनी स्नान । तीर्थींच्या उदकें घट भरून । करावया शिवाचें पूजन । दृढ भावें घेई राजा ॥२७॥ नित्य उठोनी प्रात:काळीं । आणूनियां सहस्र कमळीं । अर्पी शिवाचे मौळी । करुनियां दिव्य पूजा ॥ २८ ॥ त्यजून अन्नाचा अर्थ । फळ मूळ भक्षी नृपनाथ । पुत्रप्राप्तीलागी स्वार्थ । न धरी देहाचा ॥ २९ ॥ करुनियां तृणाची सेज । शिवालयींच राव निज । मुखीं स्मरे निज बीज । शिव शिव नाममंत्र हा ॥ ३० ॥ निकट मांडलें निर्वाण । तन मन धनेसीं शरण । जाला शिवपदीं लीन । जैसा तो भ्रमर ॥ ३१ ॥ पर्जन्यकालाचे अवसरीं । निसी येतसे अंधारीं । मेघ वर्षती जळधारी । महा नेटें ॥ ३२ ॥ गर्जना करिती थोर गगनीं । तेणें दणाणे मेदिनी । चपला पडती कडकडोनी । पृथ्वीवरी पैं ॥ ३३ ॥ परी भय न धरीच अंतरीं । पश्चात्तापें तापला थोरी । पूजेसी अंतर न करी । एकट वना जातसे ॥३४॥ कल्प धरितील श्रोते जन । राजा सांगितला पुण्यपावन । कीर्ति वर्णिली विख्यात पूर्ण । पूर्वीच्या रायासारिखी ॥ ३५ ॥ हा तर भक्त केवळ निधान । यासी कां न व्हावया संतान । मग किमर्थ तप आचरोन । कासया प्रयत्न मांडिला ॥ ३६ ॥ एक्या सुकृताच्या बळें । होती अवघीं सानकूळें । ऐसे बोलती वेद सकळें । शास्त्रादिकीं पुराणें ॥ ३७ ॥ तरी ऐकावे जी संत श्रोतीं । दशरथ राजा पुण्य कीर्ति । तया नसे जी संतती । पुत्रदु:खें विव्हळ ॥ ३८ ॥ मग तेणें ऋषी प्रसन्न करून । मागितले पुत्र निधान । श्रीकृष्ण तो अवतार पूर्ण । कां

हो गेला तपासी ॥ ३९ ॥ कष्टासारिखी फलप्राप्ती । देतसे मृडा-
णिपती । सत्य सत्य गा हे श्रोती । शास्त्रें बरवें शोधावें ॥ ४० ॥ लागली
शिवचरणाची आस । राजा मनीं जाला उदास । सर्वभावें पायांस । लक्ष लावी
गा ॥ ४१ ॥ शरीरीं वाढली रोमावळी । नखांच्या झाल्या चुंबळी । विभुती
लाऊनि सोज्वळी । झाला असे तपस्वी ॥ ४२ ॥ गिरिजा पतिव्रता शिरोमणी ।
परम चातुर्य लावण्यखाणी । सर्व भाव पतिठिकाणीं । मन जिचें सर्वदां ॥४३॥
उभयतां असे अति प्रीती । करी स्वामिचीच भक्ती । नेणे दुजयाची स्तुती ।
धन्य नारी पतिव्रता ॥ ४४ ॥ स्वरूपें सुंदर चंद्रकळा । भानु-आंगीं जैसी
किरळा । तैसी सगुणत्व वेल्हाळा । निर्मिली विधीनें ॥ ४५ निर्मावया काय
कारण । इचे उदरीं दिव्य रत्न । अवतरला शंकरगण । भविशोत्तर केलें हो
॥ ४६ ॥ अघटित ईश्वराची करणी । पूर्वींच ध्रुवपद निर्मुनी । ठेविलें होतें
अचळ करुनी । पुढें उत्पन्न केला तो ॥ ४७ ॥ भविष्यासारिखें होणार । करिती
तो जगदोद्धार । म्हणोनी भूतराया निर्धार । सुचविला भक्तीचा ॥ ४८ ॥
भूतेशराव गेला तपासी । भार्याही पश्चात्तापें तापली कैसी । भ्रतार गेला
अनुष्ठानासी । मी काय सुख भोगूं ॥ ४९ ॥ मग द्वारीं महावापिका जाण ।
तेथें असे जी देवीचें स्थान । थोर चमत्कारी म्हणऊन । करिती जाली काय
ती ॥ ५० ॥ तये शक्तीचा राउळा भीतरीं । स्थापिली असे हरगौरी । शिव-
पंचायतन बरवें परी । करुनी तेथें ठेविलें ॥ ५१ ॥ मंदिरासमीप तुळसी वृंदा-
वन । तेथें स्थापिलें शिवपंचायतन । सर्वभावेसी तल्लीन । जाली भक्तीसी ५२
गिरिजा मध्यरात्रीं उठोन । तया वापिकांत करितसे स्नान । भावें करितसे
पूजन । गौरीहराचें ॥ ५३ ॥ तें पूजन जाहालिया उपरी । वृंदावनीं असे
शिवगौरी । तयाची पूजा षोडशोपचारी । करी सद्भावेसी ॥ ५४ ॥ एक शत-
सहस्र प्रदक्षणा । आरंभीतसे वृंदावना । ऐसा नित्य नेम करी जाणा । प्रति-
दिनीं पै ॥ ५५ ॥ भ्रतार करी फळाहार । तैसेंच कांता वर्ते निर्धार । राव
तृणशेजे निरंतर । आपणाहि तैसें करीतसे ॥ ५६ ॥ पुत्रासाठीं उदासी । उभ-
यतांही जाली मानसी । सुखसंपत्तीच्या भोगासी । त्यजिलें कैसें ॥ ५७ ॥
काढून टाकिले अळंकार । मोकळे रुळती कबरीभार । उत्तम वस्त्रें पीतांबर ।
न सेवी तया ॥ ५८ ॥ मुखीं न खाय तांबुळ । नेत्रीं न लेई काजळ । पुत्रा-
साठीं तळमळ । शिवपदीं ऐकी जाली ॥ ५९ कोणी येके अवसरी । गिरिजा
असे निद्रसुरी । तुळसी येउनी स्वप्नांतरीं । तयेचे पैं ॥ ६० ॥ तयेनें उठवून

तयेसी । म्हणे वो तूं चिंता न करी मानसीं । स्वल्प काळाचे नेमासी । शिव इच्छा पुरवील ॥ ६१ ॥ गिरजा संतोषातें मानोन । शिवपदींच जाली लीन । सेवा करिती अति निकटीन । दृढ भावेसी ॥६२ ॥ उभयतांचा निश्चय एकच पूर्ण । जोडा नेमिला विधाविधान । भ्रतारभार्या तत्समान । न टळती नेमासी ॥ ६३ ॥ पूर्वीही ऐसे जोडे निर्मून । ठेविले होते चतुरानन । श्रियाळ चांगुणा दोघे समान । कैसें निर्मिले पैं ॥६४॥ हरिश्चंद्र तारामती । नळराय दमयंती । रुक्मांगद राजा यकादशी व्रतीं । नाहीं नेमा टळल्या त्या ॥ ६५ ॥ मयोरध्वजाची कांता । वेळुरायाची पतिव्रता । ऐसा निर्मिता तो विधाता । तैसीच हीं निर्मिलीं ॥ ६६ ॥ उभयतां दोघे शिवभक्ती । कैसी जाहली ते विरक्ती । मग कां स्वामी उमापती । कृपा न करी तयांवरी ॥ ६७ ॥ धन्य रायाचें अनुष्ठान । धन्य निर्मितां चतुरानन । धन्य स्वामी त्रिलोचन । ऐसी भक्ती करवीतसे ॥ ६८॥ वाढवावया भक्ताची कीर्ती । सेवा घेतसे गिरिजापती । श्रुतिशास्त्रें पुराणोक्ती । ऐसिया महिमा चालविल्या ॥ ६९ ॥ एरवीं भक्त काय करील पूजन । सर्व इंद्रियें तयाच्या स्वाधीन । कर्ता करविता जगज्जीवन । शूळपाणी समर्थ ॥ ७०॥ यालागीं न धरावा अभिमान । सर्व करविता त्रिलोचन । भूतराया गिरिजेसी निर्मून । सेवा कैसी घेतसे ॥ ७१ ॥ त्यजिलें परिवार सर्व सैन्य । राज्य व्यवहार संपूर्ण जाण । भ्रमित जाला भूतेशेन । शिवभक्तीसी सादर ॥७२॥ जाहाले बहुत दिवस । राजा न चुके नेमास । तेव्हां उद्भवलें हरास करावें विंदान ॥ ७३ ॥ नेमा न टळे भूतेश राजा । पतिव्रता निर्धारें गिरिजा । मग संतोषोनी महाराजा । कैलासीचा काय करी ॥ ७४ ॥ पाहावया निश्चयाचें बळ । कौतुक मांडिलें जास्वनीळ । राजा तोडित असतां कमळ । केलें अपूर्व ॥ ७५ ॥ महापर्वत दरींतून । व्याघ्र उठविला तो गर्जऊन । आला रायावर चालून । दंत वाजवी करकरा ॥ ७६ ॥ नृपें तयासीं देखोन । केलें साष्टांग नमन । म्हणे हा होईल पंचवदन । स्वामी माझा तो ॥ ७७ ॥ सर्व रूपें तोच आकार । नटला असे चराचर । त्याजवांचून विश्वंभर । दुजा कोण असे ॥ ७८ ॥ गगनीं पवनीं जीवनीं । अग्न काष्ठ स्थल पाषाणीं । अवघा व्यापिला शूळपाणी । भेऊं कवणासी ॥ ७९ ॥ ऐसा निश्चय पाहोन पूर्ण । व्याघ्र गेला गुप्त होऊन । राजा कमळें उदक घेऊन । येतां जाला पुजेसीं ॥ ८० ॥ लोटले द्वादश संवत्सर । कृपेनें द्रवला गौरीहर । म्हणे याचा दृढ निर्धार । असे मज भक्ती ॥८१॥ पार्वती म्हणे वो कैलासनायका ।

प्रसन्न व्हावें जी या सेवका। स्त्रीपुरुषांचा निर्धार देखा। एकच कैसा जड- ल्यासे ॥ ८२ ॥ कष्टविलें येणें शरीर। हा क्लेश पावला फार। आतां कां केला उशीर। यासी भेटी द्यावया ॥ ८३॥ शंभू म्हणे वो मृडायणी। हेचि असे माझिये मनीं। क्लेश पावले उभयतां प्राणी। आपुले भक्ति सादर ॥ ८४ ॥ आलें तपाचें अवसान। प्रगट झाला उमारमण। उमेसहित वरदान। द्याव- यासी आलें ॥ ८५ ॥ रायें दिव्य मूर्ति देखुनी। तेव्हांच नेत्र काढिले दोन्ही। अर्पिले शिवाचे चरणीं। घातला नमस्कार ॥ ८६ ॥ आनंत ब्रह्मांडींची फा- कली ज्योति। तंव झांकली होती रायाची नेत्रपांती। मग दिव्य नेत्र पशु- पती। देतां जाला तयासी ॥ ८७ ॥ म्हणे ऊठऊठ रे भक्तराया। कष्टलासी तूं गुणालया। आलों तुज भेटी द्यावया। माझिया निजभक्ता ॥ ८८ ॥ आणीक म्हणे चंद्रमौळी। त्वां मज वाहिलें सहस्र दळीं। तेणें शीतळ जालों मौळी। तुझिया सेवेसी ॥ ८९ ॥ मागुती म्हणे पंचवक्त्र। त्वां मज वाहिलें कमळ- नेत्र। तुज आक्षयीं दिव्य नेत्र। दिधले स्वरूप पाहावया ॥ ९० ॥ संतोषोन म्हणे गिरिजापती। तोषलों तुझिये भक्ती। जे कां इच्छा तुजप्रती। तो वर मागे मज ॥ ९१ ॥ हरुषें भरला राव पूर्ण। उभा टाकला कर जोडुन। स्त- विता जाला उमारमण। कवणेपरी तो ॥९२॥ जयजयाजी निराकारा। सगुण- रूपें तूंचि हरा। धावून भक्तकैवारा। रक्षिसीं तूं ॥ ९३ ॥ इंद्रादि देव पद- भ्रष्ट जाले। ते दिनानाथा तुज शरण आलें। स्वामिया त्वां पदीं स्थापिले। आक्षई देउनीं सुख ॥ ९४ ॥ जयजयाजी गणरूपा। जयजयाजी आनंत स्वरूपा। जयजयाजी त्रैलोक्यनृपा। अकळ कळा तुझी ॥ ९५ ॥ अवघे ब्रह्मांडीचे पुतळे। नाचाविसी एके कळे। तुझी माया कोणा न कळे। विरंची- दिकासी ॥ ९६ ॥ पंचतत्त्वें निर्मून। करिसीं सर्वांचें पाळण। आपण अचळ राहून। कौतुक पाहासी ॥ ९७ ॥ आनंत ब्रह्मांडें निरमिता। तीहीं लोकीं तुझी सत्ता। तुज ऐसा कोण दाता। असे देवा ॥ ९८ ॥ चंद्र ठेविला ल्लाटीं। वासुगीचे हार कंठीं। गंगा ठेविली मुगुटी। हें देणें तुझें ॥ ९९ ॥ न टळसी वचनार्था। न फिरविसी अगोचर मागतां। दशानना दिधली कांता। आपली त्वां स्वामियां ॥ १०० ॥ अवघ्या देवा कृपे करून। त्यांच दिधलीं पदभुवन। न वर्णवे तुझें महिमान। इंद्रादिकासी ॥ १ ॥ अवघे देव होउनि किंकर। वर्तती तंव आज्ञेधार। तूं अर्जीक दिगांबर। अससी सर्वां ॥ २ ॥ मुनिजन ध्यानातें जपती। सा अठरा गुण गाती। चौघाजणां पडली

भ्रांती । गुण तुझे वर्णितां ॥ ३ ॥ भागला सहस्र मुखाचा । मग हार जाला कंठीचा । तेथें एक मुखें माझी वाचा । काय ते वर्णु ॥४॥ ऐसी स्तुती शिवें ऐकून म्हणे संतोषलों तंव भक्ती पूर्ण । माग माग रे वरदान । जे कां अपेक्षा असे ते ॥ ५ ॥ अनंत ब्रह्मांडीची प्रकाशली ज्योती । मग दिव्य नेत्र दिधले पशुपती । तेणें पहातां जाला स्वरूपस्थिती । कवणेपरी शिवाची ॥ ६ ॥ पंचमुख दशभुजा । वामांगी असे गिरिजा । कर्पूरगौर महाराजा । देखिला कैसा ॥ ७ ॥ चंद्र शोभला लल्लाटीं । गंगा वाहे निर्मळ जटीं । फणिवराचें हार कंठीं । जडलें असें पै ॥ ८ ॥ कंठीं रुंडमाळांचे हार । आसन शोभे व्याघ्रांबर । कटीं पीतवसन पीतांबर । भस्म चार्चिलें सर्वांगा ॥ ९ ॥ पांघुरला गजचर्म । जाणें सर्वत्राचें वर्म । अवघ्या श्रेष्ठ पुरुषोत्तम ; जगद्गुरु तो ॥११०॥ नीळवर्ण नीळकंठ । छेदुनी अरीचे कंठ । भक्तजनां निकट । पाळण करी ॥ ११ ॥ तिजा नेत्र असे भाळीं । तो कल्पकाळाचें अंतकाळीं । करील ब्रह्मांडाची होळी । उघडील तेव्हां ॥ १२ २ ऐसें दिव्य स्वरूप पाहोन,। ध्यानीं बिंबलें तेंचि ध्यान । मग आनंदभरित होऊन । बोलता जाला ॥ १३ ॥ म्हणे जी स्वामी गिरिजारमणा । मज नाहीं पुत्रसंताना । म्हणोनी दृढ भावेंसी शरण । आलों तुज दयाळा ॥ १४ ॥ पुत्रेवीण व्यर्थ जीवन । ऐसें बोलतीं वेद पुराण । तेणें खेदातें पावें मन । माझें स्वामियां ॥ १५ ॥ दीपकावीण मंदीर । कां प्राणावीण शरीर । कीं सूर्यावीण अंबर । आंधार जेवीं ॥१६॥ पुत्रा ऐसें नसे फळ । तेणें चित्तीं वाटे तळमळ । तुजवांचून त्रिभुवनपाळ । हेत कोण पुरवां॥१७॥ पुत्र देईगा ऐसा शिवा । जो अजिंक्य असे सर्वां । मृत्युलोकीं कोणाच्या न देवा । न मरेचि॥१८॥ ऐसा देई वृषभध्वजा । कीं जो उद्धरी आपुल्या पूर्वजा । धर्मनीति धर्मकाजा । मति ज्याची असे कीं ॥ १९ ॥ तन मन धनेंसी शरण । तुझें ध्यानीं असो दे निमग्न । सदा सर्वकाळ असें मन । तुझिया पायांपासीं ॥ १२० ॥ नाहींतरी पुत्र जन्मले वंशासी । तेणें पूर्वज नेले नरकासी । चंद्रार्कवरी स्वर्वासी । भोगविती तया ॥ २१ ॥ ऐसा देई सुपुत्र । जो धर्म कर्मीं पवित्र । विनंती ऐका गा त्रिनेत्र । आणिक माझी ॥ २२ ॥ मज ऐसा देईं गा कुमर । कीं कल्युगीं भीमच साचार । कीर्ति तयाची पूर्वापार । चंद्रार्कवरी न वुजे ॥ २३ ॥ मग वर देई उमारमण । तुज ऐसेंच दिधलें पुत्रनिधान । जो माझा मल्लादि प्रियगण । तोचि येईल तव उदरा ॥२४॥ त्याचिये बळापुढें । देवदानव वे बापुडे । परि किंचित् प्रताप जनापुढें । दावील आपुला ॥ २५ ॥

पुरवीन तुमची आशा । सर्वेच नेईन कैलासा । तुज दोन पुत्र दिधले नरेशा। तें ऐक कैसे ॥ २६ ॥ एक प्रतापी होईल । एक मानवरूपें जन्मेल । कल्याणदायक एक नांदेल । एकच पुत्र तुझा ॥ २७ ॥ एक निमित्यासी कारण । एकाची वंशवृद्धि वाढवीन । त्याचें करीन मी पाळण । हा वर माझा ॥ २८ ॥ आणीक एक ऐक भक्तराया । धर्मनीति वंश चालिया । दुष्ट बुद्धि वर्तलिया। पीडा भोगतील ॥ २९ ॥ राव बोले कर जोडून । पीडा भोगविता आहे कवण । तुझें म्हणवितां दीन । हा अभिमान कवणासी ॥ १३० ॥ तुझिये सत्तेपुढें । इंद्रादि किंकर तेही बापुडे । अनंत ब्रह्मांडाची घडमोड । क्षणमात्रें करिसी तूं ॥ ३१ ॥ ऐसा तूं भक्तवत्सल त्रिलोचन । तुझिया सेवका गांजील कोण । कोपलें जरी त्रिभुवन । तरी रक्षिता तूं समर्थ ॥ ३२ ॥ तूं काळाचाही काळ । त्वांच निर्मिलें कळीकाळ । कैसें पंचाननाचें बाळ । जंबुक गांजी ॥३३॥ अगा कैलासनायका । तुझिया अंकित सेवका । इंद्राचाही नसे आवांका । विघ्न करावया ॥ ३४ ॥ अघटित ध्रुवाचें तप पाहोन । विघ्न करी पाकशासन । तितकीं निवारिलिया विष्णून । दास आपुला म्हणोनियां ॥ ३५ ॥ सांब म्हणेरे नृपनाथा । माझा मीच शिक्षा करिता । करिता हरिता तारिता । मीच असें सर्व पैं ॥३६॥ अभिमानी उन्मत्त भक्त जालिया । मीच शिक्षा करितों तया । शरण आलिया माझिया पाया । सुख देतों तयासी ॥ ३७ ॥ राव चरणीं माथा ठेवून । म्हणे तुझे पायीं जडो मन । जन्मोजन्मीं तुजवांचून । दुजा स्वामी नको ॥ ३८ ॥ मग म्हणे गौरीकांत । त्वां जे वर मागितले मातें । ते ते वोपिले दासा तूतें । माझिया निजभक्ता ॥३९॥ करीन वंशाचें पाळण । निर्वाणीं तया रक्षीन । ही भाक माझी पूर्ण । घेई निजभक्ता ॥१४०॥ ऐसा देऊन पूर्ण वर । अदृश्य झाला उमावर । राजा आनंदें निर्भर । आला मंदिरा ॥४१॥ स्त्रियेसी सांगितलें वर्तमान । शिवें पुत्र दिधले दोन । दोघें आनंदभरित होऊन । असती सर्वदां ॥ ४२ ॥ ऐसा विरुपाक्ष झाला प्रसन्न । दिधलें भूतेशराया वरदान । पुढें उत्पन्न करील नंदन । ते परियसा जी ॥ ४३ ॥ शिवाचे चरणीं लक्ष जडोन । आनंदें गेला निर्भर होऊन । याजपेक्षां सुख पूर्ण । कोणतें असे श्रोतिया ॥ ४४ ॥ इतिश्री भूतेश आख्यान । वदविलें शिवकृपेन । श्रोते होऊन सावधान । रसाळ कथा परिसावी ॥ १४५ ॥

# अध्याय तिसरा.

—✽✽—

श्रीगणेशायनमः। जयजयाजी शंकरा। जयजयाजी दशकरा। जयजयाजी पंचवक्त्रा। पुढें ग्रंथ बोलवी ॥१॥ एके दिनीं कैलासभुवनीं। बैसली असे वो शिवभवानी। पर्वकाळ प्रदोषदिनीं। असे ते समयीं ॥ २॥ आवघे देव कैलासासी। येते झाले दर्शनासी। ऋषि ब्रह्मा सुरवरेसी। येतां जाला सचिनाथ ॥ ३ ॥ शिवअंकीं दाक्षायणी। असती आपुले स्वस्थानीं। अवघे देव कर जोडुनी। उभे राहिले द्वै भागीं ॥ ४ ॥ रंभा ऊर्वशी मेनका। आल्या अष्टहि नायका। नृत्य करोनी त्रिपुरांतका। भाव दाविती परोपरी ॥५॥ पुढें करिती गायन। नारद तुंबर गंधर्वगण। समीप पादुका घेऊन। मळगण प्रतापी ॥ ६ कुंचा ढाळी शिवावरी। आनंदें असे निर्भरी। अवघे गर्जती जयजयकारी। हरहर शब्दें म्हणोनियां ॥ ७ ॥ वाद्यें वाजती नानापरी। नृत्याच्या दाविती कळाकुसरी। गायन करिती अलाप चारी। शिवस्तुति अपूर्व ॥ ८ ॥ तेणें तोषला उमारमण। आनंदातें पावलें मन। तंव झालें स्मरण। कैसें निजभक्ताचें ॥ ९ ॥ मग सांब म्हणे वो प्रियगणा। त्वां जावें मृत्यु भुवना। जन्म घ्यावा मम आज्ञा। सांगतों त्या ठायीं ॥ १० ॥ भीमेगोदेच्या मध्यभागीं। मांडव्य स्थान प्रसिद्ध जगीं। तयाच्या येथें भक्तीलागीं। असे वो मी अक्षयीं ॥ ११॥ तया ठिकाणीं भक्ती निर्वाण। केली असे भूतरायान। भ्रतारभार्येचा निश्चय पूर्ण। माझे ठायीं जडला असे ॥ १२॥ पाहून तयाचिये भक्ती। संतोषलों फार चित्तीं। पुरवावया मनोवृत्ती। देता झालों पै वर ॥१३॥ मी झालों तया प्रसन्न। वर वोपिला तया लागुन। त्वांच पुत्र व्हावे म्हणऊन। वचन गेलेरे दासा ॥१४॥ त्वां तयाचें उदरीं जन्मोन। प्रताप करून तोषवावें मन। पस्तीस वर्षें भरता जाण। सवेंच आणीन कैलासा ॥ १५ ॥ आणीक ऐकरे प्रिय सेवका। तूं अजिंक्य सुरनायका। किंचित प्रताप मानवलोकां। दाउनी यावें पुढती ॥ १६ ॥ तया मृत्युलोकामाझारीं। तुज भिडेसा नाहीं समरीं। ऐसा कोण पृथ्वीवरी। नाहीं त्वरित जन्मला ॥१७॥ येरु म्हणे त्रिपुरांतका। मी न जाय मृत्युलोका। अंतरतील तुमचिया पादुका। दिनानाथा स्वामियां ॥ १८ ॥ तुम्हांवीण क्षणभरी। मज न गमे त्रिपुरारी। जळा वेगळा मच्छ

निर्धारीं। कैसा होय परता ॥ १९ ॥ शिव म्हणे गा भक्तटिळका। तुज न विसंबें बाळका। तूं माझा प्राणसखा। तुजवांचून न गमे ॥ २० ॥ तेथेंही माझें अभंगस्थान। नित्य होईल दरुषण। भूतनाथ स्वरूपें प्रसन्न। होईन मी तुजसी ॥ २१ ॥ मग विलोकुनी गौरीहाराचें वदन। प्रेमें पाझरती लोचन। म्हणे जी स्वामी कृपाघन। केव्हां आतां भेटसी ॥ २२ ॥ मिठी घातली चरणासी। आळंगिलें सप्रेमेसीं। सोडावे ऐसें मानसीं। न वाटे गा स्वामियां ॥२३॥ मग तया मुखावरूनी हस्त। कुरवाळीतसें उमाकांत। म्हणे रे बाळका जाइ त्वरित। तुज न मी विसंबें ॥ २४ ॥ पुढती नमस्कार घालून। धरिलें गौरीहराचें चरण। म्हणे स्वामी आज्ञा प्रमाण। मज न विसरावें ॥२५॥ चित्तीं म्हणतील श्रोतेजन। ऐसा प्रतापी कोण गण। ऐका सांगतों तुम्हांलागून। सावध होऊन परिसावें ॥ २६ ॥ वशिष्ठा घरीं यागाकारण। मिळालें होतें त्रिभुवन। ऋषि सुरवर चतुरानन। आले होते हरिहर ॥ २७ ॥ नव्हते तेथें दोघे जण। सूर्य आणि सहस्रवदन। पृथ्वीस आधार तयापासून। म्हणूनियां ते न आले ॥ २८ ॥ मग स्वयें वसिष्ठऋषी जाऊन। आणिता जाला भानु कारण। आपली कांती तेथें ठेऊन। प्रतिसूर्य दुजा केला ॥२९॥ मग जाऊन पाताळ भुवना। आणिता जाला सहस्रवदना। दर्भसीका मंत्रून जाणा। धीरा दिला पृथ्वीसी ॥३०॥ ऐसा सामर्थी ब्रह्मनंदन। तोही करितो शिवाचें ध्यान। ब्रह्मा देव ऋषि निर्मून। कोणी स्थापिलें पदासी ॥ ३१ ॥ ऐका भगवंत विंदान। जळीं कैसें तरले पाषाण। मर्कटा हातीं राक्षस वधून। लंका कैसी घेतली ॥ ३२ ॥ सत्ताधारी त्रिलोचन। कोणाच्या सत्तें चाले जन। मशका हातीं त्रिभुवन। जिंतवील क्षणार्धे ॥ ३३ ॥ मग हा तर तयाचा सेवकगण। हा अजिंक्य शिवाचे सत्तेन। कोण म्हणेल अप्रमाण। स्वरवीं बुडावया ॥३४ आतां असोत हे दृष्टांत। पुढें जो घडेल वृत्तान्त। जें का आकारा आलें त्वरित। तें कथानक परिसावें ॥ ३५ ॥ शिवाचे वरदें करोनी। कांता झाली गर्भिणी। नव मास भरतां जननी। प्रसवली बाळका ॥३६॥ पोटीं आलें परम निधान। जो नीलग्रिवाचा प्रियगण। जे कां कीर्तीचें भूषण। तोचि आला आकारा ॥ ३७ ॥ पितया समाचार कळला। दिव्य पुतळा पोटीं जन्मला। आनंदें जैसा उचंबळला। श्रीराम होतां दशरथा ॥ ३८ ॥ द्वारीं मंडप उभाविले। धरामर बहुत मेळविले। बंदीचें दुष्ट सोडविले। जे कां होते अधर्मी ॥ ३९॥ हत्तीवर घालूनि शर्करा। वांटीतसे नगरीच्या नारीनरा। वाद्यांचा घोष अं-

बरा । नाद जाये ॥ ४० ॥ नृत्याची कीर्ती ऐकोन । मिळाले बहुत ब्राह्मण । मग वांटिता जाला दान । कवणेपरी ॥ ४१ ॥ द्रव्याच्या भरूनी मुठी । हरुषें विप्रास वांटी । झाली याचकांची दाटी । मिळाले अपार ॥ ४२ ॥ वांटिली धेनूची खिल्लारें । आणीक अर्पिली मंदिरें । सुवर्णाचीं भरूनी पात्रें । दिलीं सत्पात्रा ॥ ४३ ॥ पाहोनियां धर्मनीती । दानें करितसे भूपती । याचक झाले तृप्त चित्तीं । जाते झाले निजघरा ॥ ४४ ॥ वस्त्रें अर्पिलीं सर्व नगरीं । सदाशिव पूजिला महा गजरीं । मेळऊन अवघ्या नगरनारी । नाम ठेविलें मळोजी ॥ ४५ ॥ फोडूनी द्रव्याचीं भांडारें । याचका वांटिली नृपवरें । उच्छव केला महागजरें । तो असो आतां ॥ ४६ ॥ जैसा उगवला गभस्ती । पळोपळ फाके ज्योती । याच प्रकारें दिवसराती । वाढो लागला नंदन ॥ ४७ ॥ पंच वरुषाचा जाला नंदन । रायें केलें मौंजी बंधन । मग वाटलें पितया कारण । करावा विवाह ॥ ४८ ॥ बोलाऊन बंदिजन ब्राह्मण । राजा आज्ञापी तयाकारण । वधु पाहून सुलक्षण । योजून आणावी ॥ ४९ ॥ आज्ञा मानून दोघेजण । तेव्हांच निघाले तत्क्षण । आनंदातें बहुत पावोन । बहु त्वरेनें चालिले ॥ ५० ॥ फिरती नाना देशांतरीं । पहाती राजियांच्या कुमरी । परी सुलक्षण जोडा अंतरीं । न भरेचि पैं तो ॥ ५१ ॥ सप्तश्रीरंग देशीचा भूपती । तयाची कन्या केवळ गुणवंती । जोडा नेटका मळोजीप्रती । योजून आले पुरोहित ॥ ५२ ॥ करूनि लग्नाची सामुग्री । भूतरावो गेला तया नगरीं । पुत्रसोहळें दिवस चारी । यथाविधि संपादिला ॥५३॥ तो समीप असे पंचवटिका स्थान । गोदावरी तीर्थ महा पावन । मग आठवलें राजियाकारण । तीर्थयात्रा करावी ॥ ५४ ॥ लग्नासह कुटुंबानिसी । भूतराव जाऊन जनस्थानासीं । तीर्थयात्रा करून सावकाशी । जाते जाले कुशावर्ता ॥ ५५ ॥ करुनी कुशावर्ताचें स्नान । गंगाद्वारीं आदि करून । श्रीत्रिंबकराजाचें पूजन । केला दिव्य अभिषेक ॥ ५६ ॥ दान धर्म केला अपार । तोषविले धरामर । ब्रह्मगिरीची प्रदक्षणा निरंतर । केली तीन दिन ॥ ५७ ॥ तंव मळोजी म्हणे वो ताता । ब्रह्मगिरी कैसा वरुता । तो जाऊन पाहावे चित्ता । असे माझें मानस ॥५८॥ मग म्हणे पिता पुत्रालागून । हा साक्षात् पंचवदन । यासी पाय लागतां दूषण । असे गा बाळका ॥ ५९ ॥ तंव मळोजी पुसे पितया लागून । पाषाणस्वरूपें देव व्हावया काय कारण । भूतोजी म्हणे ऐक सावधान । सांगतों तुज॥६०॥ एकदां ब्रह्मियाचे घरीं । याग हवन मांडले थोरी ।

समस्त देव ऋषि मंडपामाझारीं । बैसले होते ॥ ६१ ॥ ब्रह्मा कनिष्ठ स्त्रियेसी घेऊन । करीत होता पुण्याहवचन । मग श्रेष्ठ स्त्री कोपातें पावोन । शापिलें अवघ्यांसी ॥ ६२ ॥ कीं तुम्ही ऋषि इंद्र सुरवर । श्रेष्ठ तुम्ही हरिहर । मार्गाचा टाकूनि निर्धार । भ्रमित कैसें जाहला हो ॥ ६३ ॥ मी विधीची वरिष्ठ अंगना । मजसीं सांडूनियां भुवना । कनिष्ठ स्त्री पुण्याहवचना । श्राध्य कैसी केली हो ॥६४॥ तरी ऐका माझें शापदान । ऐसें भ्रमित तुम्ही अवघे जन । नदी आणि पाषाणरूप होऊन । अक्षयीं पडाल पृथ्वीवरी ॥ ६५ ॥ इनें शापावया काय कारण । म्हणऊन हरिहर पाहाती विचारून । कीं काय निमित्य जाहलें हें विघ्न । स्तब्ध जाले अवघेंचि ॥ ६६ ॥ मग देवासी जालें स्मरण । नाहीं केलें गणेश पूजन । याचसाठीं जालें विघ्न । भयातें पावलें सर्वही ॥ ६७ ॥ मग आणोनियां गजवदन । स्तविता जाला चतुरानन । तोषऊन तयांलागून । कार्य चालविलें मखाचें ॥६८॥ तीचिया शापास्तव जाण । नदी पाषाण अवघेजन । जाले हें तुजलागून । सांगितलें रे बाळका ॥ ६९ ॥ मग निघते जालें तेथून । आलें नगराकारण । शिव वेताळाचें दर्शन घेऊन । वधुवरा मिरविले ॥ ७० ॥ मग असती स्वस्थानीं । आणीक स्त्रियां दोघी जणीं । करूनी आंगना तिघी जणीं । दिल्या मळरायातें ॥ ७१ ॥ सप्त वरुषाची जाली मूर्ति । मग आठवले तया चित्तीं । प्रसन्न करूनियां भूतपती । मागावें बळ ॥ ७२ ॥ जन्मावें जयाच्या वंशाप्रती । ह्याची वाढवावी सत्कीर्ती । नाहींतरी ऐसे पुत्र किती होती । जे नाम न घेइजे कोणी ॥ ७३ ॥ जयाचें पुत्र व्हावें । तयां सुख दाखवावें । तरीच पुत्रपणा बरवें । म्हणावें तयां ॥ ७४ ॥ मीं पितयास व्हावयासाठीं । नेत्रकमळें पूजिला धूर्जटी । निर्धार करूनियां महानिकटीं । आराधिलें शिवातें ॥७५॥ पित्राचें व्हावें उत्तीर्ण । मनोरथ तयाचा करावा पूर्ण । जेणें तोषें उमारमण । तेंच करूं आतां ॥७६॥ मातापितयां ऐसें दैवत । दुजें नाहीं गा जाण सत्य । श्रीरामें मानून वचनार्थ । सेविलें वन ॥ ७७ ॥ पुंडलीक महा पितृभक्त । मातापितयाची सेवा करीत । तयाचें दर्शन घ्यावया वैकुंठनाथ । आला माघारा ॥ ७८ ॥ हस्त ठेवोनी कटावरी । उभा चंद्रभागे तीरीं । ऐसी पितृसेवेची थोरी । वर्णिती श्रुति ॥ ७९ मग मध्यरात्रीं उठोन । संगमीं करीतलें स्नान । ह्या इंद्राच्या शापेंकरून । आल्या मृत्युलोकां ॥ ८० होये तयाच्या देवांगना । अपराध आचरल्या तयाचा जाण । मग तये शापितां चरणा । लागल्या पात्रा ह्या॥८१॥सचिरमणास

कृपा येऊन। उःशाप दिधला यांजलागून । तुम्ही मृत्युलोकीं नदीरूप होऊन । असावें तेथें ॥८२॥ तुमच्या संगमीं करितां स्नान । तो प्राणी होईल पावन । आस्ती जातील जिरोन । अद्यापीवरी असे साक्ष ॥ ८३ ॥ सांगतां या क्षे-त्राचें महिमान । कथा विस्तारेल बहुत जाण । ऐकतां मांडव्य आख्यान । पूर्ण होय मनोरथ॥८४॥मळोजी वेताळभक्ति करीत । तालीम खेळे अहोरात्र। कळो नेदी कोणासी मात । आपुले सेवेची ॥ ८५ ॥ सेवा द्वादश वर्षे जाली। भक्तीची अवधी पुरली । भूतनाथा कृपा आली । प्रगटला तेथें ॥ ८६ ॥ देवें मनुष्यवेष धरिला । त्याजसवें खेळों लागला। मळोजी म्हणे तूं कोण वहिला। सांग मजसीं ॥ ८७ ॥ तंव तो म्हणे मी मनुष्य । नित्य येतो तालिमीस । आज आलों सावकाश । म्हणोनि देखिलें तुज ॥ ८८ ॥ ऐसें दोघेहि प्रती भिडती । परी कोणी कोणासी नाटोपती । एके दिवशीं दाविली प्रचीती । त्या भूतनाथें ॥ ८९ ॥ आपण खालीं पडला । मळोजी उदरावरी घेतला । मस्त-कीच्या रोमां हात घातला । तेव्हां मळोजीनें ॥ ९० ॥ बळकट धरियेली झोटी । कदा न सोडी मिठी । मग वेताळ म्हणे भेटी । दिधली तुज ॥ ९१ ॥ देई केसासी सोडून । काय इच्छित तुझें मन । तेंचि प्राप्त तुजलागून । करितो बाळका ॥ ९२ ॥ मळोजी म्हणे तूं कोण । येरु म्हणे तूं पुजितोसी कवणालागून। ज्याची भक्ति मांडिली निर्वाण । तोचि वेताळ पैं मी ॥ ९३ ॥ मळोजी म्हणे तूं वेताळ म्हणविसी । तरी स्वरूप तें आपुलें दाविसी । आलिया माझ्या प्रचीतीसी । मग वर मागेन ॥९४॥ मग मळोजी परता जाला । तो अग्नीचा कल्लोळ उठिला । दिव्य स्वरूप होऊन बोलिला । तया देवासी ॥ ९५ ॥ विनवितसे कर जोडून । आतां पूर्ववत् ऐसें होई स-गुण । जाला माझा मनोभाव पूर्ण । स्वरूप तुझें पाहातां ॥ ९६ ॥ भक्त-आज्ञा मुगुटीं मानून । पूर्ववत् ऐसा जाला सगुण । म्हणे माग तुझें इच्छीत मन। तेंच प्राप्त करीन ॥ ९७ ॥ मग बद्धांजुळि उभा ठाकून । तुझे पायीं जडो जी मन । सर्वदां असो तुझें ध्यान । मम हृदयीं ॥९८॥ मज ऐसा वर देई देवा। मी अजिंक्य असें सर्वां । माझा पार न कळे मानवा । बळाचा जी पैं ॥९९॥ मग भूतभैरवें कृपा करून । तीन ताईत काढिले मुगुटांतून । दोहीं भुजांत घातले दोन। एक मस्तकीं घातला ॥ १०० ॥ पूर्वफळ आलें काजा । प्रसन्न जाला भूतराजा । रुद्रस्वरूपी महाराजा । भेद नाहीं तयासी ॥ १ ॥ आणीक मळोजी विनवीत । चंद्रार्क वरी माझी कीर्त । चालो द्यावी जी भूतनाथ ।

..ला माथा ठेऊन । विनवी देवालागून । करी वंशाचें पोळेणी । परंपरा ॥ ३ ॥ लावी गा आपुले भक्ती । तुज कदां न विसरती । ऐसें करी भूतपती । दयार्णवा ॥ ४ ॥ वेताळ म्हणे मळोजीलागून । त्वां जें मागितलें वरदान । तें तें सर्व सिद्धि नेईन । सत्य सत्य त्रिवाचा ॥ ५ ॥ आदृश्य जाला भूतनाथ । मळोजी आला ग्रामांत । कोणासी हें नसे श्रुत । कौतुक पैं ॥६॥ ऐसा श्रीवेताळ प्रसन्न करून । मळोजी आनंदातें पावोन । सर्वदां असे निमग्न । तया रुद्रकृपें ॥ ७ ॥ अशंका धरितील श्रोतेजन । कीं पहिलाच प्रतापी शिवगण । मग श्रीवेताळ प्रसन्न करून । ताइताचें किमर्थ कार्य ॥ ८ ॥ तरी ऐकावें चित्त देऊन । शिवाचा अवतार पंडुनंदन । तरी 'कां धनुर्विद्या द्रोणापासून । कासया घेतली ॥ ९ ॥ सेवा करुनी तयाची । कार्यें संपादिलीं विद्येचीं । महिमा वाढविली गुरुत्वाची । ऐसें ते पांडव ॥ १० ॥ नररूप तो अर्जुन । कृष्ण तोचि नारायण । उभयतां स्वरूप एकचि पूर्ण । तया मृत्यु कैचा ॥ ११ ॥ तरी कां अमरावतीचा इंद्र भिकारी । होऊन पातला कर्णाचे द्वारीं । कवच कुंडलें याचकापरी । कैसी घेतलीं मागोनी ॥ १२ ॥ कुंतीस कृष्णानें पाठवून । घेऊन गेला पांच बाण । वाचवावया अर्जुनाचा प्राण । कां उपाय केला तो ॥ १३ ॥ संग्रामीं किरीटीस पंचवदन । शूरत्व देखोनि जाला प्रसन्न । पाशुपतास्त्रें तयालागून । काय कारणास्तव दिधलें ॥ १४ ॥ अमरलोका नेला अर्जुन । सुरेशें घेतलें कार्य करून । अगाध अस्त्रें तयालागून । देतां जाला शचिनाथ ॥ १५ ॥ श्रीकृष्ण तो परमात्मा अवतार पूर्ण । भिऊन कैसा जरासंधा कारण । निमिष्यामाजीं द्वारकापट्टण । सागरांत रचियलें ॥ १६ ॥ ओस करुनी मथुरा नगरी । नेऊन ठेविली तया माझारीं । पाठी देऊन पळाला समरीं । काळयवन भस्म केला ॥१७॥ पांडव ते हररूप जाण । कृष्ण तो आदिनारायण । त्रिभुवनाचा आकार कोणापासून । मग ऐसी करणी हो ॥१८॥ दुष्ट सत्वगुणें त्याचें कर्तव्य । अवतारासारिखा दाविती भाव । तयासी वधावया कौरव । अगाध होते कवण ते ॥ १९ ॥ भूतनाथ तो पंचवदन । वाढवावया भक्ताचें महिमान । ताईत अर्पिले तयालागून । शक्ति दिली अपार ॥१२०॥ समाप्त जाला अध्याय पूर्ण । पुढें ऐका निरूपण । कैसा प्रताप वाढविला शिवान । तो आतां परियेसा ॥ २१ ॥ शिवापंकजीचा मिलिंद । होऊन सेवितसे आमोद । सर्वदां असे आनंद । तो रस सेवुनियां ॥२२॥ हें तर पूर्वजाचें ठेवण । जें कां अनंत सुखाचें निधान । प्राप्त जालें जी कृपेन । मग तया सुखा पार नाहीं ॥ २३ ॥ इतिश्री भूतेश आख्यान । वदविलें शिवें कृपेन । श्रोते होउनीयां सावधान । पुढें कथा परिसावी ॥ १२४ ॥

# अध्याय चवथा.

—❀*❀—

श्रीगणेशायनमः । श्रीसरस्वत्यै नमः । श्रीगुरुभ्यो नमः ॥ जयजयाजी चंद्र भूषणा । जयजयाजी संकटनाशना । जयजयाजी भवदुःखहरणा । पुढें ग्रंथ वदवी ॥ १ ॥ हरि विधी इंद्र सुरवर । हे सर्व तुझे आज्ञाधार । कळासूत्रीं तूं दिगांबर । वर्तविसी स्वइच्छा ॥ २ ॥ शेष केला पाताळपती । सहस्रनेत्र केला सुरपती । तैसें मळोजीस केले प्रतापकीर्ती । पृथ्वीपाळा जिंकावया ॥ ३ लोटले कांहींएक दिवस । पिता म्हणे मळोजीस । प्रपंचीं संसारास । चित्त नसे कां तुझें ॥ ४ ॥ ऐकोनी पितृवचना । न कळतां गेलासे वना । वृक्ष भेदीत गेले गगनां । तें उपटून टाकिलें ॥ ५ ॥ अवघे वृक्ष जमा करून । बागाभोंवतें गराडा घालून । जना प्रचित दाखवावी म्हणोन । कौतुक केलें ॥ ६ ॥ प्रातःकाळीं उठोन बनकरी । जात जाले वो झडकरी । तो देखिली नवलपरी । आश्चर्य केलें ॥ ७ ॥ धांवत आलें अवघें जन । रायास जाणविलें वर्तमान । पाहावया गेलें मिळोन । नगरलोक पैं ॥ ८ ॥ देखोनि आश्चर्य सर्व करित । म्हणती आला असेल हनुमंत । किंवा जन्मला असेल पंडुसुत । त्यांजवांचून नव्हे हें ॥ ९ ॥ कीं सुर किंवा असुर । छायेसी क्रीडावया नि-र्धार । आला असेल यालागीं विचार । जाणविला तेणें ॥ १० ॥ सायंकाळीं या मार्गान । मळोजी देखिला येतान । तेणें केलें हें विंदान । दुजियाची सत्ता नव्हे ॥ ११ ॥ एक सत्य मानिती । एक असत्य वदती । एक म्हणती ईश्वर-गती । न कळे कोणा ॥ १२ ॥ वार्ता फांकली देशांतरासी । लोक धांवती पाहावयासी । नवल मानूनी मानसीं । स्तब्ध होती पैं ॥ १३ ॥ परचक्रें येती ग्रामावरीं । त्यांस येकला जिंकी समरीं । संपत्ती हिरोनी आणी घरीं । आप-ल्या सामर्थें ॥ १४ ॥ जेंवी गोपाळ पहिलवान । त्याचा चालों नेदी अभिमान मग तयेसी शरण । मळोजी पाया ॥ १५ ॥ आधीं करूं तुझें स्मरण । तव खेळावयां प्रवर्तू जाण । चालऊं हें वरदान । तुझें परंपरा ॥ १६ ॥ आविंध पातशाहा अमदानगरीं । दक्षिण देशींचें राज्य करीं । सैन्य असे लक्ष चारी । त्याजपासीं पैं ॥ १७ ॥ बहिरी निजाम नाम साजे । एकछत्री करी राज्य । धर्मनीती धर्मकाज । चाले जो कां ॥ १८ यवन याती अति दुष्ट जाण ।

परी करी प्रजाचें पाळण । त्याचें येथें असे ठाण । मांडव्यगणीं पै ॥ १९॥ तयाचा सेवक एक निरंतर । असे एथें अमलदार । तयातें स्वहस्तें करभार । वोपितसे राजा ॥ २० ॥ पूर्वी पातशाही बेदर । पुढें निर्मिलें अमदानगर । बहिरी निजाम निरंतर । येथेंच राज्य करी ॥२१॥ राज्य करी राजेंद्र । म्हणवी दक्षणेचा इंद्र । पक्षियांमाजीं खगेंद्र । तैसा भूपाळ शिरोमणी ॥ २२ ॥ ऐकोनी तयाचा दर्प । शत्रु चळचळा कांपे । सख्यत्व करुनी समीप । सेवा करुनी असती ॥ २३ ॥ कित्येक पराभविले देशांतरा । वसती जाऊन गिरिकंदरा । पडो नेदी तयाचा वारा । ऐसें भय पाळिती ॥ २४ ॥ विशेष पाहून तयाचा प्रताप । अवघे सेवक जाले भूप । ऐसा तो प्रतापस्वरूप । जन्मला म्लेंच्छ कुळीं ॥ २५ ॥ परचक्राची संपत्ती । मळोजीनें आणिली होती । ती मागो लागली दुष्ट याती । ग्रामांतील अम्मलदार ॥ २६ ॥ वृक्ष उपटिले हें वर्तमान । लिहिलें होते पातशहा लागोन । परि उपटिलें हें ठिकाण । कळला नव्हता ॥ २७ ॥ परचक्राची संपत्ति न ये हाता । मग कोप चढला तयाच्या माथा । तंव जाला अर्जी लिहिता । सविस्तर स्वामीसी ॥ २८ ॥ येथील जमीदारा पोटीं । जन्मला असे बलाढ्य जेठी । शक्तीची संख्या सांगतां मोठी । तरी वृक्ष उपडिले ॥ २९ ॥ हा प्रत्यक्ष भासतो काळ । बुडविली पातशाही सकळ । करील तुमचें निर्मूळ । भासतें मला ॥ ३० ॥ होय भूतरायाचा नंदन । प्रताप आगळा पंचानन । न लेखी कवणालागून । तुच्छप्राय मानिती ॥ ३१ ॥ जन्मला उमरावाच्या पोटीं । परी न आणी पातशाही दृष्टी । ऐकतां तयाच्या गोष्टी । पातशाही भंगीन ॥ ३२ ॥ पत्र ऐकतां सविस्तर । निजामाचा उतरला चंद्र । मग पुसतां जाला विचार । उमरावांसी पैं ॥ ३३ ॥ म्हणे ऐसा जन्मला बलाढ्य । तरी कोण ठरेल तया पुढा । करील राज्याचा भवाडा । क्षण न लागतां ॥३४॥ मग रुस्तुमखान बोले वजीर । पातशाहा तुम्हीं धरावा धीर । जेठी पाठवुनी सत्वर । आणवितों तया ॥ ३५ ॥ मग चौघे मल्ल तयार केले । मांडवगणासी पाठविले । ते द्वारामाजीं उतरले । मळोजीच्या ॥ ३६ ॥ मळोजीनें कौतुक केलें । वारू पारावर टेविले । झग्याचे दावण गुंतविलें । कैसें ते मल्लाचें ॥ ३७॥ न कळत तयां लागून । पाईचें अंगुष्ठें स्तंभ उचलून । गुंतविले तयाचे दावण । कैसी केली करणी ही ॥ ३८ ॥ लोणी पावटे मेळऊन । दिधले तया भक्षण । तंव ती जातां निसटून । न चुरती तया ॥३९॥ मळोजी बैसोन तया समोर । लोणी पावटे केलें चूर । मग ते पाहून चमत्कार ।

भेटावया उठिले ॥ ४० ॥ तों दावण खांबाखालीं गुंतलें । ते म्हणती हे नवल कैसे जालें । मळोजीनें अंगुष्ठें स्तंभ उचलिलें । दिधलें तया आलिंगन ॥ ४१ ॥ तया उत्तम भोजन घालून । दिधलें वस्त्रप्रावर्ण । बाहेर तयासी आला घेऊन । तों घोडे देखती पारावरी ॥ ४२ ॥ मग उतरून दाखविलें तयासी । तों जाते जाले नगरासी । बोलती तेव्हां एकएकासी । हा शक्तीनें कैसा येई ॥ ४३॥ रायाशी जाणविलें लवलाही । त्याच्या शक्तीचा पार नाहीं । तो बुडवील पातशाही । सत्वर करावा उपाय ॥ ४४ ॥ मग सहस्र मनुष्यें बोलाऊन प्रधान । तयासी आज्ञापी स्वयें आपण । शक्ती करून आणावें बांधोन । विलंब न करावा ॥ ४५ ॥ मळोजीनें प्रचीत दाखवावयासी । बंधन करूं दिधलें भुजासी । सवेंच भुजा आसडितां सर्वांसीं । मृत्युपुरा पाठविलें ॥ ४६ ॥ हेंही सकळ गेली मात । दक्षिणराया पडिली भ्रांत । प्रधानासी विचार पुसत । कवणें रीति पै ॥ ४७ ॥ राजा म्हणे सिरपाव पाठऊन । यावें तयांसी घेऊन । बळ प्रताप पाहावा पूर्ण । आपलें दृष्टीं ॥ ४८ ॥ सिरपाव पाठविले मळोजीसी । त्वां यावें भेटावयासी । आपेक्षा असे बहु मानसीं । तुज पाहावयाची ॥ ४९ ॥ पाहून पत्राचा अर्थ । मळोजी हरुशला चित्तांत । याच निमित्यें वाढवावी कीर्त । पूर्ण आपुली ॥५०॥ मग करूनियां विचार । रात्र जालासे तयार । मातापितयाच्या चरणावर । मस्तक ठेवी ॥ ५१ ॥ पातशाहाचें बोलावण । आलें असें मजलागून । माझेंहि असें मन । तेथें जावया ॥ ५२ ॥ तयांसी भेटावयां । आज्ञा द्यावी पितृराया । तुमच्या आशिर्वादें सर्व कार्यां । भय न धरी ॥ ५३ ॥ मजवरी असो द्यावी माया । म्हणोनि पुढती लागला पायां । पिता म्हणे पुत्रराया । आतां केव्हां भेटसी ॥ ५४ ॥ तुमची माझी भेट । करणार स्वामी जटाजूट । वेगींच येईन निकट । सवेंच माघारा ॥ ५५ ॥ पिता म्हणे घात करावयासी । नेतो ऐसें माझे मानसीं । मग तुजवांचून परदेशी । दिसों की रे ॥ ५६ ॥ तुजविसीं तपोवना । पूजिलें त्या त्रिनयनां । मज टाकून तूं नंदना । चालिलासी कैसा ॥ ५७ ॥ तुज ऐसा पुत्र व्हावा म्हणोनी । नेत्र अर्पिले शिवाचें चरणीं । आतां केव्हां पाहूं नयनीं । सांग बाळका ॥ ५८ ॥ तुजसाठीं चंद्रमौळी । पूजिला रे सहस्र दळीं । पुत्रा हृदयें कळवळी । तव दुःखें करूनियां ॥ ५९ ॥ मातें पाई ठेवोनि डोई । म्हणे मज आज्ञा देई । तंव ती म्हणे मज लोटुनी डोहीं । कोठें जातोसी ॥ ६० ॥ सांगत होतें तुजलागून । नाहीं बळाचें कारण ।

याचविशीं आलें विघ्न । तूझिया जिवासीं ॥ ६१ ॥ मज हरिणीच्या पाडसा । टाकोन जातोस कवण्या दिशा । तुज पडेल काळाचा फासा । मग पाहूं रे कोठें ॥ ६२ ॥ आम्हां आंधळियाची काठी । कैसी चालविली धूर्जटी । मग पडूं रे संकटीं । कंटकवना ॥६३॥ तुज ऐसा पुत्र व्हावया । आराधिलें कैला-सराया । टाकून जातोस प्राणसखया । आम्हांलागीं कैसा तूं ॥ ६४ ॥ आ-विंध घात करावया । तुज नेतो मळराया । मग आम्हीं वांचूनियां । काय मेळविलें ॥६५॥ तुज टाकून क्षणभरी । बाळा न मी राहें घरीं । येते तुझ्या बरोबरी । माझिया तान्हया ॥ ६६ ॥ अवश्य म्हणे माते प्रती । गिरजाबाई जाली निघती । मग आज्ञा मागोनियां पितयाप्रती । बोलता जाला ॥ ६७ ॥ पातशाहाचें चित्तीं माझा घात । तरी मजला रक्षील भूतनाथ । तो शूळपाणी स्वामी समर्थ । तेथें हें मश्यक काय करी ॥ ६८ ॥ मिळाले राजे कोट्यान-कोटी । तरी मी संग्रामीं एकलाची निवटी । ऐसा वरप्रताप नीळकंठीं । दिधला असे भूतेशें ॥ ६९ ॥ होय कैलासीचा राजा । जया म्हणती वृशभ-ध्वजा । तोच भूतेशस्वरूपीं महाराजा । पावला मजसी ॥ ७० ॥ मजसी भिडावया । आवांका नसे मानवा । मी अजिंक्य असे सर्वा । ऐसी कृपा हराची ॥७१॥ मी तर तयाचा प्रियगण । मजसी युद्ध करील कोण निर्वाण । हा तर त्याचा त्यास अभिमान । आपुलया ब्रीदाचा ॥ ७२ ॥ तुम्ही कां व्यर्थ करितां चिंता । मजसी सर्वस्वीं तो रक्षिता । पिता म्हणे सत्य वचनार्था । पुत्रा तुझ्या मानिलें ॥ ७३ ॥ मजसी प्रसन्न व्हावया तुज वेळे । ऐसाच वर दिधला जाश्वनीळें । परी एक कांहीं बोलिला तेणें तरमळे । चित्त माझे बा-ळका ॥ ७४ ॥ पुत्र म्हणे तुमचें तुम्हां स्मरण । कैसें असेल शिववरदान । तेंच असावें चित्तीं धरून । पाहावें कौतुक ॥ ७५ ॥ परी मी पातशाही निमर्वीन । आवघे दुर्ग दासळीन । न येतां सव्वा प्रहर दीन । मृगजळा ऐसें ॥ ७६ ॥ भूतोजी म्हणे गा बाळका । जमीदारीस परिणामीं धोका । तुज नसे गा अ-थांका । विघ्न करावया कोणाचा ॥ ७७ ॥ जरी कोपला सचिरमण । काळ-कृतांत आले मुख पसरून । तरी निर्भयीं गा माझें मन । रक्षिता समर्थ म्हणोनियां ॥ ७८॥ जरी विघ्नें कडकडोनी आलीं निकटीं । तरी तो निवटील घाय वाटीं । रक्षिता ऐसा तो धुर्जटी । सर्वांमाजीं श्रेष्ठ पैं ॥७९॥ परी संदेह असे माझे मनीं । वरदान बोलिलो पिनाकपाणी । थोडकें आयुष्य तुजलागुनी निवेदिलें होतें ॥ ८० ॥ याउागीं कळवळे माझें मन । मज न जाइरे टाकून ।

म्हणून आश्रूनें भरले नयन । तेव्हां रायाचे ॥ ८१ ॥ श्वास उश्वास टाकोन । आलंगिलें तयालागून । तुज ऐसें पुत्रनिधान । पाहूं कोठें कीं ॥ ८२ ॥ कैसें गा स्वामी त्रिलोचना । चालविलें बा पुत्रनिधाना । सांगितलें विंदाना । करिसी काय गा ॥ ८३ ॥ पितियासी मळोजी कर जोडून । म्हणे मी सत्वरच येईन परतोन । मज रक्षील तो सिद्धेश्वर जाण । चिंता न करावी ॥ ८४ ॥ पातशाहासी अर्जवून । ग्रामदेश मागण । एरव्हीं नव्हे तें कारण । तेथें जावयाचें ॥ ८५ ॥ पितृचें करूनि समाधान । साठ रणशूर संगें घेऊन । जैसा दशरथा आयोध्येस टाकून । श्रीराम गेला वनासी ॥ ८६॥ जैसा रघुनंदन जातां वनाप्रती । दशरथा शोक अतिप्रती । तैसी जाली गा गती । भूतरायासी पैं ॥८७॥ किंवा रुसून जातां ध्रुव बाळ । उत्तान पिता दुःखें कल्लोळ । ऐसा पुत्रासाठीं विव्हळ । पडिलासे राजा ॥ ८८ ॥ सिद्धेश्वर वेताळाचें दर्शन । घेउनी चालिला नृपनंदन । माता गिरजा संगें घेऊन । चालता जाला ॥ ८९ ॥ वना जातां रघुवीर । पाठीं लागलें आयुध्या नगर । कृष्णासी नेतां मथुरेस अक्रूर । गोपी पाठीं लागल्या ॥ ९० ॥ तैसें जालें नृपनंदनाप्रती । नगरलोक मागें धांवती । मग तयांसी विनवुनीयां बहुता रीतीं । माघारें फिरविले ॥९१॥ दुंदुभी बाजे खणखणा । घाव घातला निशाणा । हळहळ वाटे नगरजना । केव्हां देखूं पुढती ॥ ९२ ॥ मळराव तुरंगीं बैसोन । नाचवी जैसा शामकर्ण । वाद्यें वाजती अपूर्व जाण । यंत्रधारी गर्जती ॥ ९३ ॥ समागमें असती शूर । निधडियाचे महावीर । शस्त्रें भेदिलें जरी शरीर । तरी शूरत्वा न ढळती ॥९४॥ एके पंक्ती करिती भोजन । रायास न विसंबती एक क्षण । कीं ते झुंजार होय निर्वाण । याळागीं मान पाळितसे ॥ ९५ ॥ एक रायाच्या पंक्ती बैसोन । करिती उत्तम भोजन । संकटीं रणीं टाकून । आपण पळती दशदिशा ॥ ९६ ॥ एक बैसोन शेजारीं । गोष्टी सांगती थोरथोरी । युद्धसमय पडतां समरीं । असत्य दुखणें काढिती ॥९७॥ एक थरथरा कांपून । बळेंच आणिती स्फुरण । युद्ध पडिलिया निर्वाण । ओढे ओहोळ धुंडिती ॥ ९८ ॥ तैसें नव्हे गा वीर । हे रायाचे झुंजार । याचा असे हो निर्धार । पूर्ण मरणाचा ॥९९॥ अवघे असती तुरंगवहनीं । घोडे असती नाना वर्णी । देशोदेशींचे प्रयत्न करूनी । आणिले होते बैसावया ॥ १०० ॥ शृंगारिले अति कौतुकें । जीनास जडिलें माणिकें । सडका तुऱ्यासी नृपनायकें । मुक्ताफळें वोविलीं ॥१॥ तयावरुतें राऊत राणे । कैसें ल्याले आभरणें । चिलखाद टोप पाखराणें । भयासुर दिसती ॥२॥

जडलीं असे सप्त शस्त्रें । शूरत्वें जालीं रक्तनेत्रें । दुजया लेखिती जैसें कीं मंत्रें । ऐसें वीर पाळिले ॥ ३ ॥ घोडे नाचविती वेळोवेळा । दाविती आपलाली कळा । फेरिता म्हणती पाताळा । किंवा आकाशीं उडऊं ॥ ४ ॥ तोषविती रायाचें मन । युद्धीं वेंचितील प्राण । कोण करूं शके निर्वाण । तयां शूरांसी पैं ॥ ५ ॥ ऐसे वीर समागमें घेऊन । मळराव जातसे भेटीकारण । मज जालें असें स्मरण । दृष्टांत एक द्यावया ॥ ६ ॥ पृथ्वीवरी सोडिला शामकर्ण । समागमें घेऊन अपार सैन्य । निघाला दशनाम तो अर्जुन । भूपाळांलागीं जिंकावया ॥७॥ सारथी जाला नारायण । ध्वजस्तंभीं वायुनंदन । आणीक वीर संगें घेऊन । पृथ्वीपालाटणा जातसे ॥ ८ ॥ बैसले गजतुरंगरथीं । राजे चालिले असे भारती । त्याचपरी ऐकावें श्रोतीं । मळराव जातसे ॥ ९ ॥ पार्थाचा सारथी होऊन कृष्ण । जिंतविलें भूपाळांलागोन । याचा सारथी उमारमण । तैसींच परी दाविली पैं ॥ ११० ॥ धन्य स्वामी नारायण । उद्धरिलें आजामेळालागून । धन्य स्वामी त्रिलोचन । पारधी नेला कैलासा ॥११॥ भक्त सखे उभयजन । दोघेहि पतितपावन । कैसें उद्धरिलें अहिल्यालागून । एकीं चंद्र वंद्य केला ॥ १२ ॥ एक लेतसे सर्पभूषण । एक करी तयावर शयन । एके छळिलें मयोरध्वजाकारण । एकीं शिबीस छळियलें ॥१३॥ ऐसें दोघेहि दीनोद्धार । भक्त तारिले अपार । इकडे मळराव सत्वर । क्रमिता जाला मार्ग पैं ॥ १४ ॥ शिवचरणाची धरूनि आस । आनंदभावें शरण असे । न पडे भवकाळाचा फांस । निश्चयें दृढ राहेलिया ॥ १५ ॥ इतिश्री भूतेश आख्यान । वदविलें शिवकृपेन । श्रोते होऊन सावधान । रसाळ निरूपण परिसावें ॥११६॥

# अध्याय पांचवा

श्रीगणेशाय नमः। जयजयाजी पंचानना। जयजयाजी व्याघ्रांबरभूषणा। जयजयाजी गिरिजारमणा। पुढें ग्रंथ वदवीं ॥ १ ॥ जयजयाजी त्रिभुवननायका। जयजयाजी भक्तपालका। प्रताप देउनी सेवका। अद्भुत कीर्ति वाढविसी ॥ २ ॥ मळोजी आला हें वर्तमान। कळलें पातशाहा लागून। तेणें पाठविलें मंत्रीकारण। सन्मान करुनी आणावया ॥ ३ ॥ परी प्रधान मंत्री कपटी पूर्ण। आले युद्ध सामुग्री घेऊन। घ्यावया मळरायाचा प्राण। कैसें सैन्य येतसें ॥ ४ ॥ पुढें चालती पायभार। मागें तुरंगीं असती वीर। गजस्कंदीं महावीर। बाण शस्त्रें घेऊनिया ॥ ५ ॥ रथीं असती बळी पठाण। बाण सामुग्री बहुत घेऊन। धनुष्यें हस्तीं घेतली चढऊन। त्वरित युद्धें करावया ॥ ६ ॥ उल्हाटयंत्रें थोरथोर। जुंपिले वृषभ अपार। लोटिती गज देऊनी शीर। गोलंदाज फिरंगी ॥ ७ ॥ समुद्रबेटीच्या व्याति यवन। कपितान हापसान। नाना ज़ाती अर्बुज जाण। नृपा संग्रहीं असती हे॥ ८ ॥ मोगल गोरे गाजरे। दिसती उग्र बावरे। मोठे मोठे ढबरे। गजस्कंधीं बैसले ॥ ९ ॥ घोडे देशोदेशींचे। हत्ती वनोवनींचे। आणिले होते नजरेचें। पातशाहालागीं नृपानीं ॥ १० ॥ शिपाई बैसले खड्ग उपसून। घोडे उडवीत जाती गगन। म्हणती जाऊं स्वर्गभुवन। ऐसें आम्हां वाटतें ॥ ११ ॥ माहोत गज धांवविती। महा नेटें किंकाळती। घंटानाद घनानिती। मुक्त झालरी लाविल्या ॥ १२ ॥ वर चवर ढोल शोभती। मध्यें राजे डोलती। मागें चवरे ढाळिती। सेवकजन बैसोनियां ॥ १३ ॥ ध्वजा लाविल्या हत्तींवरी। चमकत चालल्या अंबरीं। जरबात जरतारी। कुळ्यासारिख्या निर्मिल्या ॥ १४ ॥ संवले तोड मीद बांधोन। मस्त जाले सुरापान। भुलून आणिती स्फुरण। कोल्हाट्यासारिखें ॥ १५ ॥ धांवोनियां यंत्रधारी। सैन्य चालविती बरोबरी। मार्ग न मिळे हो धरित्री। त्वरे त्वरे चालावया ॥ १६ ॥ सैन्य चालले तुंबळ। एकच जाला हलकल्लोळ। तेणें दणाणिला भूमिगोळ। जैसा सागर फुटला ॥ १७ ॥ धुरोळा उडाला गगनोदरीं। छाया पडिली पृथ्वीवरी। सूर्य झांकोळला अंबरीं। तैसेंपरी दिसतसें ॥ १८ ॥ प्रधान म्हणे सर्व सैन्या। घेऊन जाईन स्वर्गभुवना। ऐसें वा-

टतें माझिया मना । भविष्यार्थ दिसते हो ॥ १९ ॥ श्रोते म्हणतील असत्य चित्तीं । कासया हे बदलेती । कोठें मार्ग स्वर्गपंथीं । कैसें सैन्य जाईल ॥२०॥ तरी ऐकावें श्रोते जन । भविष्य ऐसें घडेल जाण । बरवें पाहावें विचारून । बारीक दृष्टी करूनियां ॥ २१ ॥ भविष्यासारिखें कंसासुरीं । घडिले होतें मथुरापुरीं । अशुद्धाचें पर्जन्य तयावरी । अवकाळीं पडिलें होतें ॥ २२ ॥ इकडे दळभार चालला महा घोरी । तंव दुश्चिन्ह झालें कवणेंपरी । खासें निषाण जर्तारी । भंगून पडिलें भूतळीं ॥ २३ ॥ जालेसें टुकडे चारी । भंगल्या नौबदी भेरी । मोडली चवर ढाल छत्री । तया मंत्रीची ॥ २४ ॥ तंव राजे म्हणती अपशकुन । जाले आम्हां दुष्ट चिन्ह । एक म्हणती जावें फिरोन । आपल्या नगरासी ॥ २५ ॥ तंव म्हणतसे प्रधान । तुम्हीं राजे प्रतापी पूर्ण । काय पातशहा कारण । जावोनियां सांगाल ॥ २६ ॥ समरांगणीं आला शक्र चालोनी । तरी सैन्य बळें जिंकीन रणीं । काय अपशकुन लेखितां मनीं । द्वादश उमराव तुम्ही हो ॥ २७ ॥ तेथें मळोजी असेल पाहिलवान । जिंकील काय इतकियालागून । क्षणामाजीं नेऊं धरून । पातशाहासी दावावया ॥२८ विराटा घरीं कीचका लागुन । जाले होते अपशकुन । नाहीं मानलें तयान । शेवटीं मृत्यु पावला ॥ २९ ॥ शुशुपाळ जातां कौंडण्यपुरा । शकून जाला तया वरा । नाहीं फिरला माघारा । शेवटीं अपेश पावला ॥ ३० ॥ घोषयात्रेस जातां दुर्योधन । तया जाले अपशकून । नाहीं मानलें तयान । शेवटीं अपेश पावला ॥ ३१ ॥ जयद्रथ जातां विवाहकार्यां । चुकून आला पांडवा ठायां । घेऊन जातां तयाची जाया । तया जाहाली विटंबना ॥ ३२ ॥ तरी इतकियां जाले अपशकून । परी नाहीं मानलें तयानं । गेलें अहंकृती भुलोन । शेवटीं पावले अपेश ॥ ३३ ॥ यालागीं ऐकावें चतुर जन । जालिया जरी अपशकुन । न जावें कार्या लागून । जावें फिरोन माघारे ॥ ३४ ॥ द्वारकेसी जातां सुदामा ब्राह्मण । तया जाले उत्तम शकुन । देवें दिधलें राज्य संपूर्ण । तया गुरुबंधूसीं ॥ ३५ ॥ धनसंपत्ती दिधली अपार । हस्ती तुरंग धेनुखिल्लार । तयां दिधलें सुवर्णनगर । द्वारावती दुसरी ॥ ३६ ॥ भारतीं युद्ध करावया । गेले द्रौपदी वरावया । तैसी गती श्रोते राया । यासी होईल पुढारी ॥३७॥ त्याबरी चतुरंग दळ । प्रधानें लोटिलें सकळ । तों अवचित उगवला काळ । सैन्यसागरीं अगस्ती ॥ ३८ ॥ देखिलें मळपायालागून । स्तब्ध जालें अवघें सैन्य । यासी दृष्टांत द्यावा कोण । तो परियेसा जी ॥ ३९ ॥ विराटनगरीं पंडुनंदन । तेथें जाऊन कौरव जन । केलें

होतें धेनुहरण । अपार गोधनें वाळिलें ॥ ४० ॥ तये वेळ ब्रह्मन्नळा-र्जुन । घेऊन उत्तरासी रथीं बैसवून । तये वेळें ऐसेंच सैन्य । भ्यालें होतें तयांसी ॥ ४१॥ तैसीच जाहाली येथें गती । बारा राजे विचार करिती । प्रधान म्हणे तुम्ही बळी भूपती । प्रतिज्ञापूर्वक रायाचे ॥ ४२ ॥ तुमचीयानें प्रताप बळ । राव जाला दाक्षिण भूपाळ । जिंकिलें असे पृथ्वीपाळ । आतां सामर्थ्य कोठें तें ॥ ४३ ॥ ऐसें वदतां प्रधान । नृपासी आलें स्फुरण । फुगलें जैं समस्त वारण । परी सिंह ग्रासील पैं ॥ ४४ ॥ एक म्हणती म्यां प्रतिज्ञा करून । दिधलें किल्ले गड घेऊन । एक म्हणती पृथ्वी जिंकोन । म्याच पातशाहा स्थापिला ॥ ४५ ॥ ऐसें एकएकासी वेवादती । परी कोणी कोणासी न ऐकती । तेथें मळोजी ते बापुडे किती । नेऊं शीर कापुनी ॥ ४६ ॥ ऐसें अभिमानी उन्मत्त । आपुलाले पुरुषार्थ वर्णीत । जैसें कां कौरव होते भोगीत । अभिमान द्रौपदी स्वयंवरीं ॥ ४७ ॥ द्रौपदीचियां स्वयंवरीं । राजे द्रौपदनगरीं । कौरव यादव श्रीहरी । पृथ्वीपाळ मिळाले ॥ ४८ ॥ तेथें द्रौपदरायान । पण केला अती कठीण । तेव्हांही अभिमान । दृष्ट अभिमानी भोगिती ॥ ४९ ॥ तो पण पाहिला अती कठीण । न भेदवे कवणाच्यान । उठिला होता दुर्योधन । तो फजीत पावला ॥ ५० ॥ मग उठला होता अर्जुन । तेणें भेदिला मच्छनयन । आले होते राजे चालोन । पंडुसुतें पराभविलें ॥५१॥ तैसें बारा राजे मिळोन । वेढिती जैसा पंचानन । तंव मनीं विचारी भूतनंदन । कौतुक याचें पाहावें ॥५२॥ उल्हाट यंत्राचा मार । एकदांच केला भडिमार । तेणें दणाणिलें अंबर । मेदिनी कंप जाहला ॥ ५३ ॥ ढांसळती नगरचीं मंदिरें । मनुष्यें दडपती एकसरे । वर्षला जैसा कहरे । उर्वी जाय रसातळा ॥५४॥ धुमें कोंदल्या दाही दिशा । पायक स्मरती जगदीशा । चहूंकडून वर्षाव करिती नरेशा । मग तो काय करी ॥५५॥ स्मरणीं स्मरला गौरीहर । कोपला जैसा कल्पांत रुद्र । प्रचंड उपटुनी तरुवर । जैसा वृकोदर दिसतसे ॥ ५६ ॥ निवटूं लागला सर्व सैन्य । कुंजर दिधलें भिरकाऊन । अश्वरथ पदांती जाण । रगड्या सरसी निमाल्या ॥ ५७ ॥ युद्ध झालें महा दारुण । दशदिशा पळालें सैन्य । कित्येक मृत्युदशा पावोन । रणांगणीं मृत्यू पावले ॥ ५८ ॥ रणीं घायाळें घुमती । परि कोणी न उठवी तयांप्रती । पिता बंधू टाकून जाती । प्राण आपुलें वांचवावया ॥ ५९ ॥ अशुद्धाचे पूर वाहाती । कित्येक मुखीं तृण धरिती । शरण शरण तुज म्हणती । रक्षी रक्षी दयाळा ॥ ६० ॥ आमुचा घात कासया क-

रिसी। जेणें युद्ध करावयां आणिलें तुजसी। ते पळाले दशदिशेसी। गरीब अनाथा कां मारी॥६१॥ युद्ध जाहालें घोरांदर। यशवंत जाहला भूतकुमर। पुष्पें वर्षाव करिती सुरवर। आनंद थोर वर्तला॥ ६२॥ पाहून प्रताप अती दारुण। आश्चर्य करिती सर्व जन। म्हणती शिवकरणीं अघटित पूर्ण। ब्रह्मादिकां आगम्य॥ ६३॥ लंकाहास्तीं अमरस्थान। जिंतवील अवघे त्रिभुवन। अनंत इंद्र ब्रह्मे निर्मुन। करणी करून दाविता॥६४॥ त्याचिये सत्ते करून। पदांकित शचिरमण। कळासूत्री त्रिलोचन। भक्तमहिमा वाढवी॥६५॥ ऐसी शिवभक्ताची महिमा ऐकुन। आनंदें शिवचरणीं जाला लीन। म्हणे सर्वदा असो हेंचि ध्यान। दृढनिश्चयेसी॥ ६६॥ इति श्रीभूतेश आख्यान। वदविलें शिवेकृपेन। श्रोते होऊन सावधान। पुढें कथा परिसावी॥ ६७॥

---

## अध्याय सहावा.

श्रीपार्वतिरमणाय नमः॥ जयजयाजी पंचवक्त्रा। जयजयाजी त्रिनेत्रा। जयजयाजी कळसूत्रा। कैसा भक्त निर्मिला॥ १॥ जयजयाजी मदनदहना। जयजयाजी असुरमर्दना। जयजयाजी दीनोद्धारणा। पुढें ग्रंथ बोलवी॥ २॥ आगस्तीपासून सागरा। प्राशविलें त्वां त्रिशुळधरा। शेषापासून मस्तकीं धरा। धराविली त्वां नीलकंठा॥ ३॥ ऐसी देऊनियां अद्भुक्त शक्ती। वाढविली दासाची कीर्ती। तैसें मळोजीच्या स्वहस्तीं। सैन्य त्वां निर्दाळिविलें॥४॥ घायाळें गेली नगराप्रती। श्रोणित भडभडां वाहती। हें देखोनी राव चित्तीं। मग पुसता जाहला॥ ५॥ कैसें जालें वर्तमान। ऐसें व्हावया काय कारण। त्यासी युद्ध केलें प्रधानें। म्हणोनियां हे गती॥ ६॥ करावया तुमचें निर्मूळ। ईश्वरें निर्मिला काळ। दूर असतां जवळ। मृत्यु कैसा आणिला॥ ७॥ आपुल्या गृहा लावूनि अग्न। त्यामाजीं घेतलें कोंडून। निद्रिस्त असतां पंचानन। जागृत कां केला॥ ८॥ कीं विदेहकुमरी नेऊन रावण। कुळासहित आणिलें मरण। श्रीकृष्ण कंसें नेऊन। सध्या मृत्यु पावला॥ ९॥ कीं हिरण्यकश्यपें प्रल्हादा छळून। नारसिंव्हें केलें विदारण। तैसें राया त्वां नेणोन।

विघ्न कैसें आणिलें ॥ १० ॥ तयासी देखोनी प्रधान । सैन्य उठविलें चहूं-कडून । मार दिला तया दारुण । निश्चळ उभा राहिला ॥ ११ ॥ शस्त्र न भेदें तयांसी । यंत्र न लागे अंगासी । करणी करितां जाला कैसी । नृपा ऐका ॥ १२ मग क्रोधें खवळला बळसागर । विशाळ उपटिला तरुवर । मेघा ऐसा गर्जोन थोर । पेटला सैन्यमारा ॥ १३ ॥ दिधली भयानक आरोळी । तेणें वीरांचीं शस्त्रें गळाली । कित्येका मूर्छना आली । मृत्युदशा ऐसी ॥ १४ ॥ नव्हे तो मानव । दिसें जैसा रणभैरव । किंवा जन्मला देव दानव । म्हण-उनी कळा ही ॥ १५ ॥ यासी कोण हातोफळी । ऐसा कोण आहे बळी । नसेल या भूमंडळीं । ऐसें वाटतें ॥ १६ ॥ प्रतापतेजें जैसा तरणी । महा-वीर झोडिलें रणीं । अशुद्ध लोटले धरणीं । तया प्रतापें ॥ १७ ॥ शक्ती तमे बहु आगळा । पार नसे त्याचिया बळा । हा जिंतील भूगोळा । ऐसें वाटतें ॥१८॥ सुरा असुरांवाचोनी । यांसी भिडेल कोण रणीं । नव्हें मानव करणीं तयाचें अंगीं ॥ १९ ॥ जैसें एकल्या आगस्तीनें । केलें समुद्राचें आचमन । तैसें तुझें राया सर्व सैन्य । विभांडिलें यानें ॥ २० ॥ किंवा हा किंचित अन्न । राज्य दग्धील तुझें पूर्ण । हें नव्हे असत्य गा जाण । बरवें राया विचारी ॥ २१ ॥ कंसा रावणाचा दृष्टांत । तुज राया दिधला निश्चित । तेंच फळ घडेल त्वरित । दिसतें आह्मां ॥ २२ ॥ तैसें राजीया त्वां केलें । कैसीया त्यासी आणिलें । कोणी तुज सुचविलें । ऐसी ही बुद्धी ॥२३॥ त्यासी मनुष्य जगत्र म्हणत । परी हा जन्मला वायूसुत । किंवा जन्मला पंडूसुत । तुमचा घात करावया ॥ २४ ॥ सैन्य अश्व कुंज रथाटी । सर्व निवटिले बळाच्या नेटी । त्या भेणें बारा वाटी । कितेक पळाले दशदिशा ॥२५॥ कितीक दडाले गिरीकपाटे । कित्येक निमाले वृक्ष चपेटे । कित्येक मेले सैन्य दाटे । आटलें सैन्य अवघेंही ॥ २६ ॥ आह्मां रणीं सांडून । राजे पळाले वांचवावया प्राण। न धरिती कोणी कोणालागुन । पाहूनियां प्रताप ॥ २७ ॥ यासी भिडेल ऐसा क्षेत्रीं । नसेल आतां या धरित्रीं । कैसा निर्मिला कळासूत्री । त्या ईश्वरें २८ नृपा तुज मरण जवळ आलें । नाहींतरी शरण जाये वहिलें । ऐकतां मन दचकलें । थोर भूपाचें॥२९॥नगर हाडवलें समस्त । कोणी न धरिती कोणात । वे सर्व नृपें करुनी शांत । आश्वासन दिधलें ॥ ३० ॥ म्हणती राया हें विघ्न । कैसें आणिलें आम्हां लागुन । कैसा रक्षील भगवान । आम्हां आतां ॥ ३१ ॥ मग यंत्रधारी पाठऊन त्वरित । दौंडी पिटविली नगरांत । सह्य करूनी

मलोजीतें। आणितो राजा ॥ ३२ ॥ तेव्हां नगरलोक स्वस्थ राहिले। आपटाले बेव्हार करूं लागले। म्हणती कौतुक पाहूं डोळें। कैसें होईल तें ॥३३॥ रणीं पळाले भूपाळ। ते मिळोनी एकमेळ। ते रायें बोलाविलें सकळ। जाले लज्जित ॥ ३४ ॥ मग सेवक राजे थोर थोर। राजा पुसे तयासी विचार। यासी करिता जरी वैर। तरी बरवें नसे ॥ ३५ ॥ तुम्ही माझे बारा उमराव। तुमच्यानें मी दक्षिणराव। तुमचें अंगीं प्रताप शूरत्व। ते तुम्ही पळाला ॥ ३६ ॥ मग कवणाच्यानें बळें। त्यासी युद्ध करूं तुंबळ। हा जन्मला असे काळ। राज्य भक्षावया ॥ ३७ ॥ किंवा माझी सुकृतरासी। आली असेल सरावयासी। म्हणऊनी राजरासी ही विवसी। निर्मिली देवानें ॥ ३८ ॥ वृक्ष उपडिलें हे ऐकून। चमत्कार वाटला मजलागुन। मग बळाची संख्या कोण। सांगा नृप हो ॥ ३९ ॥ म्हणउनी त्यां भेटी कारण। आणविले होवे तयां लागुन। तुम्ही कासया युद्धनिर्वाण। केलें तयासी ॥ ४० ॥ मग जवळ बोलाऊन प्रधान। त्यासी अज्ञापी राव आपण। मलोजीस सख्य करून। आदरें करूनी आणावा ॥ ४१ ॥ तों अस्ताचला गेला वासरमणी। मलोजी राहिला रणस्थानीं। क्रमिली तेथें एक रजनी। तों मित्र उगवला ॥ ४२ ॥ मग उठोनी भूतनंदन। नित्य नेमा कारण। करिता जाला शौच स्नान। अरुणोदयीं ॥४३ भस्म सर्वांगा चर्चून। रुद्राचें लेला लेपण। करिता जाला लिंगार्चन। पार्थीव जें कां ॥ ४४ ॥ करुनीयां दिव्य पूजन। ध्यानीं आठविलें स्वामीचें ध्यान। मग करिता जाला विसर्जन। देवपूजेचें ॥४५॥ दानधर्म केला अपार। ल्याला वस्त्रें अलंकार। भोजन करुनीयां सत्वर। सिद्ध जाला ॥ ४६ ॥ बाजी घारराव मेहुणा। होता मलरायाचा जाणा। त्यानें नेउनी एकांत स्थानां। बोले मलोजीसी ॥ ४७ ॥ ममतेनें सांगे विचार। पातशाहासी जडलें वैर। म्लेंच्छ अविवेकी दुराचार। घात करील कपटत्वें ॥ ४८ ॥ विश्वासून आणिलें भेटीकारण। घात करावया पाठविलें सैन्य। याचे पोटीं कापट्य पूर्ण। जावें फिरोन माघारें ॥ ४९ ॥ पूर्वी ऐसेंच कापट्येंकरून। पांडवां जिंतोन दुर्योधन। यज्ञसेनीस विटंबून। वनवासा दवडिलें ॥५०॥ कापट्यें लाखाजोहार निर्मून। पांडवांसी नेलें सन्मानून। निशीमाजीं लाविला अग्न। कैसें दुष्टानें ॥५१॥ पंडुसुत असतां हेडंबवनीं। बकासुरें ऋषिवेष धरुनी। घेऊन गेला आपुलें स्वस्थानीं। घात करावया ॥ ५२ ॥ ऐसें दुष्टाचे अवगुण। घात करावया सन्मानून। याजविशीं जावें फिरोन। आपल्या मामासी ॥५३॥ ऐसें ऐकतां

हास्य करून । मळोजी बोले तयाकारण । तुम्हीं माझा प्रताप देखोन । कैसें जाला भ्रमित ॥ ५४ ॥ ऐका मी व्हावया कारण । माझीया तीर्थरूपान । आराधिला उमारमण । पैं मार्गे जावया ॥ ५५ ॥ नाहीं दिधला ऐसा वर । वदला असे कर्पुरगौर । संग्रामीं असेल सुर असुर । तरी जिंतीन पैं ॥ ५६ ॥ भूतनाथस्वरूपें उमारमण । कृपेन मज जाला प्रसन्न । तेव्हांहि ऐसेंच वदला वचन । तेथें मशक काय ॥५७॥ येथें तर मानव लोक । तयाचा कोण मानी धाक । मज रक्षिता त्रिपुरांतक । तेथें हे किती ॥ ५८ ॥ जो कां इंद्रादि इंद्र । जयाचे मस्तकीं असे चंद्र । कंठीं जयाचे फणींद्र । तो स्वामी माझा ॥ ५९ ॥ अनंत ब्रह्मांडें जयाचे पोटीं । तेणेंच रचिली हे सृष्टी । जयाची आज्ञा परमेष्टी । वंदी माथा ॥ ६० ॥ त्याचीये सत्येंकरून । वर्तत असे सर्व जन । तो मज रक्षिता पूर्ण । व्यर्थ चिंता करूं नका ॥ ६१ ॥ तंव प्रधान सामोरा येऊन । भेटला तयाकारण । वस्त्रें अलंकार अर्पून । बोलता जाला ॥ ६२ ॥ जोडुनीयां दोन्ही कर । उभा राहिला समोर । विनंति करी शब्दें मधुर । ते कैसी ऐका ॥ ६३ ॥ राजा भेटीस असे उदीत । क्षणक्षणा वाट पाहात । तुम्हां ठाईं असे जी प्रीत । पुत्रन्यायें ऐसी ॥ ६४ ॥ मग करुनीयां सन्मान । नेतां जाला भेटीकारण । राव भद्रासन मांडून । आडवां आला ॥६५॥ प्रीतीनें देऊन आलिंगन । केलें बहुत समाधान । वस्त्रें अलंकार अर्पून । बोलता जाला ॥६६॥ तुझा बळप्रताप ऐकोन । इच्छीत असे माझें मन । कौतुक पाहावया तुजलागून । आणिलें असे बाळा ॥ ६७ ॥ मग राहावया दिधलें मंदीर । येथें राहावें मास चार । इच्छा पुरलिया सत्वर । आज्ञा देऊं ॥ ६८ ॥ मळोजीस आज्ञा दिधली । सभा विसर्जन जाली । मातापुत्र दोघें राहिली । अमदानगरीं ॥ ६९ ॥ दक्षण दिशेचे भूप मिळोनी । असती रायाचे सेवेलागुनी । ते मेळउनी सभास्थानीं । बैसला असे नृप तो ॥ ७० ॥ तंव उठोनि दुष्टमती प्रधान । तया नाम रुस्तुमखान । बोलता जाला कर जोडून । कैसा तो स्वामीसी॥७१॥ माणीकमल शक्तिपूर्ण । तो भिडावा मळोजीलागून । कौतुक पाहावें समक्ष दृष्टीनें । तुम्ही जी भूपनायका ॥ ७२ ॥ रायासी विचार मानला । मळोजी बोलाउनी आणिला । भूपति बोलता जाला । कैसा तो तयासी ॥ ७३ ॥ माणिकमल आमचा जाण । त्यासी भिडावें ऐसें मन । तंव येरु म्हणे आज्ञा प्रमाण । बोलवावें तयासी ॥ ७४ ॥ पाहा अविंध राजे कैसें वेडे । पाहून त्याचे बळाचें पवाडे । जेणें उपडिलीं पर्वताकार झाडें । त्यासी मनुष्य भिड-

विती ॥ ७५ ॥ निर्दाळिलें अवघें सैन्य । कुंजर दिधले भिरकावून । पाषाण टाकिले उचलून । तेथें मशक कोणतें ॥७६॥ ऐसें पाहोन यवनजाती । जेठीयासी भिडविती । वारण बांधलें वृक्षाप्रती । तरी वृक्ष उपटील कायहो ॥७७॥ मल्लोजीचे असे चित्तीं । भक्तत्यापरी वाढवावी कीर्ती । म्हणोनि कौतुक जनाप्रती । जैसें म्हणती तैसें हो ॥ ७८ ॥ प्रगटला कीर्तीचा भास्कर । उगवला निशीचा चंद्र । तैसा भूतरायासी पुत्र । दिधला शंकरें ॥७९॥ कैसा स्वामी भोळा क्षितिपती । भुलविलें आविंधरायाप्रती । व्हावया भक्ताची कीर्ती । भ्रांति घातली सर्वांसी ॥ ८० ॥ भ्रांति घालूनि दुर्योधना । छळिलें पंडूच्या नंदना । यज्ञसेनीची विटंबना । केली सभेंत ॥ ८१ ॥ पांडव पाठवूनि वनांतरीं । अन्याय घडविले नानापरी । त्यानिमित्त कुळक्षत्रीं । केला संहार दुष्टांचा ॥ ८२ ॥ अश्वमेध पांडवाहस्तें करून । पृथ्वीवरी सोडिला शामकर्ण । देशोदेशींचे भूपति जिंकोन । भक्तलौकिक वाढविला ॥ ८३ ॥ इतकें व्हावया काय कारण । भक्ताची कीर्ति व्हावी पूर्ण । म्हणउनी दुष्टाहस्तीं विंदान । करवी परमेश्वरु ॥ ८४ ॥ दासाची कीर्ति व्हावी म्हणोन । दशरूप जाला नारायण । श्रुतिशास्त्रें अठरा पुराण । भक्तकीर्ति वाखाणिती ॥ ८५ ॥ हरिश्चंद्रराजा पुण्यकीर्ती । छळिलें विश्वामित्राहस्तीं । कीर्ति वाढविली त्रिजगतीं । वैकुंठनाथें ॥ ८६ ॥ ऐसे भक्ताचे पवाडे वाढवुनी । तया वंद्य केलें पुराणीं । भक्तसखा पिनाकपाणी । कर्तव्य त्याचें कळेना ॥ ८७ ॥ राजा दुतास आज्ञा करी । मल्लास बोलवा लौकरी । ऐसें ऐकतां सेवक झडकरी । जाते जाले आणावया ॥ ८८ ॥ दूत म्हणती माणीकमल्ला । राव सभा करुनी बैसला । तुज भिडावया मल्ल आणिला । ऊठ रे ऊठ झडकरी । ॥८९॥ तंव तो गर्विष्टपणें म्हणोन । जा माझ्या शिष्यासी घेऊन । मजसी भिडेल ऐसा कोण । असे पृथ्वीवरी ॥ ९० ॥ एका हात्तीचें बळ । माझ्या अंगीं सबळ । पृथ्वीमल्लाचा मी काळ । असें ये ठाईं ॥९१॥ मल्लाचे पुतळे करुनी । चरणीं रुळती अनुदिनीं । परी कोणी न सोडिती येउनी । माझा धाक रे ॥९२॥ तेथें मजसी भिडावया लागुन । कोण आणिलें असे रायान । मोडलें बहुतांचें हस्तचरण । हें तर ठाउके तुम्हां ॥ ९३ ॥ दिधले कितेक भिरकाऊन । घेतलें बहुतांचे प्राण । असेल एखादे अनाथ दिन । तरी त्यासी भिडू कैसा ॥ ९४॥ दूत रायासी येऊन सांगती । मजसी भिडेसा नाहीं जगतीं । त्यावें एका शिष्याप्रती । तोच कौतुक दावील ॥ ९५ ॥ पातशाहा क्रोधायमान होऊन । त्यास

आणा रे मोहरें घालुन । त्वरितच सेवक जन धाऊन । आणिले जाले तयासी ॥ ९६ ॥ शृंगार करी अती कौतुकें । हास्तीं घातली वाघनखें । मस्तकींच्या टोपा जडिलीं माणकें । तोच घातला तयानें ॥ ९७ ॥ वस्त्रें लेतसे अभरण । कंबरबस्ता केला कठीण । कटीं खंजीर बिचवे खोचुन । पाईं घातलें तोडरें ॥ ९८ ॥ मस्तकीं घातले मुक्तुरे । शिष्यही नटती अति धाबरें । हावभाव दाविती बेरे । जैसें का कोल्हाटी ॥ ९९ ॥ माणीकें प्राशिलें सुरापान । पाजिलें अवघ्यालागून । उठिला तेव्हां तो यवन । चालिला कैसा सदरेसी ॥ १०० ॥ चरणीं वाजती तोडर । पुतळे बांधले येकसर । ब्रीदें वागवी शरीरावर । ठाईं ठाईं सर्वांगा ॥ १ ॥ निशाण दोहीं भुजांवरी । लाविली असे जरभरी । वर्तमान कळलें अवघ्या नगरीं । पाहावया धांवती सर्व जन ॥ २ ॥ चालतां पाय आपटी मेदिनीं । हाटेंच मृत्तिका उडवी गगनीं । शिष्यें लोटिती तयालागुनी । मंद मंद चालतसे ॥ ३ ॥ शरीर तयाचें कैसें विस्तीर्ण । जैसा कनिष्ट असे वारण । ऐसा उत्पन्न व्हावया कारण । निरोपितों वृत्तांत॥४॥ शाहा पर्वती गुंफा बांधोनियां । राहात असे एक अवलिया । तेथें याची माव जाऊनियां । नित्य भोजन अर्पीतसे ॥ ५ ॥ ऐसीं जाहलीं सप्त वरुष । माता गेली कांहीं कार्यास । सांगीतलें होते कन्येस । रोटी फकिराची निर्मावया ॥६॥ तीन अजगर रोट निर्मुन । ठेविला होता पात्रीं झांकून । ते तैसेच मातेनें नेऊन । अवलिया अर्पिले ॥ ७ ॥ तेणें तो पाहून । बोलिला आसिर्वचन । तुज ऐसा अजगरनंदन । देईल खुदा ॥ ८ ॥ तोच हा अजगर बळी । माणीकमल्ल देई आरोळी । म्हणे धरीन गजाची फळी । तेथें मनुष्य ते किती ॥ ९ ॥ साठ शिष्ये समागमे । पुढें वाजती ढोल दमाने । गजासारिखा शक्तीतमें । झुलत आला ॥ ११० ॥ नृपासी करुनी नमन । बोलता जाहला वचन । कवणाचें आलें असेल मरण । त्यासी उभे करावें ॥ ११ ॥ अद्यापी तरी त्यास वाचावया । असेल जरी शरिराची माया । तरी सत्वर जावें उठोनियां । मज दृष्टी न पडतां ॥ १२ ॥ मग मळोजीस क्रोध येऊन । उभा ठाकला तया पुढें जाण । म्हणे प्रताप न करितां वायां बोलुन । काय बोलसी रे मुर्खा ॥ १३ ॥ त्वां मारिली अनाथ दीन । गर्विष्ट जाहलें तुझें मन । वेची तुझा प्रताप पूर्ण । काय असेल तो ॥ १४ ॥ मग माणिकें पोषाक उतरोनी । सजिला कुस्ती लागुनी । मुष्टी मारोनियां मेदिनी । मृत्तिका अंगीं चर्चिली ॥ १५ ॥ मळोजी मुष्टी मारी पाषाणासी । पिष्ट केला मृत्तिका ऐसी । ती चर्चूनियां सर्वांगासी ।

भिडावया सिद्ध जाला ॥ १६ ॥ हेंही कौतुक पाहे दुर्मती । परी न समजे चित्तीं । जैसें दीपकावर दग्ध होती । भुलोनियां पतंग ॥ १७ ॥ हें देखोनी राव नयनीं । आश्चर्य मानीं थोर मनीं । म्हणे धन्य परमेश्वर करणी । शक्ती दिधली अद्‍भुत ॥ १८ ॥ पातशाहा म्हणे रे पहिलवाणा । का जालासी दिवाणा । वांचवी आतां आपुल्या प्राणा । होय सत्वर परता ॥ १९ ॥ ऐसें ऐकुनीया दुर्मति । क्रोधें खवळोनिया चित्तीं । पसाभर घेऊन माती । टाकी मळोजीच्या नेत्रांत ॥ १२० ॥ येरु जवं नेत्र पुसीत । तवं धडक मारिली पोटांत । मागें सरोनि मुष्टी रोपीत । हृदयांवरि तो मल्ल ॥ २१ ॥ इतकेंही मळोजीन सोसुन । भासें जैसा तृणासमान । म्हणे सांभाळ रे पहील-वाण । आतां माझ्या मान्यासी ॥ २२ ॥ मल्ल चरणासी धरीला । भंवताला भवंडीला । उभा करुनी घुसा दील्हा । फोडिलें तयाचे मस्तक ॥ २३ ॥ माणीकान नेत्र वटारोन । तत्समयीं त्यजीला प्राण । राव वस्त्रें अलंकार अर्पून ॥ मळराया तोषविलें ॥ १२४ विराटा घरीं पंडुनंदन । नष्टचर्य भोगीति गुप्तपण । जीमुतीस दुर्योधन पाठवून । ठाईं पाडावया पांडवा ॥ २५ ॥ पांडवाचे पुतळे करुनी । बांधले असे आपले चरणीं । हें देखोनि पंडुनंदनीं । उपजला कोप ॥ २६ ॥ भीमे तयासी मलयुद्ध करून । घेतला तयाचा तात्काळ प्राण । टाकिले त्यानें पुतळे सोडुन । आपुल्या नामाचें ॥ २७ ॥ तैसी मळ-रायें केली करणी । मल्ल मर्दिला ततूक्षणी । हें देखोनि राव नयनीं । कौतुक मानिलें ॥ २८ ॥ वाणीतसे स्वमुखें प्रताप तयाचा । म्हणे तुं अहेसी भीम-कळीचा । ऐसा स्वामी कैलासीचा । भक्ताची कीर्त वादवितसे ॥ २९ ॥ हाच महिमा ऐकुन । आनंद शिवपदीं लीन । म्हणे स्वामी कृपा करून । पुढें कैसें वदवावें ॥ १३० ॥ इति श्रीभुतेश आख्यान । वदविलें शिवकृपेन । श्रोते होऊन सावधान । रसाळ कथा परिसावी ॥ १३१ ॥ प्रसंग ॥ ६ ॥ समाप्तमस्तु ॥ श्रीशिवार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥

# अध्याय सातवा.

श्रीत्रिशुळधराय नमः ॥ जयजयाजी शंकरा । जयजयाजी विश्वंभरा । जयजयाजी करुणाकरा । पुढे ग्रंथ वदवी ॥ १ ॥ व्यासवाल्मिका देउनी मती । वदवील्या अपार स्तुति । ऐसा तूं मृडायणीपती । दिनानाथा परमेश्वरू ॥२॥ देउनी शक्ती दासालागुन । कीर्तीनें भरविलें त्रिभुवन । अगाध महिमा तुझा त्रिलोचन । सहस्र वदना न वर्णवे ॥ ३ ॥ लज्जित बारा सोळा जणी ॥ तटस्त जाल्या चौघी जणी । चौदा चौसष्टी कला दाखउनि । निवांत राहिल्या ॥ ४ ॥ आणिक वर्णिती चौवे जण ॥ वदति अठरा पुराण । ध्याती तपस्वी मुनिजन । परि तु अगम्य ॥ ५ ॥ भक्तवत्सला जी त्रिलोचना । प्रताप देउनी आपुल्या गणा । कीर्ति वाढविसी मृत्युभुवना । कवणे परी ॥ ६ ॥ उमरावासहित सभास्थानीं । पातशाहा बैसला सिंहासनीं । पृथ्वीचें भुपाळ कर जोडुनी । तिष्ठति द्वैभागि ॥ ७ ॥ पात्रा करीति आपूर्व गायन । राजा असे समाधान । तंव करीता जाला तया स्मरण । कैसें तें पाहा वो ॥ ८ ॥ प्रधान असे दुष्ट दुर्मती । बोलता जाला रायाप्रति । हुसनव्याघ्र माझिया चित्तीं । मळोजीसी भिडावा ॥ ९ ॥ पाहा हो शकुनीचिया बुद्धिन । निर्दाळिलें कौरव सैन्य । तैसें याचिया बुद्धीन । लया पावतील सर्वहि ॥ १० ॥ राजा म्हणे निश्चित । तो करील यांचा घात । मनूष सावजा निशस्त्री भिडत । ऐसें देखिलें नाहीं ॥ ११ ॥ मळोजीस विश्वास देऊन । आणिला भेटि लागुन । आतां घ्यावा याचा प्राण । हे तर लघुत्व लौकिकीं ॥ १२ ॥ प्रधान म्हणे हा लघु आग्र । विझवावा बुधीं करून । नाहीं तर दग्धील राज्य पूर्ण । तुम्हांसहीत अवघेहि ॥ १३ ॥ कौरवें लाखा जोहार निरमुन । विश्वासें नेले पंडूनंदन । निशीमाजीं लाविला अग्न । परी श्रीकृष्णकृपें वांचविलें ॥ १४ ॥ दीवाभीताचें घरीं आग्न । का गे लाविला नम्रता धरून । तैसें कौतुक पाहावयाच्या निमित्तान । व्याघ्रापासून मारवावा ॥ १५ ॥ राजा म्हणे ऐसें न घडे । मंत्री तुज लागले वेडे । हे अपकीर्तीचे पवाडे । जातील माझे दशदिशा ॥ १६ ॥ मळोजी ऐसा भूप । ठेवीन आपुल्या समीप । कैसें निर्मिलें स्वरूप । त्या भगवंतें ॥१७॥ मग प्रधान म्हणे जी राया । हाच व्याघ्रातें पावविल लया । चिंता न करावी स्वामिया । पाहावें

कौतुक ॥ १८ ॥ गोष्ट मानली नृपासी । बोलाउनी आणिले मळोजीसी । सन्मानें करूनी तयासी । अभिधान दीधलें ॥ १९ ॥ राजा स्वमुखें तयालागुन । पुसतसे ऐकती सभाजन । व्याघ्रासी भीडावें हें आमुचें मन । असें बळिवंता ॥ २० ॥ मळोजी म्हणे गा नृपनाथा । प्रत्यक्ष काळासी मज भिडवितां । बरें मानलें तुमच्या चित्ता । तरी अवश्य आणविजे ॥ २१ ॥ मग पाठवून सेवकजन । व्याघ्र आणविला सोडून । चारी सांखळ्या चहूंकडे लावून । ओढिती दर्वेसी पैं ॥ २२ ॥ पुढें यंत्रधारी धांवुनीयां । वाव करिती चालावया । तयाची दहशत मानुनीयां । जिकडील तिकडे पळती ॥ २३ ॥ कैसा ऐसा थोर जाण । हांक फोडितसे गर्जोन । थरथरां कांपती सर्वजण । ओढुनीयां आणिला ॥ २४ ॥ वार्ता ऐकोनि गिरजामाता । वेगीं आली हो तत्त्वता । विनवितसे नृपनाथा । बाळ माझें वांचवावें ॥२५॥ राजा ह्या पुत्रासाठीं । शिव पुजिला महानिकटीं । कैसीयासी आला हटी । व्याघ्र याजवरी सोडितां ॥२६॥ माता पदर पसरून । विनवितसे तयालागून । मज देई बा पुत्रदान । जीवदान मागतसें ॥ २७ ॥ मग राजा म्हणे गिरजेसी । तूं धोका न मानी मानसीं । स्वस्थ बैसोनि कौतुक पाहासी । आपुल्या पुत्राचें ॥ २८ ॥ तैसीच आली पुत्राकडे । तुज सांगत होती बा निवाडे । आतां कैसें मांडलें कोडें । तुझ्या प्राणाचें ॥ २९ ॥ तुझा प्राण घ्यावया । काळ आणिला पुत्रराया । कैसा वांचसील सखया । याजपुढें आतां ॥ ३० ॥ धांव धांव रे भूतेषा । धांव धांव रे महेषा । कृपाळु बा जगदीशा । बाळ माझें वांचवावे ॥ ३१ ॥ मळोजी म्हणे वो माता । तूं न पाळी माझी चिंता । मज असे तो रक्षिता । शूळपाणी समर्थ ॥ ३२ ॥ त्याचिये सत्तेंकरून । मज दिसे जैसें श्वान । क्षणामाजीं चिरून टाकीन । बैस वो स्वस्थ जननिया ॥३३॥ मळोजी गेला वाघापासीं । तंव ते सोडिते जाले दर्वेसी । करणी करितां जाला कैसी । तो व्याघ्र पैं ॥ ३४ ॥ शरीर आपलें झाडून । पुच्छ भूमीस आपटून । महा आवेशें गर्जोन । येऊन पडिला तयावरी ॥३५॥ मल्लरायें वरच्या वर धरून । मागती दिधला लोटून । तो महा क्रोध दाढा करकरा खावोन । निढावला पैं वेगीसीं ॥ ३६ ॥ पुच्छ आपटुनी भूमीवरी । गर्जना करुनी महा थोरी । आवेशें उडोनि अंबरीं । येऊनि पडिला मळोजीवरी ॥३७॥ राजे आपुलाले परीवार घेउनी । नित्य असती सेवेलागुनी । हत्ती तुरंग सर्व वहनीं । सिद्ध असती तेथें पैं ॥३८॥ व्याघ्र गर्जतां थोर आरोळी । हलकल्लोळ जाला अवघ्या

दळीं । आला आला म्हणती सकळीं । रीघ नसे पळावया ॥ ३९ ॥ हत्ती-वरुनी पडिले माहोत । शिपाई घोडीं सांडीत । गज दशदिशा लंघीत । धांवती सैरावैरा ॥४०॥ तुरंग गेले हातींचे सुटूनी । राउत धांवती रानोरानीं । गर्दी गेली एकचि होउनी । कोणी न धरिती कोणातें ॥४१॥ कित्येक पडिले खंदकीं येउनी । अनर्थ पावले फार प्राणी । नृपही समस्त भ्याले मनीं । कैसें होईल जगदीशा ॥४२॥ म्हणती व्याघ्र येईल सदरेवर । यालागीं सांडिती धीर । उपसुनीयां आपळालीं शस्त्र । सावध होउनी बैसती ॥ ४३ ॥ परी नाहीं ढळला रतनमल वारु । उभा राहिला धरुनी धीरु । मळरायाविषयीं परमेश्वरु । तैसाचि निर्मून ठेविला होता ॥४४॥ ऐसा तो वारु रणधीरु । तुरंगामाजीं होय वीरु । तों इकडे व्याघ्र मळोजीचा निर्धारु । पाहाहो कैसा बनला असे ॥४५॥ दोन वेळ दिला ढकलुनी । मागती आला चालोनी । मग तयाचें जाभाडें धरुनी । उभा केला पैं ॥ ४६ ॥ दिधली भयानक आरोळी । बैसली अवघ्याची टाळी । अवघ्या सैन्यांत जाली आरोळी । जन भ्याले समस्त ॥ ४७ ॥ पडिलें दहशतीचें मौन्य । इतक्यांत मळराय त्वरा करून । जाभाडें व्याघ्राचें चिरून । प्रवेशला तया पोटांत ॥ ४८ ॥ व्याघ्रें भक्षिलें मळोजीसी । ऐसें दूत सांगती रायासी । भूपति गजबजिला मानसीं । क्रोधें बोले मंत्रीला ॥ ४९ ॥ मळोजी भक्षिला व्याघ्रान । तो कोठें द्यावा आणोन । नाहीं तरी शिरच्छेद करीन । न देखतां तयासी ॥ ५० ॥ प्रधान थरथरां कांपत । राजे भ्याले समस्त । राव अति क्रोधें तप्त । न बोलती कोणी ॥ ५१ ॥ मंत्री व्याघ्रसमीप येऊन । म्हणे घेई रे माझा प्राण । तंव मळोजी पोटांतून निघोन । आश्चर्य जगा दाखविलें ॥ ५२ ॥ पडिलें व्याघ्राचें कलीवर । प्रधानास आनंद जाला थोर । धरुनी मळोजीचा कर । आणिलें भूपतीपासीं ॥ ५३ ॥ म्हणती व्याघ्र मृत्यूतें पावविला । रायाचिचीं हर्ष जाला । मळोजीस वस्त्रें द्यायया लागला । तो हस्त धरिला प्रधानें ॥५४॥ शरीर भरलें शोणितान । वस्त्रांची होईल घाण । यासी करूनी आणितों स्नान । मग वस्त्रें द्यावीं जी ॥ ५५ ॥ गोष्ट मानिली नृपासी । नेई गा प्रधाना स्नानासी । घेउनी आला खंदकापासीं । तो दुष्टबुद्धी ॥५६॥ मनांत करी विचार । जळामाजीं आहे सुसर । तिनें धरलिया साचार । जे उदकामाजीं बुडवील पैं ॥ ५७ ॥ जळामाजीं न चले बळ । होईल तात्काळ याचा काळ । मग कार्य जाहालें सफळ । सर्व आमुचें ॥ ५८ ॥ मळोजीसि म्हणे प्रधान । करी ह्या जळामाजीं स्नान । अवघें श-

रीर प्रक्षाळून । निवे सावकाश ॥ ५९ ॥ तयाच्या बोलाचा विश्वास धरून । मुखीं स्मरला उमारमण । हरहर महादेव म्हणोन । टाकिली उडी ॥ ६० ॥ तंव तेथें असे मोठी मगर । त्यासी असे मनुष्य आहार । तिनें येऊनि धरिलें सत्वर । मिठी घातली कटासी ॥६१॥ तीचिया मुखासी धरून । दोन शकलें केलीं समान । दिधली बाहेर भिरकाऊन । लोक पाहाती समस्तही ॥ ६२ ॥ हें पाहून मंत्री तटस्थ । यांजकडे विलोकित । मळोजी स्नान करूनी त्वरित । निघतां जाला ॥ ६३॥ नेऊन भूपनायकापासी । वस्त्रें अळंकार देविलें त्यासी । वर्तमान सांगितलें रायासी । मगरीचें सविस्तर ॥ ६४ ॥ राजा आश्चर्य करी मनीं । यासी रक्षितो कोण येउनी । जळामाजीं साह्य होउनी । कैसें यासी ता‑ रिलें ॥ ६५ ॥ दिवस लोटले दोन चार । प्रधान रायासी जोडुनी कर । म्हणे मळोजीसी आणिक विचार । पुसावा एकजी ॥ ६६ ॥ वारण आपुला सदा उन्मत्त । अवघे कुंजर ह्यासी कांपत । मळोजीसी भिडवावा मनोरथ । पूर्ण असे माझा जी ॥६७॥ मग नृपें बोलाऊन मळोजीसी । पुसते जाले बहू आदरेसी॥ हात्तीसी भिडावें हें मानसीं । असे आमुचीया ॥६८॥ श्रोते म्हणतील चित्तीं । येणें युद्धीं झुगारिले हत्ती । ऐसें न जाणू अविंध नृपती । एक्या हत्तीसी कैसा भिडवी ॥ ६९ ॥ तरी ऐका श्रोते सावधान । पांडवाचा साह्यकारी नारायण । ऐसें जाणतसें दुर्योधन । परी नेणेची ॥७०॥ लाक्षा जोहारी पांडवा घालून । कौरवें लाविला होता आग्न । तेथें रक्षिलें मधुसूदनें । हें तयानी देखिलें॥७१॥ द्रौपदीस वस्त्रें अनंत । पुरविता जाला रमाकांत । ऐसें पाहूनियां दुष्ट समस्त। तैसेंच प्रवर्तती फेडावया ॥ ७२ ॥ ऐशा दुष्टाच्या जाती । उन्मत्त जालिया थोर चित्तीं । धर्म अधर्म न विचारिती । अहंमतीं भुलेनियां ॥७३॥ भस्मा‑ सुर उन्मत्त जाला । तो शिवापाठीं लागला । पार्वतीसी घेउनी गेला । शेवटीं जाला भस्म तो ॥ ७४ ॥ रावणें नेली जनक बाळा । तारकें पराभविलें अमर‑ पाळा । हिरण्याक्ष घेउनी भूगोळा । पळता जाला ॥ ७५ ॥ भगवंतें औतार स्वरूपें धरून । त्या पावविलें प्रतापें करून । परी नाहीं वर्तले धर्मरीतीन । कामक्रोधा प्रवर्तले ॥ ७६ ॥ नाहीं जाला कोणाचा शेवट । दुष्ट बुद्धीनें जाले भ्रष्ट । संहारून अवघें केलें पिष्ट । नाहीं शेवट एकाचा ॥ ७७ ॥ ऐसा अ‑ विंध राजा नेणोन । मळोजीस भिडावया वारण । आणावयां सेवकजन । कैसें पाहाहो वयांसी ॥ ७८ ॥ गौड देशीच्या राजीयानें । पाठविला होता वारण । सदा उन्मत्त सुनी जाण । नसे कदा देहावरी ॥ ७९ ॥ त्यास नगरा‑

पासून दूर । रानांत वृक्ष पाहून थोर । दृढ बंधन करुनी निरंतर । तेथें तयासी रक्षिती ॥ ८० ॥ धांवत गेले सेवकजन । माहोता जाणविती वर्तमान । आणविला असे रायें वारण । मळोजीलागीं भिडावया ॥ ८१ ॥ तंव ते म्हणती माहोत । हा सदा असे उन्मत्त । यासी सोडितां होईल अनर्थ । पुसोनी यावें रायासी ॥ ८२ ॥ मागती धांवत आले नृपापाशीं । साकल्यें जाणविलें तयासी । मग रायें सैन्य पायभारासी । पाठविलें आणावयां ॥ ८३ ॥ त्यानें भाले लाउनी शरिरासी । सोडते जाले तया गजासी । शृंखळा जडल्या पायासी । हळुहळू चालतसें ॥ ८४ ॥ तयार जाहालें अवघें सैन्य । पळविलें समस्तही वारण । पाहावयां धांवती सर्व जन । हाक जाहाली चहुंकडे ॥ ८५॥ शृंगारिला उत्तम वारण । घंटा वाजती घणघण । दिसे जैसा शोभायमान । ऐरावत इंद्राचा ॥ ८६ ॥ ही वार्ता ऐकूनियां गिरजा । म्हणे दक्षिणेचा महाराजा । प्रसन्न करुनी वृषभध्वजा । हा पुत्र मागितला ॥ ८७ ॥ तुम्ही प्रवर्तला याचिया घाता । म्हणवुनी वक्षस्थळ बडवी माता । कैसा कोपलासी सिद्धनाथा । तरीच विघ्न करितोसी हें ॥ ८८ ॥ राजा म्हणे मानी वचनातें । कौतुक पाहे स्वस्थ चित्तें । हा न आटोपे गजातें । व्यर्थ शोका करिसी कां ॥ ८९॥ माता म्हणे पुत्रराया । तुज नवमास गर्भी पाळूनियां । देवें हस्ती घालूनीयां । मृत्यु कैसा आणिला ॥ ९० ॥ तुझ्या बा निर्वाणकाजा । कोण धांवेल महाराजा । स्मरे तो कैलासराजा । तयावांचुनी कोण धांवें ॥ ९१॥ पावे पावे भूतपती । पावे पावे गिरजापती । कोठें सखया गुंतलेती । बाळा माझ्या वांचवावें ॥ ९२ ॥ पाहुनी मातेची करुणा । कृपा उपजली भूतेशनंदना । चिंता न करी त्रिलोचना । संकट माझें असे ॥ ९३ ॥ रायें यंत्रधारी पाठवून । जन केलें निवारण । मग तोडिते जाले बंधन । हस्तीपायांचें ॥९४॥ गज चौताळला मळोजीवर । जन कांपतसे थरथर । कैसा वांचेल याजसमोर । म्हणोनि दुःखीत होती ॥ ९५ ॥ येतांच धरिला दंता । तीन वेळां सारिला मागुता । मग भवंडूनि भंवता । बोले मळोजी ॥ ९६ ॥ राया झोंकूं सभेवरी । किंवा फेकूं गगनोदरीं । भीमें फेकिलें कुरुक्षेत्रीं । तैसी गती करूं यासी ॥९७॥ ऐसें ऐकतांच वचन । सभा गजबजिली संपूर्ण । पळूं पाहाती रायास सांडून । सकळ नृप ते ॥ ९८ ॥ म्हणती युद्धीं पळून । वांचविले आपुले प्राण । तो आंव समई पुरला पूर्ण । ऐसें वाटतें ॥ ९९ ॥ द्वादश राजे भीड सांडून । पातशाहासी बोलती वचन । भ्रंश जाला युद्धीकारण । कैसा तुमच्या स्वा-

मिया ॥ १०० ॥ समरांगणीं हा वाहोनी बळी । कल्पांत केला अवघ्या दळीं । ऐसें पाहोन आम्ही सकळीं । दशदिशा लंघिल्या ॥ १ ॥ पळून वांचविले आपुले प्राण । येणें निवटिलें सर्व सैन्य । आज आम्हां दिसतें निर्वाण । तुम्हांसहित राजेंद्रा ॥ २ ॥ हा नव्हे जन्मला मानव । देव स्वरूप किंवा दानव । पराक्रमाचे विषम भाव । त्याजवांचून नव्हेत हे ॥३॥ हुसन व्याघ्र टाकिला चिरोन । माणिकासारिखा पहिलवान । जळामाजीं मगर मारून । शकलें केलीं तयाचीं ॥ ४ ॥ ऐसें पाहुनी समक्ष नयनीं । भ्रांत पडिली तुम्हांलागुनी । ही बुद्धी सुचविली कोणी । कीं वारण दिधला हत्ती ॥ ५ ॥ परिवार निर्दाळिला सकळ । पळालों आम्हीं भूपाळ । तुम्हांसहित सर्व मेळ । सांपडलों अवघेंची ॥ ६ ॥ हा जन्मला असे काळ । करावया राज्याचें निर्मूळ । यासी आतां न चले बळ । ठाव नसे पळावया । ॥ ७ ॥ नाहीं समरीं यासी फावलें । आतां रायासुद्धाचि गंवसिलें । शरण जाऊं चला वहिलें । प्राण आपुले वांचवूं ॥ ८ ॥ ऐसें पाहोन पातशाहा पूर्ण । थरथरा तयांसी कांपून । सांडू पाहे भद्रासन । धीर धरून बोलतसे ॥ ९ ॥ भला भला गा भूतनंदना । तूं अजिंक्य सर्वांजणा । तुज भिडे ऐसा कोणा । आंवाका नसे॥१०॥मग गिरजेसी बोलें वचन । धन्य प्रसवलीस ऐसें निधान । हा सखा माझा प्राणाचा पूर्ण । यासी मी न विसंबे ॥१११॥ मळोजीस बैस-ऊन मांडियेवर । दिधलें वस्त्रें अलंकार । माझे सेवक नृपवर । त्यामाजीं श्रेष्ठ तूं ॥ १२ ॥ दिधलें खासें निशाण । सर्व वर्तती तंव आज्ञेन । मीहि असेन तंव गा स्वाधीन । मम राजे रक्षी हे ॥१३॥ मळोजी पुढें श्रीदायीत । नाम म्हणे विख्यात । भूपतीराव किताबत । दिधली पातशाहान ॥ १४ ॥ ऐसा शिवाचे प्रतापें करून । कीर्तिवंत जाला मळोजी पूर्ण । आनंद भावें असे शरण । महिमा अद्‌भुत जाणोनियां ॥ १५ ॥ इति श्रीभूतेश आख्यान । वदविले शिवेकृपेन । श्रोते होऊन सावधान । पुढें कथा परिसावी ॥ ११६ ॥ प्रसंग ७ ॥

२८ वं

## अध्याय [illegible]वा

—❀*❀—

श्रीगणेशाय नमः ॥ जयजयाजी सिद्धेश्वरा । जयजयाजी परमेश्वरा । जयजयाजी दीनोद्धारा । पुढें ग्रंथ वदवी ॥ १ ॥ दुष्टबुद्धी प्रधान करी विचार । यासी प्रयत्न केले फार । परी यासी मृत्यू न येची निर्धार । कोणता प्रयत्न योजू तो ॥२॥ मग कामगार बोलाउनी । त्यासी गुप्त सांगितलें कर्णीं । मळोजीच्या मंदिरालागुनी । विवर त्यावें कोरीत ॥३॥ दो मासा माझारीं । विवर कोरावें सत्वरी । खणोनी एक विहिरी । विवरामाजीं ठेवावी ॥ ४ ॥ त्यांनीं मानोनियां वचन । आज्ञेसारिखे ठेविलें निर्मून । सुचविले मंत्रीलागुन । दुजया कोणा न कळेची ॥ ५ ॥ मग दुष्टबुद्धी उपाय करी । मध्यरात्रीच्या अवसरी । मळोजी असे निद्सुरी । तैं केला कैसा उपाय ॥ ६ ॥ विवरद्वारें पाठऊन सेवक । उचलिला तयाचा मंचक । विवरद्वारीं आणोन देख । महाकुपीं लोटला ॥ ७ ॥ तों जळदेवता धाऊन । मंचक धरिला येतान । गेल्या पाताळास घेऊन । आपल्या सदनालागीं त्या ॥ ८ ॥ न्यावया काय कारण । कीं हा शिवाचा प्रियगण । म्हणऊन रक्षिले त्यांजलागुन । जळदैवतीं ॥ ९ ॥ तो मळोजी जागृत होऊन । मंचकीं बैसला उठोन । तयासी पुसे तुम्ही कोण । मज कां येथें आणिलें ॥१०॥ तयांनीं सांगितलें वर्तमान । तुज दिधलें मानवें लोटुन । आम्ही रक्षिले तुजलागून । आणिले या लोकां ॥११॥ तों वर काय जाहालें वर्तमान । उगवला असे सहस्रकिरण । दिवस आला प्रहर दीन । तंव मळोजी न दिसेची ॥ १२ ॥ तो गिरजाबाई म्हणे । कां न उठे अझुनी नंदन । काय जाहाले तयालागुन । म्हणऊन सदनांत आली ॥ १३ ॥ तंव तेथें नसे शय्या कुमर । आजगर देखिले विवरद्वार । पाषाण तोंडीं देऊनि थोर । आच्छादिले असे ॥१४॥ हें पाहून तेव्हां जननी । अंग टाकून दिधलें धरणीं । म्हणे गति जाली बाळालागुनी । कोठें आतां पाहूं तो ॥ १५ ॥ पलंगासहित माझा बाळ । घेउनी गेला कैसा काळ । कैसें फुटलें माझें कपाळ । दयाळू बा सदाशिवा ॥ १६ ॥ घेउनी गेली खेचरी । किंवा नेला निशाचरी । मनुष्य कैसें पाताळ विवरीं । नेईल माझिया सख्यातें ॥ १७ ॥ काय करूं मी आतां प्रयत्न । थोर करी अक्रोश रुदन । कैसा भुकेला तुजलागुन । काळ पाताळीचा ॥ १८ ॥ मज कां नेले नाहीं तयान । वांचविला नाहीं तुझा प्राण ।

आतां स्मरूं कोणा निर्वाण । भूतेन । हें [illegible] तो वीरासी कळलें
वर्तमान । तेंही आले हो धावोन मी । ते [illegible] दन । कपिकुळासारिखें
॥ २० ॥ लंकेचिया समरांगणीं । इ [illegible] णीं । तंव स्मरण जालें दशा-
ननीं । कैसे त्या दुष्टाचें ॥ २१ ॥ [illegible] नंदन । बंधू ऐसा कुंभकर्ण ।
तेही गेले मज सांडून । मुख्य धुरा [illegible] या ॥२२॥ ऐसा कोण सखा त्रिभु-
वनीं । त्यासीं आतां स्मरूं स्मरणीं । शत्रू मारूनियां रणांगणीं । सूड घेईल
पुत्राचा ॥ २३ ॥ मग स्मरला अही मही । एकतांच आले लवलाही । भेटू-
नियां रावणा पाहीं । सूड घेईल पुत्राचा ॥ २४ ॥ मग रामसैन्याभीतरीं ।
तो अवघे असती निद्रसुरी । मार्ग करूं पाहाती असुरीं । परी रीघ नव्हे
तयाचा ॥ २५ ॥ मारुतें पुच्छ वेढ्याचें दुर्ग करून । अवघ्या सैन्यासी मधीं
घालून । रक्षित असे अंजनीनंदन । निशी असे घोर पैं ॥ २६ ॥ तंव येऊन
अहिरावण महिरावण । तीक्ष्ण शूळें पाहाती खाणोन । परी तें गेलें बोथट
होऊन । न चले उपाय ॥२७॥मग उडाले गगनोदरीं । उतरोन पडिले माझारी ।
रामलक्ष्मण निद्रसुरी। असतां निमग्न ॥२८॥ तंव दैत्यीं काय करून । उभयतां
सहित शय्या उचलोन । गेले पाताळा घेऊन । आपुलिया निजघरा ॥ २९ ॥
मग तयावरील मौन्यशस्त्र काढून । सावध केलें उभयतां जाण । रक्षिती
तया असुरगण । दृढ बंधन करूनियां ॥ ३० ॥ इकडे लंकेमाजीं कैसी गती ।
उठिले अवघे जुत्पती । स्वामी नमस्कारालागीं येती । तंव तेथें न दिसती दोघे-
जण॥३१॥आवघे जाहाले घाबरी । तों पावलें देखिलीं निशाचरीं । मार्ग काढितां
सर्वत्रीं । विशाळ विवर देखिलें ॥ ३२ ॥ जाहाला सैन्यांत कल्पांत । अव-
घेचि कपी रुदन करीत । तंव बिभीषण येऊन त्वरित । शांत केलें सर्वही३३
म्हणे ही वार्ता ऐकिलिया लंकानाथ । करील अवघ्याचा अनर्थ । विचारें
करुनी श्रीरघुनाथ । शोधोनी पाहावा ॥ ३४ ॥ तेव्हां आवघे म्हणती वायू-
सुता । तुजवांचूनी कोण शोधिता । मग चौघे जुत्पति घेऊन त्वरिता। मारुती
गेला विवरांत ॥ ३५ ॥ पुढें चौघेहि टाकून आले वरी । मकरध्वजासी युद्ध
झाले भारी । तयासी जिंकितां रघुवीरीं । माता आणुनी भेटविली ॥ ३६ ॥
हा होय वायुसुताचा नंदन । ठावके असले तें कथन । सकळीक सांगतों
निरोपण । दृष्टांता आलें म्हणऊन ॥ ३७ ॥ येरी म्हणे जी स्वामिराया । येणें
केलें कोणत्या कार्या । मारुती बोले स्वामिराया। आणिलें असे निशाचरी
॥ ३८ ॥ मगरी म्हणे जी मार्ग कठिण । सव्वा लक्ष गांवें सागर जाण । मग

मारुतीस मुखामाजीं बैसवून ... गर ॥३९॥ हनुमंत उतरून पैल-
पारीं । प्रवेश केला असुरनगरीं । ...न राउळाभीतरीं । बैसला तेथें
जाऊन ॥४०॥ मग रघुपति म्हणे ...गा । आपुलिया आणिलें पाताळ-
भुवना । मागें गति काय जाली सैन्या... ...छा नीळकंठाची ॥ ४१ ॥ तंव
तया असुरें काय करून । उभयतांची जेहळी बांधोन । बळी द्यावयालागून ।
नेत असे अंबिकेसी ॥ ४२ ॥ राउळाचीं दृढ कपाटें देऊन । वायुसुत बोले आं-
तून । मज अर्पावें आधीं अन्न । मग बळी द्यावे रे ॥४३॥ तंव हर्ष दैत्यीं मा-
नून । गोंधळ घालून नाचती आपण । अंबा आमुचा भाव देखोन । प्रीतीनें
भोजन मागतसे ॥ ४४ ॥ मग छिद्र पाडून राउळा उपरी । अन्नें वोपिती अ-
वघी नगरी । मुख पसरुनी वायुकुमरीं । भक्षूनियां तोषला ॥ ४५ ॥ आंतून
म्हणे रे भक्तजना । मी धालों तुमचिया भोजना । आतां कां रे बळी आणाना ।
विलंब कां केला ॥ ४६॥ मारुतें कपाटें उघडिलीं । दैत्यीं बळी आंत लोटिली ।
तंव अंबा सिंहासनीं बैसली । उग्र स्वरूप धरुनियां ॥ ४७ ॥ ती देवी बोलेरे
रामलक्ष्मणा । स्मरावा बळी तुमचा निर्वाणा । येरी म्हणती एक्या वायुनंदना ।
तयावांचून कोण सोडवी ॥ ४८ ॥ पाहोनियां निर्धार स्वामीचा । सेवक प्रग-
टला निर्वाणीचा । स्वरूप प्रगट करून वायूचा । चरणीं लागला ॥४९॥ तिघां
जाहाले आलिंगन । म्हणती सख्या आलासी कोठून । येरु न सांगून वर्तमान ।
तिघे निवांत बैसले ॥ ५० ॥ मारुती म्हणे जी रघुपती । स्वस्थ असावें जी
चित्तीं । शत्रु निवटितों कोणे रीती । तें पाहावें कौतुक ॥ ५१ ॥ मागुती बैस-
ला शक्ति होउनी । हाकारिलें दैत्यालागुनी । बळी भक्षून धालीं मनीं । उशिर
कां केला भेटावया ॥ ५२ ॥ मग शूर हर्षातें पावोन । घ्यावयासी प्रवेशले द-
र्शन । तंव मारुतें चरणातळीं घालून । रगडुनी टाकिला ॥५३॥ मर्दिलें पाहून
अहिरावण । महिनें युद्ध मांडिलें निर्वाण । न आटोपती रामचंद्रालागून । तया
करिती उपाय ॥ ५४ ॥ मारुतें तयाचे स्त्रीकडे जाऊन । पुसों लागला महीचें
मरण । तंव ती म्हणे रामचंद्रालागून । येथें आणालियां सांगेन मी ॥ ५५ ॥
वायोसुतें दिधलें वचन । घेतलें आपुलें कार्य करून । हनुमंतें भ्रमर संहारून ।
एक ठेविला कार्यालागीं ॥५६॥ इकडे संहारी भ्रमरालागून । श्रीरामें वधिला
महिरावण । तंव चंद्रकला ती येऊन । बोले वायुनंदना ॥ ५७ ॥ सांभाळी
आपुल्या वचनाप्रती । भाक देऊनि वधिलारे पती । आतां रघुनंदन सदना-
प्रती । वेगीं आणिकां ॥ ५८ ॥ मग वायुसुतें वर्तमान । सांगितलें देवालागून ।

ते म्हणती मी एकवाणी एकवचन । हें कैसें घडेल ॥ ५९ ॥ तंव येरु म्हणे जी स्वामी । वचनीं गुंतलों जी मी । ते म्हणती तयाचे येऊन धामीं । परि भोगूं देऊं ना ॥ ६० ॥ अंजनीसुतें तयापासी जाउनी । बोले स्वामी आणितों सदनीं । भंगलिया तुझी शय्या तत्क्षणीं । येईल उठोनी मागुती ॥६१॥ परी म्हणे माझिया मंचकावरी । असुरनाथ मी निद्रा करी । तेथें राम तो मानव तयाचे भारी । कैसी शय्या भंगेल ॥ ६२ ॥ मग हनुमंतें भ्रमरासी बोलावून । मंचक कोरावयाचें सांगितलें कारण । तयानीं त्वरित कार्यसिद्धि करून । गेले आपल्या स्वस्थळासी ॥ ६३ ॥ हनुमंतें रामचंद्रा घेऊन । पातला विच्या स॰ दनालागून । श्रीरामें मंचकीं ठवितां चरण । भंगून जाले तुकडे ॥ ६४ ॥ ऐसें पाहोन रघुनंदन । फिरला आश्रमालागून । तंव येरी बोलती जाली वचन । वायुसुतासी पैं ॥ ६५ ॥ मज वचन त्वां देऊन । घेतला स्वामीचा रे प्राण । टाकलें विधवा कैसें करोन । मी शापीन तुजसी ॥ ६६ ॥ तंव येरु तिच्या शापा भिऊन । केलें असे जी म्लान वदन । मग श्रीरामास कृपा येऊन । बोले तये स्त्रियेसी ॥ ६७ ॥ मी कृष्ण अवतार घेईन । तुजलागीं तेव्हां क- रीन । प्रीति तुझी चालवीन । अवध्यापेक्षां अधिक ॥ ६८॥ करुनीयां तयाचें समाधान । मारुतीरामलक्ष्मण । पावले लंकाभूवन । अवघ्यासी भेटले ॥६९॥ आनंद जाला जुरपतीसी । कपिकुळा बिभीषणासी । तोच अर्थ मळरायासी । कैसा ऐका घडला ॥ ७० ॥ कळलें पातशाहासी वर्तमान । स्वअंगें आले पाहा- वयालागून । गिरजा अतिशय करी रुदन । पातशाहा तये शांत करी ॥ ७१ ॥ पाहाती येऊनि मंदिरीं । देखिलें विवर भारी । ह्मणती नेला निशाचरीं । किंवा खेचरीं घेतला ॥ ७२ ॥ तंव मंत्रीनें रायाचा कर धरोन । एकांतीं गेला तया घेऊन । हितगोष्ट सांगतसे जयालागून । कैसा शकुनी तो ॥७३॥ ही तुमचिया राज्यासी । जन्मली होती जी विवसी । पातशाही रक्षणें देवासी । तयानें निर्भावलें ॥ ७४ ॥ तुमचें चतुरंग दळ । यानें केलें अवघें निर्मूळ । अपकीर्ति जाली असे सकळ । तुमचे पृथ्वीमाझारीं ॥ ७५ ॥ तुम्ही दक्षणच्या राजिया काळ । भेणें कांपत होती भूपाळ । आतां उडाला दर्प केवळ । न पुसे जी कोणी ॥७६॥ बरवी जाहाली याची गती । विंदान केलें भगवंतीं । हाच हर्ष मानुनी चित्तीं । राहावें स्वस्थ पैं ॥ ७७ ॥ राजा म्हणे गा सत्य मंत्री । परि स्वगृही असावा ऐसा क्षेत्री । तयाचे बळें ही धरित्री । अवघीही जिंकितो ॥ ७८ ॥ तयाचा उपाव करावा पूर्ण । तो भेटवावा मज लागुन । किंवा त्यांच कृत्रिम

करून । तयासि निमविले ॥७९॥ तवं मंत्रि म्हणे जि भूपनायका । पाताळीं माझा असे कोण सखा । कीं तयासि नेले पातळलोका । तुह्मा सत्य दिसतें हें ॥ ८० ॥ तव राजा पाहातसे मनीं । कैसे जाले तया लागुनी । थोर कष्टि होऊनि सदनीं । गेलासे आपुलिया ॥ ८१ ॥ जाहाले असे तीन दिवस । पाताळीं मळराव असे । मार्ग पाहे यावयास । तर उपाय चालेना ॥८२॥ म्हणे कैसें जाले असेल वर । कैसें असतील माझे शूर । गिरिजामाता निर्धार । मृत्यू असेल पावली ॥ ८३ ॥ कैसी केली शत्रूनें करणी । टाकिलें पाताळीं आणोनी । अंतरली माझी जनक जननी । बंधूही कनिष्ट अंतरला ॥ ८४ ॥ कैसी होती प्रारब्ध गती । तेंच फळली फलश्रुती । किंवा कोपला उमापती । घातिले मज पाताळा ॥ ८५ ॥ मग करूनियां स्वामीचें स्मरण । अंतरीं आठविलें निज ध्यान । तों कैलासी गिरिजा त्रिनेत्र । खेळत होती सारीपाट ८६ अप्सरा करिती गायन । नृत्यकला ताल संगीत । विद्याधर गंधर्व गायन । तिष्ठत असती सर्वही ॥ ८७ ॥ तों निज भक्ताचा धांवा कर्णीं । अवचित पाडिली मधुर वाणी । तैसाच हातींचा फांसा टाकोनी । उठिले लगबगित ८८ तो पार्वती म्हणे जी पिनाकपाणी । कां हो उठिला खेळ टाकुनी । काय आठवलें तुमच्या मनीं । हें मज निरोपावें ॥८९॥ शिव म्हणे वो भवानी लागून । पाताळीं टाकिला माझा मळगण । तया पडिले तेथें निर्वाण । मी जातों गे त्या ठाया ॥ ९० ॥ नाहीं बैसला नंदीवरी । नाहीं घेतला त्रिशुळ करीं । नाहीं पांघुरला गजांबरीं । चरण चालीं धाविला ॥ ९१ ॥ मोकळ्या रुळती असे जटा । धांवतसे दासाचिया संकटा । कोप नावरे नीळकंठा । मळोजीपासीं पातला ॥ ९२ ॥ येरूनें तयातें देखोन । दृढ धरिलें असे चरण । देव म्हणे कोण निर्वाण । केलें सांग तुजसी ॥ ९३ ॥ सचिरमण किंवा सहस्रवदन । आसुर सुरवर गंधर्वगण । ये प्रकार कृतांत कवण । किंवा मानवें गांजिलें ९४ एरू म्हणे उमाकांता । तुमचे तुम्ही सर्व जाणतां । भूमंडळीं न्यावें कृपावंता । मज आतां ये समई ॥ ९५ ॥ जयानें केली असे ही करणी । तया शिक्षा करीन स्वयें पाणी । नखें करुनी शीर खुडुनी । टाकीन तुमच्या प्रतापें॥९६॥ मग गिरिजावरें कृपा करुनी । तया प्रगट केलें पूर्वस्थानीं । भेटला गिरिजेमातेलागुनी । सकळ शूरा भेटला ॥ ९७ ॥ आनंद झाला तया लागुनी । हर्ष न समाय तया जननी । काळ्या डोहीं निघतां चक्रपाणी । तैसी परी जाली हो ॥ ९८ ॥ पाहा कैसा स्वामी त्रिलोचन । पडिला ब्रीदाचा अभिमान । नाहीं घेतले नंदीवाहन । पायींच आला लागवेगीं ॥९९॥

चित्तीं म्हणतील श्रोतेजन । हा तर शिवाचा प्रियगण । प्रताप वर्णिला सुर-वराहून । अधिक ज्याच्या आख्यानीं ॥१००॥ यासी कैसे लोटिले हो विवरीं। कैसा नेला पाताळांतरीं । संकट पडिलें कां तयावरी । कां हो केलें शिव-स्मरण ॥ १ ॥ तरी ऐकावें ज्ञाते जन । राम लक्ष्मण अवतार जाण । कैसें गेले पाताळा घेऊन । कां हो बंधन तयासी ॥ २ ॥ कैसें तया द्यावया बळी । आणिले होते बांधून राउळीं । कां हो स्मरले हनुमंतबळी । निर्वाण समय पाहुनी ॥३॥ श्रीराम तो आदिनारायण । ब्रह्मा तयाचें पोटीं उत्पन्न । हे सृष्टी तयाच पासून । मग कां हो दशा भोगिली ॥ ४ ॥ कासया पडिले नागपाशीं । कां हो जाले वनवासी । कां भोगिलें दुःखक्लेशासी । कां वृक्ष कवटाळिलें ५ कां हो निशाचराच्या भेण । केलें राम शेजेवरी शयन । कैसी हो सीता नेली चोरून । हें तया भविष्य कळत नव्हतें॥६॥तयासी सिताशुद्धीचें संकट। कासया पडिलें निकट । कैसी पाहिलीसेवाट । वायुसुताची ॥७॥ त्रिभुवन हा तयाचा खेळ पूर्ण । तेही वर्तले मानवाप्रमाण । मग हा तर असे सेवक गण । कैळा-सवासीयाचा ॥ ८ ॥ हे तर सदाशिवाचीच करणी । कीर्ती वाढवावी भक्ताची जनीं । हेचि कथा जी शास्त्रपुराणीं । वेदादिका अवघ्या वो ॥ ९ ॥ न धरावा आनमान । सत्य मानोनी करावें श्रवण । संतजनीं होउनी सावधान । निरू-पण परिसावें ॥१०॥ दासाचें संकट वारुनी । शिव गेले कैलासभुवनीं । ते कथा पुण्यपावनीं । परिसावी श्रोते हो ॥११॥ शिवचरणाची धरुनी आस। आनंद सदा निर्भर असे । तोडी भवकाळाचा पाश। ऐसा सिद्धनाथें वर दिला ॥ १२ ॥ इति श्रीभूतेश आख्यान । वदविलें शिवे कृपेन । श्रोते होउनी सावधान । पुढें कथा परिसावी ॥ १३ ॥ इति श्रीशिवार्पणमस्तु ॥ अष्टमो-ध्याय गोड हा ॥ ८ ॥ एवं संख्या ॥ ११४ ॥

# अध्याय नववा.

श्रीनीलकंठाय नमः ॥ जय जयाजी त्रिलोचना । जय जयाजी असुरमर्दना । धांवसी दासाचिया निर्वाणा । पुढें ग्रंथ बोलवी ॥ १ ॥ अवघ्या देवांचा तूं देव । म्हणोनि नाम महादेव । रंक ते आदिपतिराव । केले अमरपुरीचे ॥ २ ॥ हस्तीं घेऊनि चक्रशूळ । करिसी शत्रूचें निर्मूळ । भक्त रक्षिसी जैसें बाळ । आपलें उदरींचें ॥३॥ भक्तकैवारी उमाकांत । दास रक्षिले अनंत । वेदपुराणादि वदत । ह्याच कीर्ति दयार्णवा ॥ ४ ॥ न वर्णवे तुझे गुण । जेथें शेषही जाला तल्लीन । जिव्हा फाटोनि जाल्या दोन । तुझे गुण वर्णितां ॥ ५ ॥ दासाचें संकट वारोनी । आपण गेले कैलासभुवनीं । एकत्र जाली शिवभवानी। अंकीं बैसविली गिरिजा ॥ ६ ॥ पार्वती म्हणे जी त्रिभुवनपती । नाहीं घेतलें नंदीप्रती । नसे घेतला त्रिशूळ हातीं । लागवेगीं धांविन्नला ॥ ७ ॥ ऐसें काय होतें भक्ता संकट । होता कोण दैत्यदानव बळकट । यालागीं केली बहुत निकट । वसन टाकून गेला पैं ॥ ८ ॥ पाठवावा होता गजवदन । अथवा वीरभद्रालागून । याचेनि न होतें कारण । तरीच स्वयें जावें होतें ॥९॥ तंव शिव ह्मणे वो दाक्षायणी । माझे निजभक्त मजलागुनी । तया संकट पडिलें गांजिलें ऐकोनी । मग धांवतों त्वरेनें ॥ १० ॥ तयाचा मज कळवळा येतसे । तंव मी धांवतों जैसें पिसें । न धरीं शस्त्रवस्त्रगणाची आसे । षडाननासारिखें ॥ ११ ॥ मज सेवकाचा कळवळा मोठा । म्हणोनी म्यां प्राशिलें काळकुटा । या लागीं मज म्हणती नीळकंठा । तेंव्हां पासुनी ॥ १२ ॥ रत्नें गळाली सागरीं । तेणें जाला इंद्र भिकारी । शरण येतां मज सुरवरीं । मथितार्थ म्यां मांडिला ॥ १३ ॥ बोलवी विधि नारायण । सुर आसुर सहस्रवदन । आणविलें मंद्राचलालागोन । मांडिला उपाय ॥ १४ ॥ पर्वत घातला सागरीं । शेषाची केली रवि दोरी । ओढूं लागले सुरअसुरीं । महा आवेशें॥ १५॥ पुच्छातें ओढिती सुर । मुखातें ओढिती असुर । हेलावतसे सागर । उडतसे आकाशें॥ १६॥ तयाचा घुमकार उठिला भारी । कल्पांत जाला पृथ्वी माझारी । रसातळा चालली धरित्री । न साहावे तेचेनी॥ १७॥ मग विष्णू कूर्मरूप होऊन । थिरा दिला धरेलागुन । काढावयां बैसले रत्न । देव दानव ओढिती ॥ १८ ॥ निघालीं चौदाही रत्न । ते असती महा निधान । ती

गळतां सहस्र-नयन । जाला रंक पैं ॥ १९ ॥ ती होय इंद्राची संपत्ती । तया योग्य तो आदिपती । यालागीं उपाय निगुती । श्रेष्ठ करावयासी ॥ २० ॥ तो माझा स्थापीत जाण । तया दिधलें पद भुवन । येरु रंक जालिया अभिमान । पडेल मजसी ॥ २१ ॥ मग सुरा असुरांच्या पंक्ती बैसऊन । विष्णूनें मोहनी स्वरूप होऊन । वाटूं लागली विभागून । नटनारी जाली ती ॥ २२ ॥ तंव राहूनें कापट्य स्वरूप धरून । बैसला देवामाजीं येऊन । करूं लागला अमृतपान । शशिमित्रें देखिलें ॥ २३ ॥ तयानें गुप्त जाणविलें मोहिनीसी । तिनें छेदिलें राहूच्या कंठासी । हा अनर्थ कळतां आसुरासी । आले चालून ॥ २४ ॥ सुरा असुरा युद्ध जालें दारुण । दानव न आटोपती देवालागुन । मग करुनी विंदान मोहिनीन । अवघा केला संहारू ॥ २५ ॥ दैत्याचा केला क्षय । देव पावले असती जय । हें तुज ठावकें असे प्रिये । परी दृष्टांतासी आलें ॥ २६ ॥ यालागीं संकलित सांगितलें कथन । मग सर्व देव एकाग्र होऊन । विभाग केले नारायण । सर्व रत्नाचे ॥ २७ ॥ इंद्राची अर्पिली इंद्राकारण । लक्ष्मी घेतली नारायण । उच्चश्रवा दिधला भानुकारण । एक काळकुटीं राहिलों ॥ २८ ॥ तया न सेविती कोणी । टाकितां दग्धील मेदिनी । मज अवघ्याचा कळवळा येउनी । तयातें भाक्षिलें ॥ २९ ॥ मी भक्ताचें स्वाधीन । मज न गमे तयावीण । ते जें सांगती कारण । तें तें स्वयें अंगिकारितों मी ॥ ३० ॥ वसतसें तयाचें ध्यानीं । ठसे तयाचे नयनीं । ते बैसती मुद्रा-लाउनी । मी उभा तिष्ठतों ॥ ३१ ॥ भक्त जाती गिरीं कपाटीं । मीही धांवतों तयाचे पाठीं । तेथें स्मरण केलिया निकटीं । प्रगट होतों ॥ ३२ ॥ पूर्वी होतो निराकार । भक्तालागीं त्रिगुण आकार । धरूनियां मी परमेश्वर । पंचस्वरूप ते जालों ॥ ३३ ॥ तयाचे जे स्वरूपीं भाव ठसे । तशाचे तेचि स्वरूपीं वसे । मागितलें तया पुरवीतसे । इच्छेसारिखें फळ ॥ ३४ ॥ भक्तालागीं नाना अवतार । धरिलेसें म्यां सर्वेश्वर । अनंत जन्मींचे पातकी अपार । शरण येतां उद्धरिले ॥ ३५ ॥ चंद्रें अभिलासिली गुरुअंगना । तेणें निसिद्ध जालों त्रिभुवना । परि सेवक माझा निर्धारी जाणा । यालागीं वंद्य केला ॥ ३६ ॥ वंद्य करावया काय कारण । आचरला असे तप दारुण । मग मी जालों तया प्रसन्न । वर द्यावया गिरिजे ॥ ३७ ॥ तंव विचारुनी पाहे अंतरीं । वर द्यावया नसे थोरी । मग उचलून टेविला शिरीं । अगोचर तप पाहोनियां ॥ ३८ ॥ येणें तारेचा केला अभिलाश । मग चालुनी आले सुराधीश । युद्ध यासी केलें विशेष । परी येणें पराभ

विलें॥३९॥चंद्र पावला जय। सुर पावले अपजय। मानिती याचें भय। असती अमरपुरीं ॥४०॥ मग इंद्र म्हणे बृहस्पतीसी। कोणता उपाय सुचवा मजसी। कैसी तारा येईल हातासी। ऐसें योजून सांगावें ॥ ४१ ॥ तंव ध्यानीं विचारुनी गुरून। सांगितलें तया विंदान। शुक्लपक्षीं चंद्रखंडन। होतें कळांचें ॥४२॥ मग तो समय चित्तीं धरून। आले बृहस्पति इंद्र चालून। हें कळतां शशीलागून। पळोनि आला कैलासा ॥ ४३ ॥ न चले उपाय तयासी। निवेदिती येउनी मजसी। आणुनी दिधलें तारेसी। केली गुरुस्वाधीन ॥ ४४ ॥ परि म्यां शिक्षा केली नाहीं चंद्रासी। तो मज प्रिय गे बहु मानसीं। त्याचेनि मी शीतळ शरीरासी। सुख पावतों पार्वते ॥४५॥ तो मज प्राणाहून प्राण। तेणें माझी भक्ति केली निर्वाण। यालागीं अक्षयीं वंद्य करून। ठेविला मस्तकीं ॥ ४६ ॥ आणिक सांगतों तुजलागून। मिरवितों भक्ताचीं भूषणें। तें मज प्रिय बहु प्राणाहून। अक्षयीं जडिलें शरीरीं ॥४७॥ न आवडे मज दिव्य रत्नवसन। मज न आवडे तुरंगवहन। वहना आवडीं भक्ताचींच भूषणें करून। कैसी पा हो वंदितों ॥ ४८ ॥ चंद्र ठेविला लल्लाटीं। गंगा निर्मळ वाहे जटीं। पन्नगहार जडिले कंठीं। निजभक्त म्हणोनियां ॥४९॥ निज भक्ताचीं रुंडें कंठीं। भूषण मिरवितों मी धुर्जटी। मी तंव लावोनि लंगोटी। संपत्ति दिधली सेवकां ॥ ५० ॥ नमिलें मस्तकीं मुगुट। यालागीं गुंडाळितों जट। भोजना न मिळे ताट। नर-करोटींत भक्षितों मी ॥ ५१ ॥ पांघरावया न मिळे वस्त्र। म्हणोनि वागवितों गजांबर। भक्त रक्षावया शस्त्र। त्रिशूल चक्र घेतलेंसे ॥ ५२ ॥ उदकप्राशना घेतला भोपळा। भाग्यवंत केलें सकळां। मी जालों संपत्तीवेगळा। बैसलों गोसावी होउनीयां ॥ ५३ ॥ भक्त जरी माझे मृत्यु पावलियां। शरीर त्याचें जाऊं नेदीं वांया। त्याची उत्तम विभूति करूनियां। सर्वांगास चर्चितों॥५४॥ तें माझें गा चिताभस्म। तें मज अती प्रियोत्तम। यालागीं मी भक्ताचें काम। निसंग होऊन करितों ॥ ५५ ॥ न धरीं थोरपणाची लाज। स्वयेंच जाऊन करितों काज। श्रीदास उणें येतां जरी मज। त्रिभुवन ठेंगणें ॥ ५६ ॥ म्हणोनियां दाक्षायणी। गेलों त्वरें धाउनी। दास रक्षिला निर्वाणीं। आपला जाऊनियां ॥५७॥ मज दासाची अतिशय करुणा। त्रिभुवन वांटिलें भक्तजना। अक्षयीं केली पदीं स्थापना। मी बैसलों स्मशानीं ॥ ५८ ॥ क्षुधा लागलिया अंतरीं। मग होतों गे मी भिकारी। झोळी घेऊनियां करीं। भिक्षाटना निघतों ॥ ५९ ॥ फिरतों भक्तांचे द्वारोद्वारीं। लज्जा

र्पेहून दिधली सारी । न धरीं स्वामित्वाची थोरी । अर्पितो ते घेवों ।। ६० ।। न पाहीं थोर लहान । भक्ती केलिया निर्वाण । मागितलें देतों तयालागुन । न फिरवी दासासी ।। ६१ ।। कोणी विन्मुख गेला मागता । ठावकें आहे तुज परता । तुज दिधलें होतें लंकानाथा । हें स्मरतें कीं नाहीं ।। ६२ ।। जें जें मागतीं वरदान । तें तें वोपितों त्यांजलागुन । नाहीं पाहाती विचारून । कोणता वर द्यावा तो ।।६३।। भस्मासुरा वर देउनी । मग पस्तावलों मनीं । तंव अर्पिलें तुजलागुनी । तयाच्या भयें ।।६४।। मज पडलें निर्वाण । केलें विष्णूचें स्मरण । धाऊन आला नारायण । विंदान भस्म केला ६५ मी भक्तासी देऊन सुख । भोगीत होतों कठीण दुःख । जाचीत होतें काळकूट । दाह होय शरिरासी ६६ चंद्र ठेविला मस्तकीं शीतळ । गंगा वाहे जटीं झुळझुळ । कंठीं जडले असे व्याळ । परी न राहे अग्न तो ।। ६७ ।। तंव जपो लागलों रामराम । तेणें पावलों सखे विश्राम । हे भक्त कार्यास्तव श्रम । भोगितों मी ।। ६८ ।। जें जें मागितलें सेवक जन । तें तें केलें तया अर्पण । तुज ठावके असोनि पूर्ण । परी स्पष्टार्थ निरोपितों ।। ६९ ।। नाहीं मज सिंहासन । व्याघ्रांबर घालितों आसन । बैसावयां नसे उत्तम वाहान । वृषभारूढ होतों मी ।। ७० ।। न मिळे केशर कस्तुरी चंदन । यालागीं भस्म करितों लेपन । न मिळे दिव्यांबर वसन । चर्मालागीं अंगिकारीं ।। ७१ ।। मज भक्ताची आवड मोटी । यालागीं धरिलेसे कंठीं । न सोडवे तयाची मिठी । मज दाक्षायणी।।७२।। कैसें उरगाचें अनुष्ठान । कंठिती वायूचें भक्षण । प्रीतीनें जडले हर होऊन । न सांडिती मजसी ।।७३।। सेवका अर्पिलें अवघीं वहन । मी झालों तयाचेंच वहन । चंद्रा मस्तकीं ठेऊन । कंठीं ठेविले व्याळा ७४ ऐसा मज भक्ताचा कळवळा । पार्वती म्हणे सत्य दयाळा । परी मज एक आठवले कृपाळा । क्षमा करावी बोलती ।। ७५ ।। तुम्ही श्रीयाळाच्या येथें जाऊन । वधिले तया बाळालागुन । करावया कैसें बैसला भक्षण । हा कैसा कळवळा ।। ७६ ।। सिभ्री राजा पुण्यकीर्ती । धर्मराज धर्ममूर्ती । जाउनी तया नगराप्रती । केलें कैसें विंदान ७७ मज कपोती केले त्रिनयना । तुम्ही जाला जी बहिरीससाणा । मांस तुकविलें तयाचे जाणा । हा कैसा जी कळवळा ।। ७८ ।। शंभू म्हणे वो पार्वती । म्यां छळिलें वो तयाप्रती । यालागीं जालीसे तयाची कीर्ती । वंद्य जाले पुराणीं ।। ७९ ।। हरिश्चंद्र राजा पुण्य कीर्ती । छळविलें विश्वामित्रा हातीं । कीर्ती वाढविली त्रिजगतीं । मग नेला मोक्षासी।। ८० ।। पाहा गे पांडवाप्रती । छळ-

विलें कौरवा हातीं । म्हणोनी जालीसे कीर्ती । भारतादिक ॥ ८१ ॥ हिरा भूमीमाजीं होतो उत्पन्न । तया करावें नाना यत्न । मग तो मोला चढे विशेष गुण । कसलिया अंतीं ॥८२॥ यालागीं मी भक्त निधान । पाहिली कसवटी । उतरोन । वंद्य केले तयालागुन । पुराणशास्त्रें ॥८३॥ घेऊन गेले निजपदासी । नगरीं सुद्धां कैलासवासी । अक्षयीं ठेविलें आपल्यापाशीं । निज भक्त माझे हे ॥ ८४ ॥ पार्वती म्हणे जी कैलासपती । सत्य सत्य तुम्ही वदलेती । माझी पुरली मनोवृत्ती ।.तुमचे उत्तर प्रसादें ॥ ८५ ॥ न वर्णवें तुमचें भोळेपण । तुम्हाठायीं नाहीं थोर सान । श्वान–मूषकालागीं विमान । प्राप्त केलें दयाळा ॥ ८६ ॥ तस्कर अती दुराचार । पारधी असे अती कठोर । तया अंतरीं नसतां भक्तिनिर्धार । मोक्षपदातें नेले ॥ ८७ ॥ देणें तुमचें पशुपती । तृणा जडजीवा देता मुक्ती । न वर्णवे तुमची कीर्ती । म्हणोनी लागली चरणासी ॥ ८८ ॥ ऐसा शिवपार्वतीचा संवाद । चरणीं लागलासे आनंद । म्हणे स्वामी मी मतिमंद । मूढा हातीं ग्रंथ बोलवी ॥ ८९ ॥ इति श्रीभूतेश आख्यान । वदविलें शिवेंकृपेन । श्रोते होऊन सावधान । पुढें कथा परिसावी ॥ ९० ॥

## अध्याय दहावा

श्रीगणेशाय नमः ॥ जयजयाजी गंगाधरा । जयजयाजी त्रिलोक्यहारा । जयजयाजी भक्तकैवारा । पुढें ग्रंथ बोलवी ॥ १ ॥ मळोजी प्रगटला मंदिरीं । हें नवल जालें थोरी । वर्तमान ऐकतां निजाम बहेरी । तोषातें पावला ॥ २ ॥ बोलावूं पाठविलें तयासी । परी कंप सुटला मंत्रिसी । म्हणे लपूं पाताळभूवनासी । तरी तेथूनहि हांक फोडील ॥ ३ ॥ तरी आतां तयासीच जावें शरण । मग नृपासी आज्ञा मागोन । म्हणे मीच येतों तयासी घेऊन । आदरें करुनियां ॥ ४ ॥ मग तयाच्या स्थानीं जाऊन । भेटला तयाकारण । म्हणे पातशहा तुजवीण । होते फार दुःखित ॥ ५ ॥ आम्हांहि न गमे तुजाविण । नेणों तुज कैसें जालें विघ्न । सुरें किंवा निशाचर येऊन । केली होती हे गती ॥६॥ मग दानधर्म करवी अपार । अर्पी वस्त्रें अळंकार । सुवर्णपुष्पें तयावर । उधळीतसे कैसा ॥ ७ ॥ म्हणे तूं पातशाहासी आधारू । आकाशास जैसा मेरू ।

पातळीं जेवीं फणिवरू । तैसा तूं राज्यासी तया॥८॥आमुच्या दैवेंकरून । तुज वांचविलें देवान । पाहा हो कैसा बोधून । घेऊन चालिला रायापासी ॥ ९ ॥ मळोजी मौन्यच राहोन । कांहीं न बोले वचन । मनांत गुह्य ठेवून । गेला रायापासीं ॥ १० ॥ रायें हर्ष मानोन । आळंगिलें तयालागून । म्हणे तुज रक्षितो भगवान । वाली तुझा समर्थ ॥११॥ वस्त्रें अळंकार तया देत । तयावरून करवी खैरात । म्हणे आतां राहे गा सावध चित्त । स्वस्थ आपुले ठायीं ॥ १२ ॥ मळराव आज्ञा घेउनी । आला आपल्या स्वस्थानीं । परी पुढें भविष्यासारिखी करणी । करणें शिवास ॥ १३ ॥ लोटले कांहींएक काळ । दुष्ट बुद्धि चित्तीं अढळ । मग त्यानें मेळऊन भूपाळ । बैसला एकांतीं ॥ १४ ॥ तुम्ही अवघे दक्षणचे नृपती । मळोजीनें आच्छादिली तुमची कीर्ती । काळतोंड केलें तुम्हांप्रती । सर्व जनांत ॥ १५ ॥ राजे तुम्ही प्रतापी पूर्ण । वर्ततां तयाच्या अज्ञेन । हें तुम्हांसीच लाजिरवाण । वाटतें कीं नाहीं ॥१६॥ स्वामिहि आपला भिऊन । जाहाला तयाच्या स्वाधीन । आपण करावा कांहीं यत्न । कीं ज्यानें तो मृत्यु पावे ॥ १७ ॥ ते म्हणती काल पाताळांतरीं । नेला होता निशाचरीं । तयासी जिंतोनि सत्वरी । आला पैं वेगें ॥ १८ ॥ व्यर्थ कासया उपाय करिसी । रायें श्रेष्ठ केलें तयासी । आपणहि मान्य करुनी तयासी । सख्यत्व करावें ॥ १९ ॥ पूर्वी तुझेंच ऐकून । लयातें पावलें सर्व सैन्य । वांचविले आपले प्राण । पळोनियां ॥२०॥ रणीं पावलों अपजय । तेंच अद्यापि पाळितों भय । अपकीर्ति पावला राय । सैन्य भंगलियां ॥ २१ ॥ माणिकासारिखें रत्न । मृत्यु पावलें तंव बुद्धीन । त्वांच व्याघ्र आणविला सोडून । तेथेंहि आम्ही वांचलों ॥ २२ ॥ तो जरी फेंकितां सभेवरी । तरी गत नव्हती बरी । त्वांच आणोनियां कुंजरीं । गांठ घातली तयाची ॥२३॥ सभेवरी झोंकितां जरी वारण । तरी रायासुद्धां होतों चूर्ण । पातशाही जाती बुडोन । तुझिया बुद्धीनें ॥ २४ ॥ कौरवांचिया राज्याभितरीं । शकुनी होता दुराचारी । तयाचिया बुद्धीनें समग्रीं । कौरव नाशातें पावले ॥२५॥ तैसें तुझिया बुद्धीच्या बळ । भोगिलें असे एक फळ । तो जन्मला असे काळ । सुर किंवा असुर पैं ॥ २६ ॥ तयास त्वां बहुत केले उपाय । तितुकेहि सर्व जाले अपाये । अझुन कां मूढा समजसी नये । मरण आलें पैं ॥ २७ ॥ आतां न ऐकूं तुझें वचन । आमुचेंहि आणसील मरण । जैसी रजस्वला नौकीं बैसोन । घात करी सर्वांचा ॥ २८ ॥ मंत्रीचा असे

कनिष्ठ बंधू । तयानें करुनी विप्र संबंधू । विद्या अभ्यासिली जेवीं सिंधू । होय विद्येचा ॥ २९ ॥ यातीचा असोन यवन । पुराण शास्त्रें जया व्युत्पन्न । अर्थदृष्टी जयाकारण । असें बहुत सूज्ञ पैं ॥ ३० ॥ राजियानें धिःकारितां बंधूलागुन । आपण हाटकून नृपाकारण । बोलता जाला कैसें वचन । तें परिसावें ॥ ३१ ॥ सुर आसुर सर्व मिळोन । देवें केलें समुद्रमंथन । तेथून काढिलें चौदा रत्न । विभागून घेतलीं ॥३२॥ परी राहिलें एक वीष । कोणी न सेविती तयास । प्राशन करावयां कोणास । आवांका नसे पैं ॥ ३३ ॥ मग शिवें प्राशिलें काळकूटा । तेणें जाला नीळकंठा । परी तें दाह करितसे मोठा । मग करी उपाय ॥ ३४ ॥ गंगा ठेविली जटीं । चंद्र ठेविला ललाटीं । सर्प हार जडले कंठीं । शीतळ म्हणोनियां ॥ ३५ ॥ मग स्मरला राम नाम । तेणें पावला तो विश्राम । शिवें तो सर्वोत्तम । परी त्यासहि न साहावे ॥३६॥ कोणे एका समयाचें अवसरीं । देवा समय पडला भारी । मग मिळोनियां समग्री । आले दधिपासी ॥ ३७ ॥ आपलीं शस्त्रें जमा करून । अवघ्यांनीं केलीं ऋषी-च्या स्वाधीन । देव गेले मंद्राचलालागुन । काल क्रमावया ॥ ३८ ॥ तंव ऋषीनें केला मनीं विचार । यासी जतन करूं कोठवर । मग करूनियां थोर निर्धार । उपाय करी तो श्रेष्ठ मुनी ॥ ३९ ॥ मंत्राचियां सामर्थ्यें करुनी । शस्त्राचें केलें असे पाणी । गेला प्राशन करुनी । जिरविलीं शरीरीं ॥ ४० ॥ पाहा कैसा सामर्थ्यवान । करणीं केली तयें दारुण । सुरवरां जंव पडलें का-रण । तंव आले मागावयां ॥ ४१ ॥ मग तये कथिलें वर्तमान । शस्त्रें गेलीं अवघीं पेवोन । मग देवीं आश्चर्य करून । स्तब्ध जाले ॥ ४२ ॥ परी खोळं-बलें सुराचें कारण । मागती ऋषी लागुन । मग धेनूपासून त्वचा चाटऊन । हास्ती दिधल्या देवासी ॥ ४३ ॥ मग हरिहर मिळोन सुरवर । करिते जाले ते विचार । पाताळीहून आणिला फणिवर । मार्कंडेया बोलाविला ॥ ४४ ॥ मार्कंडेयाची केली साहाण । बाडीं केला सहस्रनयन । पुच्छे बोढिती सुरवर गण । हरी जाला मुखाकडे ॥४५॥ सहस्रभुजा विष्णू होऊन । बोढी तयाची सहस्रवदन । शिव बैसला हस्ती घेऊन । मार्कंडेयावरी चालितसे ॥ ४६ ॥ तयाचीं केलीं दोन चक्रें । विभागून घेतलीं हरिहरें । तया वेळे फणिवर । क्लेश फार पावतसे ॥ ४७ ॥श्वास दाटला असे फणिपाळा । ओमीतसे मुखीचिया विषज्वाळा । तेणें जाला विष्णू सावळा । ऐसें ऐकिलें ॥ ४८ ॥ अवघ्या श्रेष्ठ हरिहर जाण । ज्यांनीं निर्मिलें असे त्रिभुवन । तयासी वीष बाधलें पूर्ण ।

मग कथा काय इतराची ॥ ४९ ॥ मी तर यातीचा असे यवन। परी वर्तत असे तुमचे संगतीन। तुम्ही ऐकतां शास्त्रें पुराण। मीही संगतीनें ऐकतसें ॥ ५० ॥ रामरहिम एकचि जाण। भेद नाहीं दोघांलागुन। परी लटिकाची धरिती मूर्ख अभिमान। आपुलाले जातीचा ॥५१॥ कौरवें नेलें भीमा लागुन वीष मेळऊन घातलें भोजन। तात्काळ गेला तयाचा प्राण। हें कां तुम्हीं ऐकिलें नाहीं ॥ ५२ ॥ भीम तर हराचा अंश। त्यास सत्वरीच बाधलें वीष। मग मळोजी तरी दिसते मनुष्य। विलंब कां करितां वीष द्यावया ॥ ५३ ॥ मानले अवघ्यासी वचन। म्हणती भला गा सूज्ञ बुद्धिवान। यवन कुळी-माजी जन्म घेऊन। सार्थक केलें जन्माचें ॥ ५४ ॥ आम्ही राजे महाराष्ट्र जाण। नित्य करितों पुराण श्रवण। परंतु न होय पुरतें मनन। तुज ऐसे गुणवंता ॥ ५५ ॥ पाहून समयाचें कारण। दृष्टांत दिधला त्वां योजून। आतां मोडिलीं आमचीं मन। इच्छे सारिखें करीं गा ॥ ५६ ॥ मग सकळ नृपती मिळोन। मळोजीस बोलाऊन। आले बागांत घेऊन। सन्मानें करून तोषविला ॥ ५७ ॥ अफूच्या गोळ्या करुनी। आपण घेतल्या सर्वांनीं। विषाची गोळी निर्मुनी। मळरायातें दिधलें ॥ ५८ ॥ त्याचे विश्वासें करून। गोळी भक्षिली मळोजीन। परी कैसें सिद्ध होईल कारण। त्या दुष्टाचें ॥ ५९ ॥ कैसा स्वामी त्रिनेत्री। जयाची करणी विचित्री। कंठी-च्या पुष्पावरी धरत्री। जेणें धरिली आश्चर्यी ॥६०॥ रक्षिता थोर भगवंत। भक्त रक्षिलें गा अनंत। ब्रिदाचा अभिमान पाळीत। वायां कैसा जाऊं देईं ६१ व्यास वाल्मिक सिद्ध मुनी। नाहीं वदले हे पुराणीं। वायां गेला भक्त म्ह-णोनी। नाहीं ऐसें ऐकिलें ॥६२॥ प्रल्हादा ऐसें भक्तनिधान। हरिद्वेषें गांजि-येलें पितयान। विघ्नें केलीं अति दारुण। परी नारायणें रक्षिलें ॥६३॥ जात-वेदें केला शीतळ। विष जालें अमृत केवळ। वावीळ पन्नगाची गरळ। म्हण-ऊन त्यासी डंखविती ॥ ६४ ॥ देती पर्वतीं लोटून। सागरीं टाकिती नेऊन। तयावरी घालिती वारण। परी रक्षिता निराळा ॥६५॥ पाळी भक्ताचें वचन। भक्त गांजिले देखोन। प्रगटला स्तंभांतून। जाला केसरीस्वरूप ॥ ६६ ॥ पा-वला गजेंद्र आक्रांतासी। जोहरीं रक्षिलें पांडवासी। कुरुक्षेत्रीं टिटवीच्या पिलासी। घंटा टाकुनी रक्षिलें ॥ ६७ ॥ कपोताकपोती वृक्षमाथा। ससाणा सोडिला तयावरुता। बाण लाविता धनुष्यशीता। तेथें कैसें रक्षिलें ॥ ६८ ॥ गोकुळावरी शिळाधारी। पर्जन्य पाडिला सचिवरीं। तये गोवर्धन धरुनी करीं।

व्रजवासी रक्षिलें ॥ ६९ ॥ गोपाळ गाई काळयाडोहीं । मृत्यु पावल्या सर्वही । कृपाकटाक्षें भुजगशाई । उठविले कैसे ते ॥ ७० ॥ प्रसन्न करुनी दुर्वासासी । पाठविलें धर्मा छळावयासी । तेथें करणी करूनि कैसी । शापापासुनी रक्षिलें ॥ ७१ ॥ अंबऋषीचिया कैवारें । अवतार घेतला परमेश्वरें । दासाचे क्लेश आपुल्या शरिरें । भोगले कैसे ते ॥ ७२ ॥ विष्णु म्हणोनि राजाची कुमरी । भोगी कोणी दुराचारी । तयासी संकट पडतां शरीरीं । प्रगटोन रक्षिलें ॥ ७३ ॥ कढईत रक्षिलें दर्दुरासी । गर्भी रक्षिलें परिक्षितीसी । सांगू संख्या कोठवर ऐसी । जेथें सहस्रमुख शिणला ॥ ७४ ॥ हरिहरस्वरूपें धरून । केलें भक्तांचें पाळण । मळोजीस विष गेलें जिरोन । जालें अमृतातुल्य तें ॥७५॥ जयाचा साहाकारी उमारमण । तयासी काय करील गा विघ्न । परी भक्त-महिमा वाढवावा म्हणौन । करी विंदान दुष्टाहातीं ॥ ७६ ॥ मळोजीस जाण-वलें मनीं । घात योजिला होता दुष्टांनीं । मग लटकीच मूर्च्छना आणोनी । पाहे कौतुक तयांचें ॥ ७७ ॥ राजे म्हणती जाला घाबिरा । अवघेचि पेटले माहामारा । हाणिते जाले निखुरशस्त्रा । न मानिती भयातें ॥ ७८ ॥ शस्त्रें जैशीं लागती तृण । गेलीं आवघीं बोठ होऊन । मग क्रोधें खवळला दारुण । उठो-नियां काय करी ॥ ७९ ॥ म्हणे सोसिले यांचे बहुत अन्याय । म्हणोनि हे मागुती करिती उपाय । आतां यांसी वधावयासी काय । विलंब असे ॥८०॥ बोलिलों होतों शिवातें वचन । तेंच तयें घडविलें पूर्ण । यांसी काय शस्त्रें मारून । तंव धरितां जाला तयांसी ॥८१॥ मग द्वादश नृपाचीं शिर । नखें खुडलीं एकसर । तंव कळला समाचार । त्यांचिया सैन्यासी ॥८२॥ राजि-यांचें ध्यावया उसिन । चालुनी आलें सर्व सैन्य । देती मार चहूंकडून । उल्हाट यंत्राचा पैं ॥८३॥ मग मळोजी उठोन त्वरित । उपटिला एक गजदंत । वीर सुटला झोडीत । पळो लागले दशदिशा ॥ ८४॥ महा वीर पाठी देउनी । पळते जाले रणांतुनी । म्हणती येणें मांडिली पूर्वीची करणी । प्राण वांचवा रे आपुले ॥ ८५ ॥ पेटला थोर सैन्यमारा । न फिरेच तेव्हां माघारा । धरणी ठाव न देई वीरा । आणिले अमित्य रणासीं ॥८६॥ मग म्हणे मुख्य धुरा । त्या पाठविल्या मृत्यूपुरा । आतां कासया वधू ह्या पामरा । बैसला स्वस्थ पै ॥ ८७ ॥ नगरांत गेली तेव्हां खबर । हाडबडलें अमदानगर । निजाम राजा कांपे थरथर । गर्दी जाली चहूंकडे ॥ ८८ ॥ माता सांडूनी लेंकरा । पळत्या जाल्या देशांतरा । भ्रतारासी म्हणती दारा । आम्हां सांडूनी नव जावें ८९

म्हणती पूर्वीं हे ऐसे रावण । जानकी आणिली चोरून । तिचिया कोपास्तव आग्न । लंकेस लाविला मारुतें ॥ ९० ॥ तैसें केलें पातशाहान । कैसें आणिलें दुर्घट विघ्न । हा आवतारपुरुष जन्मला कोण । व्यर्थ यासी छळिलें ॥ ९१ ॥ गेली गर्दी थोर होऊन । लुटती एक एकाचें धन । मग रायें धीरत्व धरून । केलें स्वस्थ सर्वांसी ॥ ९२ ॥ रायें मळोजीस बोलावून । तयाच्या कंठीं मिठी घालून । केलें बहुत समाधान । तें कवणेपरी ॥ ९३ ॥ तयांनीं तुज कापट्य केलें । तुज भगवंतें वांचविलें । ज्याचें तेंच फळ पावलें । तूं राहे स्वस्थ पैं ॥ ९४ ॥ एके दिवशीं पाचारून । बैसला अंकीं घेऊन । राजा म्हणे मजला पुसणे । असे एक गा ॥ ९५ ॥ देई मजला भाकदान । तरी मी तुजसी पुसेन । नाहीं तरी व्यर्थ बोलण । कासया बोलूं ॥९६॥ मग मळोजीन दिधली भाकदान । तुम्ही म्हणाल तें सांगेन । चित्तीं न धरावा अनुमान । सत्य सत्य गा राया ॥ ९७ ॥ राजा म्हणे यादवकुळीं । तूं जन्मलासी महाबळी । कीर्ति जाली भूमंडळीं । अक्षई तुझी ॥ ९८ ॥ माझें सैन्यबळ सागर । त्याचेन मी दक्षण इंद्र । त्वां युद्ध करुनी घोरादर । आटिलें पैं ॥ ९९ ॥ जैसा महावनालागुनी । किंचित् दग्धी वन्ही । तैसी त्वां केली करणी । सर्व सैन्यासी १०० मज पुसावया एक कारण । तुज आहे कीं नाहीं मरण । कोण दैवत तुज प्रसन्न । कीं ऐसा वर दिधला ॥ १ ॥ मग मळोजी विचारी चित्तीं । कीर्ति माझी जाली जगतीं । देवें आयुष्यमर्यादा सांगितली होती । ती जाली समाप्त ॥ २ ॥ वंश उदरपोषणासी । वृत्ती मागावी राजयासी । मग बोलता जाला तयासी । कवणेपरी तें ॥ ३ ॥ तूं पातशाहा म्हणविसी । वचनीं गोवून मरण पुससी । तरी वृत्ति देई वंशासी । जेणें कीर्ति तुझी ॥ ४ ॥ मग पातशहा मनांत संतोषान । दिधली वृत्ति देशमुखी करून । तीनशें साठ कडेवळीत त्यान । सनदा करून दिधल्या ॥ ५ ॥ मळोजी म्हणे गा नृपती । मज प्रसन्न तो भूतपती । नांदतो कैलासाप्रती । त्याचा वरद हा ॥ ६ ॥ आवघ्या भूतांचा स्वामी म्हणवीत । सर्वां भूतीं तोच पैं नांदत । चराचर त्रिभुवनामाजीं वसत । चतुर्खाणीं व्यापिला ॥ ७ ॥ इंद्र आज्ञा वंदिती मुगुटीं । शेष जाला हार कंठीं । जयाचे सत्तें चाले सृष्टी । तो धुर्जटी स्वामी माझा ॥ ८ ॥ पदीं स्थापिलें सुरवर । धराधीपति केला फणीवर । रविशशी जयाचे नेत्र । तो पंचवक्त्र स्वामी माझा ॥ ९ ॥ तो काळाचाही काळ । तेणेंचि निर्मिले कळिकाळ । तो मज

रक्षी सर्वकाळ । तेथें विघ्न कोण करूं शके ॥ ११० ॥ राजा म्हणे प्रताप-कीर्ती । होऊन गेली आणीक जाती । परी मृत्यु सुटला कवणाप्रती । तो सांग रे ॥ ११ ॥ थोर प्रतापी पंडुनंदन । गेले प्रतापकीर्ति होऊन । जयाचा साह्य-कारी श्रीकृष्ण । ते काय वांचले ॥ १२ ॥ आवतारादिक रामकृष्ण । ते काय राहिले अझून । भविष्यासारिखें वर्तोन । गेले आपल्या निजधामा ॥ १३ ॥ ऐक राया सावधान । माझा स्वामी त्रिलोचन । त्यानें सांगितलें होतें विंदान । तेंच कर्तव्य करितों मी ॥ १४ ॥ ऐसें बोलून वचन । म्हणे आलें मृत्याव-सान । मग आठवुनी स्वामीचें ध्यान । माता समीप बोलाविली ॥ १५ ॥ सनद केली तिच्या स्वाधीन । ताईत काढिले भुजा चिरोन । ते गेले अदृश्य होऊन । न पडती दृष्टीसी ॥ १६ ॥ मुखीं स्मरिलें नीळकंठा । आपुले हस्तें छेदिलें कंठा । तंव कैलासीं वाजिन्नल्या घंटा । उतरलें दिव्य विमान ॥ १७ ॥ मावळला कीर्तीचा दिनकर । आभ्रें झांकिला रोहिणीवर । तैसा लोपला भूत-कुमर । घेऊन गेले कैलासा ॥ १८ ॥ चित्तीं म्हणतील श्रोतेजन । किं शिवगण कैसें मरण । तरी श्रीकृष्ण अवतार पूर्ण । धिवराहातीं मृत्यु कैसा ॥ १९ ॥ कलेवर वाहाविलें सागरीं । लुटविली द्वारकानगरी । भुलवुनी यादवां संहारी । आपण गेले निजधामा ॥ १२० ॥ ऐसी परमेश्वरी करणी । सोंगाची करावी संपादणी । तैसें मळोजीस जन्मवुनी । मृत्यु जनां दाखविला ॥२१॥ हें देखोन माता डोळा । कैसें केलें रे वेताळा । प्राणा मुकविलें माझ्या बाळा । आतां कोठें पाहूं रे ॥ २२ ॥ माझ्या सकुमार पाडसा । प्राणसख्या राजहंसा । तुज वागविलें नवमासा । कोठें टाकून गेलासी ॥ २३ ॥ तुजसाठीं माझ्या वार । पूजिला कर्पुरगौर । नेत्रकमळीं स्वामी हर । पूजिला कीं ॥२४॥ द्वादश वरुषें तपोवन । सेविलें कीं रायान । सहस्त्र कमळें वाहोन । आराधिलें शिवा २५ प्रसन्न होउनी त्रिनयन । दिधलें तुज ऐसें निधान । नाहीं लाधलें मजलागून । ह्या दैवासी २६ ॥ शरीर टाकिलेंसे धरणीं । कैसें मज मोकलिलें वनीं । गेला कैसा टाकुनी । पुत्रराया सुजाणा ॥ २७ ॥ चौदा वरुषें रामराणा । गेला होता निकट वना । परि माघारा येईल ही वासना । होती कौसल्येसी ॥२८॥ तैसें कां मज नाहीं केले । निर्वाण वनीं टाकिलें । अक्षई मुख लपविलें । कोठें पाहूं वे आतां ॥ २९ ॥ जवळ बैसऊन भोजन । वाढूं कवणालागून । कैसा कोपला दारुण । राणा कैलासींचा ॥१३०॥ हारपलें माझें रत्न । गेलें जह्याज

बुडोन । कीं पर्वत पडिला वरून । एकाएकीं अवचितीं ॥ ३१ ॥ तुझें दुःख पाहावया । देवें वांचविलें सखया । कैसें केलें कैलासराया । स्वामिया माझ्या ॥ ३२ ॥ तूं कुळींचा आमुचा दाता । तूंचि जालासी पुत्र देता । तूंचि जालासी कैसा नेता । नाहीं आली करुणा ॥ ३३ ॥ तुझा तुजसी आवडला । म्हणऊन स्वामी घेऊन गेला । मजवरी कोप केला । दिनानाथा कैवारिया ॥ ३४ ॥ बडवितसें वक्षस्थळ । बाळा कैसा आला काळ । कवणा म्हणूं मी आतां बाळ । माझिया जिवलगा ॥ ३५ ॥ तुटली पुत्राची जोडी । घालूं कोणा मी सांकडी । कैसी दृष्टि केली वांकुडी । त्या उमानाथें ॥३६॥ फुटला माझ्या स्तनीं पान्हा । पाजूं कवणा राजीवनयना । उठुनीयां येईनासी रे नंदना । रुसलासी रे मजवरी ॥ ३७ ॥ काय मुख दाखवूं रायाप्रती । काय सांगूं तयाप्रती । कैसी मुखांत पडिली माती । माझिया चिमण्या ॥ ३८ ॥ मज पापिणीचें घर । कैसें बुडविलें विश्वंभरें । काय अपराध आचरली थोर । म्हणऊन ऐसें केलें गा ॥३९॥ कीं पूर्वजन्माच्या पातकरासी । फळा आल्या ह्या जन्मासी । म्हणऊन देखिलें पुत्रशोकासी । ह्या प्रारब्धें ॥ २४० ॥ कीं केलें कोणाचें दुष्ट छळण । कीं वधिलें कवणाच्या बाळालागून । किंवा मार्ग पाडून केलें हनन । बहुतांचें पैं ॥ ४१ ॥ अरे अविंधराया तूं कृपाळु म्हणविसी । आज कैसें छळिलें माझिया बाळकासी । यालागीं प्रवर्तला घातासी । आपुलिया ॥ ४२ ॥ आणिलें त्वां विश्वास देऊन । येथें कैसें केलें छळण । तूंचि कापट्य वर्तलिया जाण । मग सांगावें कोणासी ॥ ४३ ॥ राजें सर्वस्वें हरिलें । पाठीराख्यां शीर छेदिलें । तारकें कासेस लावून बुडविलें । तरी शरण जावें कवणा ॥ ४४ ॥ आंग टाकूनि धरणी । गडबडा लोळे जननी । दिससी कीं रे केविलवाणी । तुजवांचूनि बाळका ॥ ४५ ॥ गिरिजा शोकें आक्रंदत । जनाचे नेत्रीं अश्रु वाहात । राजा कळवळला चित्तांत । म्हणे म्यां व्यर्थ मरण पुसिलें ॥४६॥ याचियान प्रतापबळ । जिंकीतों पृथ्वीचे भूपाळ । होतों जेविं अमरपाळ । मृत्युलोकींचा॥४७॥ माता म्हणे अन्न लावूं दैवाला । निधान पचलें नाहीं मजला । आक्रोशें श्वास कोंडून गेला । पडिली मूर्च्छित ॥ ४८ ॥ तो अस्त जाला वासरमणी । रात्र जाली माध्यान्ही । गिरिजेचा शोक ऐकिला कर्णी । त्या गौरिहरानें ॥४९॥ तिची करुणा येऊन । चित्तीं द्रवला उमारमण । सिद्धेश्वर वेताळ स्वप्नीं येऊन । बोलती वियेसी ॥ १५० ॥ गिरजेसी सावध करून । म्हणती ऐक गा वचन ।

आवतारादिक गेले होऊन । मृत्यु कवणा सुटला ॥ ५१ ॥ तुझे भ्रतार भावा-र्थेसी । मज पूजिलें निश्चयेसीं । तेणें अर्पिलें नेत्रकमळासी । तैसें दिधलें फळ गा ॥ ५२ ॥ थोर संतोषोनी मनीं । म्हणउनी पुत्र दिधले दोन्ही । हा अल्प आयुषी तुजलागुनी । दिधला होता ॥५३॥ तव भ्रताराचा मनोरथ करावया पूर्ण । दिधला आपला प्रियगण । त्याची आयुष्यमर्यादा पुरली म्हणऊन । घेऊ-नियां गेलों कैलासा ॥ ५४ ॥ तूं व्यर्थ कां करिसी शोक । आतां हेंच मानी सुख । कीर्ति दिगांतरीं जाली देख । तव पुत्राची ॥ ५५ ॥ कनिष्ट पुत्राची वृद्धि वाढवून । तया वंशाचें करूं पाळण । ही भाक आमची पूर्ण । घेई भक्तजननी ॥ ५६ ॥ तंव गिरजा निद्रा विसर्जून । बैसली सावध हो-ऊन । चित्तीं मानूनि समाधान । स्वस्थ राहिली ॥ ५७ ॥ तंव प्रकाशला चंड-किरण । राजा स्वअंगें येऊन । केलें मातेचें समाधान । कवणे परी पैं ॥ ५८ ॥ कलीचे ठाईं भूपती । जन्मले आणि पुढें जन्मती । परी नाहीं केली ऐसी ख्याती । कोण्या पुरुषें ॥ ५९ ॥ याची कीर्ते अपार । ही चालेल पूर्वापार । धन्य तुझे पोटीं कुमर । जन्मला ऐसा ॥ १६० ॥ तूं शोक न करी गिरजा । बोलवी पुत्र तुझा दुजा । दृष्ट वार्ता कळतां अनुजा । तोहि आला त्वरेनें ॥६१॥ देखिलें बंधूचें वदन । त्याचे कंठीं मिठी घालून । म्हणे बंधुराया टा-कून । कैसा गेलासी वनांतरीं ॥ ६२ ॥ तुज ऐसा बंधु व्हावया । पितृनें आ-राधिलें सांबराया । तया कां नाहीं आली माया । माझी जोडी तोडिली ॥६३॥ टाकोनि गेलासी मज कोठें । पाहूं मी कवणा वाटे । म्हणऊन वक्षस्थळ बडवी नेटें । बंधूच्या शोकें ॥ ६४ ॥ तुटली बंधुत्वाची जोडी । काळमुखीं घातली उडी । येथें टाकिली आपुली कुडी । मज पाहावया ॥ ६५ ॥ कोणाच्या सं-गती करूं भोजन । तुजवांचुनी सख्या कोण । मज कैसा विसरोन । गेलास कैळासा ॥६६॥ हे एक पुत्र दोघेजण । किंवा दशरथाचे नंदन । श्रीराम जातां वनालागून । भरतहि गेला तपासी ॥ ६७ ॥ बैसला नंदग्रामीं जाऊन । मा-निलें नाहीं मातृवचन । शत्रुघ्नें पादुका ठेवून । राज्य केलें आयुध्येचें ॥६८॥ किंवा पुत्र ते पंडूचे नंदन । वचनीं गोवून दुर्योधन । केलें द्रौपदीचें वस्त्रहरण । सभेमाझारीं ॥६९॥असोनी प्रतापी वीर । सत्वासाठीं धरिला धीर । नाहीं केलें अनउत्तर । बंधूच्या वचनासी ॥ १७० ॥ तैसें हे पुत्र दोघेजण । भूतरायाचे नंदन । सिद्धेश्वराचें वरदान । यालागीं ऐसे पैं ॥ ७१ ॥ दोघे सारिखेच दि-

सवी । जैसे सूर्य आणि उडुगणपती । एक तीव्र एक शितळ असती । तैसे हेहि दोघे पुत्र गा ॥ ७२ ॥ एक प्रतापवंत । एक गुणवंत । तैसे दिधले गिरजाकांत । निजभक्तासी ॥ ७३ ॥ मग पातशाहान बोलावून । केलें जोमाजीचें समाधान । तुझें करीन गा पाळण । व्यर्थ न करी शोक पैं ॥ ७४ ॥ एक्या देशीचें नृपत्व । देता जाला निजामराव । हें घेऊन सादर असावें । माझिया सेवेसी ॥ ७५ ॥ देशमुखीचें दिधलें वतन । हें कुटुंबासी अक्षई अन्न । वंशपरंपरा अनभवून । असावें सुखी ॥ ७६ ॥ मलोजीच्या कलेवराचीं । पुष्पें जालीं आईचीं । माया अघटित सदाशिवाची । भक्तमहिमा वाढविली ॥७७॥ नवल वाटलें अविंधासी । आश्चर्य करितसे मानसीं । हा कोण पुरुष जन्मासी । आला होता न कळे ॥ ७८ ॥ असेल स्वर्गींचा स्वर्गपाळ । किंवा असेल अवतार भूपाळ । कीं असेल हा गण केवळ । कैलासवासीयाचा ॥ ७९ ॥ शिराचीं नव्हतीं पुष्पें जालीं । तीं मांडवगणासी घेऊन आलीं । वार्ता भूतराया कळली । कीं लोपला कीर्ति अर्क ॥ १८० ॥ क्षितीधरतनयेचा कांत मारुनी । सुमित्रासुतें पाडिला रणीं । ऐकतां दशमुख पडे धरणीं । तैसें जालें रायासी ॥८१॥ शरिराचीं गात्रें गळालीं । न रडवे भ्रांति पडिली । विव्हळीत पडिला तये वेळीं । उठविती सावध करुनी ॥ ८२ ॥ लोक धरुनीयां पितयासी । आणिते जाले तयापासीं । पाहून पुत्र अवस्था तैसी । दुःखें फुटलें हृदय ॥८३॥ पुत्रमुख पाहून नयनीं । शरीर टाकिलें पैं धरणीं । लोक म्हणे मजलागुनी । हेच आणिलें भेटावया ॥ ८४ ॥ येथून नेलास कैसा । घेउनी आलीस ऐसा । कैसें केलें जगदीशा । करुणा कां न आली ॥ ८५ ॥ मग म्हणे रे शूळपाणी । पुत्र गेलासी घेउनी । सांगितली तैसी करणी । केली त्वां स्वामियां ॥ ८६ ॥ पुत्रराया रे सुजाणा । आम्हां वृद्धांसी टाकूनि वना । तूंचि गेलासी कैलास-भुवना । माया कां न आली ॥८७॥ तुज ऐसें निधान । कैसें हारपोन । गेलें जहाज बुडोन । एकाएकीं सागरीं ॥ ८८ ॥ कीं राहूनें सूर्य गिळिला । पर्वत शरिरीं पडिला । कीं काळसर्पे भक्षिला । एकाएकीं येउनी ॥ ८९ ॥ तुज ऐसा पुत्र व्हावया । आराधिलें कैलासराया । अंतीं तूं मज टाकुनीयां । कैसा गेलासी ॥ १९० ॥ पाहूं कवणाचें वदन । तुझ्या प्रतापें वोपलें मन । नाहीं निवाले नयन । तुज पाहातां पुत्रराया ॥ ९१ ॥ तूं जालासी विन्मुख । जगीं जालें काळमुख । पाहूं कवणाचें कौतुक । तुज ऐसें बाळका॥९२॥

सिद्धेश्वरामागें ठेविलें शीर । केली सामोग्री तयार । चंदनकाष्ठें मेळवुनी फार । मंदीर निर्मिलें तयासी ॥९३॥ घ्यावया शिरकमलाची भेटी । धाऊन आल्या आंगणा निटी । म्हणति निरविले कोणाचे वोटीं । टाकून गेला स्वामीयां ॥ ९४ ॥ टाकुनि तिघी आंगणा ॥ एकलेच गेला कैलासभुवना । मग मुखीं स्मरल्या श्रीरामराणा । पतिसंगे जावया ॥ ९५ ॥ कलिवर नेले निजधामा । मुख पाहावया पाठविले आम्हा । पतिव्रतधर्माचिया नेमा । आम्ही येतो समागमें ॥ ९६ ॥ सिद्धेश्वरामागें शीर ठेऊन ॥ तिघी स्त्रियानि घेतला अग्न । जाल्या कैलास पावन । भ्रतारा समवेत अक्षयीं ॥ ९७ ॥ जैशी इंद्रजिताचि राणी । पतीचे शिर आणिलें मागोनी । सवेंच तयागमनीं । प्रवर्तली पतिव्रता ॥ ९८ ॥ तया वेळे लंकाभुवनीं । शोक केला दशाननीं । वेळोवेळा शरीरधरणी । टाकीतसे लंकेश ॥ ९९ ॥ तैसा राव करी रुदना । विसरूनिया देहभाना । कां माझा प्राण जाईना । कां ठेविले महेशा ॥ २०० ॥ युद्धीं पडिला अभिमन्य । आग्नकाष्ट घेई अर्जुन । तैसा पिता म्हणे काय वांचून । मजहि घाला आग्नींत ॥ १ ॥ जनलोक मिळोनिया । शांत करीति भूतेशराया । परी दुःखकल्लोळ पितया । तो नावरे जी ॥ २ ॥ मातापिता बंधुसी ॥ दुःख झाले विशेषीं । कृष्ण बुडता काळया-डोहासी । शोक करी गोकुळ ॥ ३ ॥ विदेहि कुमरीच्या कांतपिते । वनीं वधिले श्रावणाते । शोक करिती मातापिते । तैसे जाले रायासी ॥४॥ वना गेला रघुनंदन । दशरथ झुरून पावला मरण । तैसें भूतराया होऊन । स्वल्प काळे निवर्तला ॥ ५ ॥ अवघ्या देवाचाहि देव । जो का स्वामी सदाशिव । निज भक्त म्हणोनि ठाव । भूतराया कैलासी ॥ ६ ॥ अक्षयीं ठेविला चरणापासी । उद्धरिले तया पूर्वजासी । पूर्वजासहित कैलासवासी । केला पावन ॥ ७ ॥ ऐसा शिवभक्तीचा महिमा । पार नेणे विष्णु ब्रह्मां । वेदाचीहि जाली सीमा । परी न वर्णवेचि ॥ ८ ॥ भोलानाथ उमापती । उद्धरिले मूढा अपवित्राप्रती । श्वान भस्मीं लोळतां मुक्ती । कैसि तया दिधली हो ॥९॥ मुशक शिवालयीं तेल खाता । दिपक उजळला तत्वता । हें देखोनि गिरजा कांता । तया घातले विमानीं ॥ २१० ॥ उभा राहोनि पिंडिवर । चांदवा सोडी तस्कर । धन्य भक्तां वाहिलें शरीर । म्हणोनि नेला कैलासी ॥ ११ ॥ शिवरात्री दिनीं उपवासी । सहज घडला पारधीयासी । उचिष्ट बेल शिवासि । सहज घडली

पूजा ॥ १२ हें पाहोन त्रिलोचन । पारधिया आणविलें विमान । केले कैलास पावन । महा भक्त म्हणोनिया ॥ १३ ॥ कैसा दाता शूळपाणी । भक्तजनीं कृपाघनीं । देणें देतां न पाहे मनीं । मागितला वर देतसे ॥ १४ ॥ भस्मासुरा वर देउनी । पार्वती दिल्ही तया लागुनी । मग पस्तावला ध्यानीं । विष्णुस्मरण केलें पैं ॥ १५ ॥ धावोनि आला पुरुषोत्तम । आसुरातें केलें भस्म । ऐसा भोळा सर्वोत्तम । नीळकंठ जगत्गुरु ॥ १६ ॥ भक्तवत्सल पिनाकपाणी । सद्भावें भजतां तयाचें चरणीं । कृपाकटाक्षें पाहातां नयनीं । निज सुख देईल ॥ १७ ॥ अठरा भार वनस्पतीची लेखणी । समुद्रें भरली म्हैसि करुनी । त्याचे गुण लिहितां धरणीं । लिहिले नव जाती ॥ १८ ॥ ऐसा तो उमारमण । निजभक्ता होऊन प्रसन्न । देउनिया आपला प्रियगण । वाढविली कीर्ति ॥ १९ ॥ मळोजीची कीर्ती दिगांतरि । जाली पृथ्विमाझारी । तेणें भूतनाथ पूजिला निर्धारी । ऐसें देणें दिल्हें हें ॥ २२० ॥ एऱ्हवीं तयाच्या प्रतापापुढें । म्लेंछ कायते बापुडे । परी कीर्तिचे व्हावया पवाडे । छळूनिया घेतले ॥ २१ ॥ भक्ताची कीर्ति वाढवावी म्हणोन । भगवंतें केलीं नाना विंदान । कसवटी उतरावे म्हणऊन । छळिले निजभक्ता ॥ २२ ॥ श्रियाळा घरीं नरमांसभोजन । मागोन वधविले बाळकालागुन । सत्वधीर पाहून पंचवदन । नगरी नेली कैलासा ॥ २३ ॥ सिभ्री राजा भक्त निर्धार । पक्षीरूपें जाला गौरिहार । कपोति तुके छेदिले शरीर । मग नेले निजपदा ॥ २४ ॥ मयुरध्वज राजा करवत घालून । कसवटीस आणिला नारायण ॥ मग स्वरूप प्रगट करून । नेला वैकुंठा ॥ २५ ॥ रुक्मांगद राजा एकादशी व्रतनिर्धारी । विक्षेप करावया मोहनी पाठविली सुरवरी । कसवटीस येता परमेश्वरी । नगरी नेली वैकुंठा ॥ २६ ॥ ऐसा भक्तसखा परमेश्वर । छळावया निमित्त कीर्ति वाढविल्या अपार । वेदश्रुतिशास्त्रें पुराणोत्तर । वंद्य केले त्रिभुवना ॥ २७ ॥ मळोजीनें पितृआज्ञा मानुनि । सोसिली अविंधाची जाचणी । आणि सदाशिवाची करणी । कीर्त वाढवावी भक्ताची ॥ २८ ॥ ऐसे असावे सुपुत्र ॥ कीं जयाचे नामीं हरुषे जगत्र । पूर्वजासहित सर्व गोत्र । जेणें नेले मोक्षपदा ॥ २९ ॥ पितृभक्त एक सूर्यवंशी । रामराजा आयुध्यावासि । पितृवचनाच्या नेमासी । पाहा तो कैसा निर्धार ॥ २३० ॥ पाळुन पितृवचन । वना गेला रघुनंदन । चौदा वरुषे सेविलें आरन्य । तो

एक सुपुत्र म्हणावा ॥ ३१ ॥ टाकुनि आयुष्येचि संपत्ति ॥ वना जाता रघुपति । वल्कलें नेसलीं सितासती । श्वसुरवचन पाळोनिया ॥ ३२ ॥ महाभक्त एक श्रावण । पितृभक्तीं वेंचिला प्राण । कीर्तीनें भरिलें त्रिभुवन । जाला वंद्य पुराणा ॥ ३३ ॥ ऐसे सुपुत्र जन्मती । पितृकार्जीं देह वेंचिती । तयाची आज्ञा न भंगिती । धन्य पुत्र तोचि एक ॥ ३४ ॥ पुत्र ते पंडूचे नंदन । पितृ-आज्ञेनें करून यज्ञ । पृथ्विभूपाळ जिंकोन । पिता मोक्षातें पावविला ॥३५॥ तैसाच सुपुत्र शिवें देऊन । केला भक्ताचा मनोरथ पूर्ण । स्वामी त्या विश्वंभरानें । निज भक्त म्हणोनी ॥३६॥ ऐसा भूतनृपतीन । आराधिला उमारमण । समाप्त जालें हें कथन । ऐकावें श्रोते हो ॥ ३७ ॥ श्रीसिद्धनाथा भवभंगा ॥ आनंदवरदा अभंगा । अक्षई मस्तक जडों गा । तुझे पदीं स्वामियां ॥ ३८ ॥ शरिराची कुर्वंडी करून । सांडी सांडी ओंवाळून । हेंचि देई गा वरदान ॥ दिनानाथा कृपाळुवा ॥ ३९ ॥ इति श्रीभूतेश आख्यान । वदविलें शिवकृपेनें । श्रोते होऊन सावधान । रसाळ निरोपण परिसावें ॥ २४० ॥ संपूर्णमस्तु ॥

---

## अध्याय अकरावा.

श्रीपंचवदनाय नमः ॥ जयजयाजी गिरजावरा । जयजयाजी दीनोद्धारा । जयजयाजी भक्त-उद्धारा । पुढें ग्रंथ बोलवी ॥१॥ भावार्थें ऐकतां शिवभक्तकथा । निश्चयें जाला मोक्षपंथा । अन्यथा नाहीं सर्वथा । सर्वथा शिवप्रसादें ॥ २ ॥ शिववेताळाचें वरदान । असे गा तया वंशाकारण । ते सर्वस्वें करिती पाळण । अंकीत आपुलें म्हणोनियां ॥ ३ ॥ भक्त पाळावया कारण । द्वयरूपें उमारमण । प्रकटले स्वयें आपण । भिन्न नाहीं सर्वथा ॥४॥ विघ्न येती कडोविकडीं । कलिकाळाची तोडी बेडी । निज आंगें सांकडें तोडी । ब्रीद आपुलें म्हणोनियां ॥ ५ ॥ पाहा वो भक्तकैवारासाठीं । मच्छकच्छ जाला जगजेठी । दांतावरी धरिली सृष्टी । वराहरूपें होऊनियां ॥ ६ ॥ प्रल्हाद गांजिता पाहोन दृष्टीं । प्रगटला तो कोरडे काष्टीं । नरसिंहरूपें महासंकटीं । भक्त कैसा रक्षिला ॥ ७ ॥ वामनस्वरूप धरून लहान । त्रिपादीं आटिलें त्रिभुवन । भक्त बळी पाताळीं घालून । अक्षयीं जाला द्वारपाळ ॥ ८ ॥ सत्रा वेळां निक्षेत्री करून ।

पृथ्वी दिधली ब्राह्मणा दान । पितृ-अ. ज्ञेनें वधून । भार्गवरूपें टाकिली ॥ ९ ॥ पितृवचनाच्या नेमासी । चौदा . . अरण्यवासी । रामराजा अयोध्येसी । दशमुख वधुनियां आला ॥१०॥ आठवा अवतार श्रीकृष्ण । वसविलें द्वारकापट्टण । भक्तजन पाळून दुष्ट मर्दून । अंतीं गेला निजधामा ॥११॥ बौद्ध कलंकी अवतार । भक्तासाठीं सर्वेश्वर । अनंत स्वरूपें अनंत अवतार । धारिलें दासरक्षणा ॥ १२ ॥ अंबऋषीच्या कैवारा जाण । दशरूप जाला नारायण । विरंची बाळ गांजिलें ह्मणऊन । असुर मर्दून स्थापिला ॥ १३ ॥ चौदा रत्नें गळालीं सागरीं । तेणें इंद्र जाला भिकारी । शरण येतां परमेश्वरीं । सिंधु मंथूनियां काढियेलीं ॥ १४ ॥ भक्त गांजिले पाहोन । साहाय्य जाला मधुसूदन । दुष्ट खळ टाकिले मर्दून । भक्त राज्यीं स्थापिले ॥१५॥ हरीहरस्वरूप धरून । करिती दासाचें पाळण । अगाध कर्तव्यें तुझीं पूर्ण । दीनानाथा परमेश्वरा ॥ १६ ॥ रक्षिला क्षितिधर देखा । स्वर्गीं पाळिलें सुरनायका । विरंची स्थापिला सत्यलोका । वेद देउनी अक्षयीं ॥१७॥ अनंत नामें अनंत । अवतार धारिले भगवंत । परी भक्त पाळावयाचें निमित्त । आला सगुणत्वा १८ ऐसा स्वामी पिनाकपाणी । सर्वदा रक्षी दासालागुनी । घाली कृपेची गवसणी । जे न फाटे कळीकाळा ॥ १९ ॥ मग इंद्रादिक ते किती । तेहि पडती काळाचें आवर्ती । एक शिवपदावांचुनी त्रिजगतीं । अभंग सुख नाहीं ॥२०॥ ऐसा जाणून आनंद । जाला चरणीचा मिलिंद । सर्वदां लागों ह्याचि छंद । एक्या शिवनामाचा ॥ ११ ॥ जन्मविलें तया वंशासी । तरी सेवा घडवी चित्ता ऐसी । सर्वभावें ध्यान पायांसी । न विसंववी ॥ २२ ॥ गोष्ट तरी तुझीच कीर्ती । वाखाणु दें उमापती । पाहाणें तरी तुझीच मूर्ति । नेत्रकमळीं भरू दें ॥ २३ ॥ नाना कुतर्क पांखरें । ध्यानीं उठती एकसरे । हे उडवूनिया निर्धारें । चित्त वोढी आपुलेकडे ॥ २४ ॥ कामक्रोधमदमत्सरीं ॥ पडिलें प्रपंच वेव्हारीं । बुडतो महाभवसागरीं । तारी कोण तुजवांचुनी ॥ २५ ॥ अनंत जन्मींचें पातकें घोळिलें । कामक्रोधें खरकटलें । हें शुद्ध करूनिया वहिलें । लावी आपुल्या भक्ती ॥ २६ ॥ जैसें खळें माखलें वसन । तें शुद्ध धुवट प्रक्षाळून । अंगिकारिती समर्थ जाण । तैसें करी कृपानिधी ॥ २७ ॥ तुझा म्हणवितां दीन । मळलिया तुजचि अभिमान । जळा वेगळा नव्हे मीन । तैसें मन बुडवीं कां ॥ २८ ॥ भ्रमर जेवीं भ्रमे कमळा । कमळणी कदां न

सांडी जळा । कंठीं जडिलें फण ... ने ?। तैसें चरणीं जडी गां ॥ २९ ॥ कांच सूर्यकांत म्हणऊन । वागवी तयरव नामाभिदान । अर्की पडे तयाचा अभिमान । अग्न प्रगटवी तया तेजें ॥ ३० ॥ सूर्य असे गगनोदरीं । कांच राहाटे पृथ्वीमाझारीं । उभा राहून तयाचें समरीं । निश्चळ कैसा हो ॥ ३१ ॥ भानूस हाच अभिमान ॥ माझ्या नामें विकतो जाण । आपुलें तेज तयांत बिंबवून । प्रताप वाढवी तयाचा ॥ ३१ ॥ लोपलिया चंडकीर्ण । मग तयापासाव कैचा अग्न । मित्रास ब्रीदाचा अभिमान । यालागी मोला चढविला॥३३॥ मृत्तिका शरण कस्तुरीसी । तिनें केली आपणां ऐसी । लोहो लागलीया परिसासी । होतें तयाचें सुवर्ण ॥ ३४ ॥ मैलागिरी सुवासें करून । भोंवत्या वृक्षा करी समान । ऐसें समर्थाचे गुण ऐकून । मिठी घातली चरणासी ॥ ३५ ॥ जन्मोजन्मीं तुझी सेवा । मज घडवी सदाशिवा । याजवांचून मनोभावा । इतर मागणें नसेचि ॥ ३६ ॥ जेविं धृवपदातें निश्चळ । तैसें निश्चयासी देइ बळ । ऐसें होऊन कृपाळ । वर वोपी दयार्णवा ॥ ३७ ॥ नीमिशनिमिशाचें अर्ध । तुझे भक्तीं ठेवीं गा सावध । सर्व विषयां तोडून वेध । अभंग दे चरणाचा ॥ ३८ ॥ गोडी लागावी तंव चरणासी । जैसी मधावरील मासी । चातक लक्षी पर्जन्यासी । ऐसा वर वोपी कां ॥ ३९ ॥ पूर्वोपार तुझीच सेवा । पूर्वजें केली महादेवा । माझाहि मनोभावा । मागणें हेचि असे जी ॥ ४० ॥ जळापासून काष्ठ उत्पन्न । तया उदकीं न बुडवी जाण । तयाच्या जहाज नौका होऊन । जना उदकी तारिती ॥ ४१ ॥ जळास पडे हाचि अभिमान । की मजपासाव हें उत्पन्न । म्हणोनि कदा न बुडवी जाण । ब्रीद आपुलें सांभाळी ॥ ४२ ॥ पाहाहो तिळमात्र पाषाण । जाती जळीं बुडोन । परि काष्ठाचा पडे अभिमान । तया कैसा हो ॥ ॥ ४३ ॥ तैसें पूर्वीपासून तुझेच अंकीत । परी दुष्ट पापी भक्तीहीन बहुत । क्रियाभ्रष्ट चांडाळ अति उन्मत्त । परी म्हणवितों तुझा ॥४५॥ समुद्रें अंगीकारिलें वडवानळा । तुम्हीं प्राशिलें हळहळा । तेणें कंठ जाला जी निळा । परी सांडिलेंचि नाहीं ॥ ४४ ॥ ऐसा अंगीकारिया शिरोमणी । तुम्हां स्तवितों करुणावचनीं । त्रैलोक्यनाथा शूळपाणी । न करी अव्हेरु ॥४६॥ चंद्रें अभिलाषिली गुरुकांता । हें श्लाघ्य काय कृपावंता । ऐसें जाणून धरिला माथां । सेवक आला म्हणोनी ॥ ४७ ॥ यालागीं तूं अंगीकारी । ब्रीद आपुलें साच

करी । समर्थाचें लेंकरूं भिकारी । तरी लाज कवणा ॥ ४८॥ त्वां सांडिलीया अभिमान । तरी कवणा लांछन । त्रिभुवनांत लाजिरवाण । होईल कोण सांग पा ॥ ४९ ॥ जरी समर्थाचा कुमर । मूर्ख जाला दुराचार । जन निंदिती सम्रग्र । तरी लाज कवणा ॥ ५० ॥ जरी बाळका लागलें वेड । तरी जननीस काय कोड । देवधर्मप्रयत्न निकड । करुनी आणिती देहावरी ॥ ५१ ॥ ऐसें देहावरी आणोन । तुझ्या पायीं जडवी मन । कृपा करुनी उमारमण । ऐसा वर वोपी कां ॥ ५२ ॥ पुढें वंशपरंपरा । तुझीच भक्ति गिरजावरा । वरदान चालवी दीनोद्धारा । अनंत सुखदायका ॥ ५३ ॥ जयजयाजी भक्तवत्सला । जयजयाजी दीनदयाळा । जयजयाजी पूर्ण कृपाळा । विनंती एक परिसावी ॥ ५४ ॥ अगोचर संकल्प त्वां उद्भविला मनीं । तो पुरवावा स्वामियां कृपें करुनी । कुळासहित मज सेवेलागुनी । अभंग ठाव चरणीं द्यावा ॥ ५५ ॥ अनंद पायीं आनंद । चरणींचा जाला मिलिंद । तुझे चरणीं ठेवी सावध । स्वामी सदाशिवा ॥ ५६ ॥ शिवशिव हाचि उच्चार । चालूं दे अहोरात्र । सदां सर्वदां हाचि मंत्र । हृदयीं बिंबवी ॥ ५७ ॥ श्रोते होऊन सावधान । एकावें हें आख्यान । सांगितलें सविस्तर निरोपण । स्वामी शिवप्रसादें ५८ तुम्हीं न धरावा अनुमान । सत्य असत्य शिव जाण । जें जें वदविलें निरोपण । तें तें येथें लेहविलें ॥ ५९॥ ऐसें शिवाचे जे शिवभक्त । जयाचे पवाडे गर्जत । तुम्ही होऊनि सावचित्त । शिवस्मरणीं असावें ॥६०॥ ऐकतां शिवभक्ताची कथा । तेणें हर्ष उमाकांता । सद्भावेंसी श्रवण करितां । मोक्षपंथ पाईल तो ॥ ६१ ॥ यासी जो करील नित्य पठण । निश्चयात्मक न चळवी मन । तयाचे पुरवील अर्थ पूर्ण । काशीनिवास ॥ ६२ ॥ कदां न पडेल संकटीं । विघ्न नेईल बारा वाटीं । शत्रुत्वें पाहील त्यास निवटी । ऐसा वर असे वो ॥ ६३ ॥ तरी विनवितों तदा वंशाकारण । पूर्वीपासून शिववेताळ वरदान । तुम्हींहीं निर्धार धरून । असावें भक्तीसादर ॥ ६४ ॥ तयासी भजतां तुम्हीं भावार्थी । निश्चय भोगाल सुखसंपत्ती । पुरवील तुमच्या मनोरथासी । अन्यथा नाहीं ॥ ६५ ॥ न भजावें क्षुद्र दैवतासी । भजावें कुळस्वामीसी । सर्वभावें तया चरणाधी । लीन व्हावें ॥ ६६ ॥ हातीं असोनियां हिरा । वेचूं नका अरण्यगारा । पूर्वजें आराधिलें विश्वंभरा । तुम्हांसी जोड केली हो ॥ ६७ ॥ तुम्हीं हीं असावें तयासी शरण । तयासीच पडेल

तुमचा अभिमान । उणें पडतां ब्रीदालांछन । लागेल त्याच्या ॥ ६८ ॥ तन मन धनेसी शरण । चरणीं असावें निमग्न । ऐसा स्वामी पंचवदन । करील पाळण तुमचें ॥ ६९ ॥ वर्तावें सदां सद्बुद्धि । तेणें कदा न पडाल संधी । दूर होतील सर्व उपाधी । तयाचें कृपें ॥ ७० ॥ त्यजूनि दुर्जनाची संगति । असावें उत्तम स्थिति । दुष्ट बुद्धिचिया अंति । भोगाल फळ ॥ ७१ ॥ दुष्ट बुद्धि वर्तलीयान । नाश पावले बहुत जन । देवदानव मुनिजन । भूपति बहुत ॥ ७२ ॥ विराटा घरीं कीचका जाण । भगांकित सहस्रनयन । कळंक लागला चंद्राकारण । तादृष्टी बुद्ध देखतंसां ॥ ७३ ॥ भस्मासूर भस्म होऊन । बंधुसहित दुर्योधन । कुळासहित दशानन । अहंकारें बुडाला ॥ ७४ ॥ भूपाळाचें राज्य बुडोन । लया पावले बहुत जन । मग इतरांचा लेखा कोण । सांगावा तुम्हां ॥ ७५ ॥ स्वधर्मे बहुत वर्तलेती । त्याच्या पुराणांतरीं कीर्ति । हरिश्चंद्र श्रीयाळ कैसे नृपति । ज्याच्या कीर्ति अक्षयीं ७६ संचलीया सुकृताच्या रासी । तरी जन्म गा उत्तम वंशासी । मग कां वर्तावें अधर्मनीतीसी । नरका जावया ॥ ७७ ॥ जन्मोनिया उत्तम वंशासी । करणी कां करावी नीचा ऐसी । बरवे विचारूनिया मानसीं । धर्मनीतीनें वर्तावें ॥ ७८ ॥ जालीया क्रियाभ्रष्ट । मग यदर्थी बुडती स्पष्ट । तंव मोजिती अदृष्ट । देवें केलें ॥ ७९ ॥ कर्मकरितां विचारून । न पाहाती समजून । यालागीं सर्वदां सावधान । ईश्वर-भक्ति सादर ॥ ८० ॥ यालागीं धरावें स्मरण । भूतराया देतां वरदान । बोलिला होता पंचवदन । दुष्ट कर्माचें ॥ ८१ ॥ तया वचनासी भिऊन । असावें तुम्ही सावधान । सर्वभावें कल्याण । करील सांब ॥ ८२ ॥ पाहाहो पंडूचे नंदन । वर्तले धर्मनीतीन । कीर्तीनें भरलें त्रिभुवन । भारतादि पैं ॥ ८३ ॥ शत्रूनें बहुतापरी जाचून । नष्टचर्य भोगिवलें कठीण । परी नाहीं ढळले नेमालागून । धन्य सत्त्वधीर पैं ॥ ८४ ॥ धर्म जातां स्वर्गभुवना । नरकीं देखिलें दुर्योधना । कृपा उपजली कुरुभूषणा । बंधु माझा येथें कीं ॥ ८५ ॥ मज नेती अमरलोकीं । बंधु माझा कुंभपाकीं । येणें काय मेळविलें लौकिकीं । तयाचे कुळीं येउनी ॥ ८६ ॥ उभें करुनी विमाना । बोलता जाला सुरगणा । मज नेतां अमरस्थाना । बंधु माझा रवरवीं ॥ ८७ ॥ काय करूं अमरसुखा । सुयोधना ऐसा बंधु देखा । टाकूनियां ऐसा सखा । न चाले पुढें मी ॥ ८८ ॥ पाहाहो दुष्ट दुर्योधन । पाहोनि धर्माचें वदन । बुडी दिधली रवरवीं जाण ।

वैरी माझा जातो कीं ॥ ८९ ॥ बुडी दिधली बहुत दीन । मग पाहे विचारून । गेला असेल धर्म जाणून । बाहेर काढिलें मुख पैं ॥९०॥ ऐसें देखूनि पंडुनंदन । बाहेर काढिलें तया ओढून । बैसविला शेजारीं जाण । घेऊन गेला निजपदा ॥ ९१ ॥ कीर्ति जाली त्रिभुवनीं । धन्य म्हणती जगत्र जनीं । नाहीं आठविली तया करणी । बंधुपण हें नांव ॥ ९२ ॥ ऐका दुर्जनाचे संगतीन । नर्कांचा सुवास घेतला धर्मान । इंद्राचे संगती जाऊन । चंद्रा कलंक लागला ॥ ९३ ॥ यालागीं पाहून उत्तम संगती । वर्तावें जी गुणवंतीं । तेणें होतसे सत्कीर्ती । ह्या लोकीं कीं ॥ ९४ ॥ नाहीं तरी कित्येक आले गेले । जन्मले आणि मेले । परी नाम घेतो कोण वहिलें । सांगावें त्यांचीं ॥ ९५ ॥ मुक्तमाळासवें तंतु । कंठीं घालिती भाग्यवंतु । सुमनासवें मोल चढतु । सुतास जेविं विशेष ॥९६॥कैसें सूर्यवंशींचे भूपती । एकापेक्षां एकाची कीर्ती । धन्य पुण्य आचरती । जया वर्णिती पुराणें ॥९७॥ प्रताप शूर आगळें पूर्ण । ज्यांनीं राखिलें अमरभुवन । सहाय्य होऊन शक्राकारण । कीर्ति केली विख्यात ॥ ९८ ॥ ऐसे राजे पुण्यपावन । कीर्तिवंत परायण । भक्तिपूर्वक निर्धारी जाणून । उदरा आला रामचंद्र ॥९९॥ ऐसें समर्थ वंशीं जन्मावें । तयाचें सार्थक करावें । नाहीं तरी न म्हणावें । तद्वंशीचे ॥१००॥ हिरा खाणीमाजीं जन्मतो हिरा । कसलीया मोला चढे थोरा । नाहीं तरी तेथें निवती गारा । तैसें परी जाणावें ॥ १ ॥ जैसें सलीलाब्धिपोटीं हाळहाळ । कीं शेषामुखीं विषगरळ । सूर्याची संतती कैसें बाळ । जन्मलीं वो पैं ॥ २ ॥ दीपकाचे पोटीं काजळी । कैसी जन्मती तात्काळीं । तैसें जन्मोन श्रेष्ठकुळीं । अपकीर्त पैं ॥ ३ ॥ यालागीं पाहून पूर्वजस्थिती । आचरावें तेचि रीती । सुकृताचिया अंतीं । जोडिती सत्र फळ ४ जरी प्राप्त जाली लक्ष्मी सधन । तरी वर्तावें नम्रता धरून । देवाब्राह्मणासी भिऊन । अति वंदून असावें ५ पाहाहो परीक्षिती ऐसें निधान । ऋषीशापे पावला तक्षक मरण । सर्प न घालितां तया कंठीं भिऊन । तरी कासया अनर्थ पैं होता ॥ ६ ॥ मोठ्या पुरें वृक्ष उपडून जाती । मधीं लोहाळे वांचती । उदका ऐसेच वाहाती । यालागीं अमर तो ॥ ७ ॥ वाडिलाचि मर्यादा पाळून । तोषवावें तयाचें मन । भंगू नये तयाचें वचन । श्रेष्ठ रीती तें नाम ॥ ८ ॥ समुद्रा सीवेची मर्यादा । टाकिली असे वो सर्वदा । वो नउल्लंघितसे कदां । श्रेष्ठपण म्हणोनियां ॥ ९ ॥ सागराचिये तटीं । कां टाकिली

पर्वतदाटी । मर्यादा ठेविली वोह्ळाकांठीं । तरी कां आज्ञा पाळील तो ॥१०॥ हिरा जन्मतो हिरेखाणीं । यालागीं तयासी जाचणी । सोसिलियां बहु गुणी । मोला चढे विशेष ॥११॥ टांकीचे घाय सोसी पाषाण । यालागीं पावे देव-पण । भंगलियां तया पुसतें कोण । हागती पक्षी काग पैं ॥ १२ ॥ आपलिया शरिरासी झिजवून । दुजया शीतळ करी चंदन । म्हणऊन वंदिती त्रिभुवन । देवादिक ललाटीं ॥१३॥ तेणें आवघें शोभायमान । नाहीं तरी दिसती आब-रोधी जाण । ऐसा तो पावला भूषण । उपकारास्तव पैं ॥ १४ ॥ कैसें पंचान-नाचें बाळ । कदां न सांडी आपली ओळ । व्याघ्र पाहून आजामेळ । भिऊन पळेल काय ॥ १५ ॥ राजहंसा मुक्ताफळ । तो न सेवी इतर फळ । ऐसें स-मर्थे कदाकाळ । मर्यादा आपुली टाकूं नये ॥ १६ ॥ सर्व मानावें अशाश्वत। न जाणूं केव्हां होईल मृत्य । यालागीं पळ वाउगें निमित्य । भजनावांचून जाऊं नेदी ॥ १७ ॥ अभाग्यें भाग्याचीं आभाळ । येतीं जातीं आपुल्या काळ । परी धृवपद अचळ । चळ नाहीं सर्वथा ॥ १८ ॥ ऐसे उमारमणाचे चरण । अभंग असे अक्षई जाण । तुम्हींही सर्वभावें लीन । व्हावें तया स्वामीसी ॥ १९ ॥ जैसें धनलोभीयाचें धन । तयापाशीं त्याचें मन । जेवीं मातेचिये ध्यान । तान्हयापासी पैं ॥ २० ॥ घारी फिरे दिगांतरीं । झेंप घाली बाळकावरी । वानर हिंडवी वृक्षावरी । पिल्लीं उदरीं धरूनियां ॥ २१ ॥ मेघ वोळून गर्जे गगनीं । ऐकतां मयोर करी ध्वनी । नृत्य करी हर्षेकरुनी । तैसा भक्तीस आल्हाद ॥२२॥ चकोर हर्षे चंद्रकळेसी । चातक लक्षी पर्जन्यासी । तैसा निर्धार धरुनी मानसीं । शिवभक्तीस सादर ॥ २३ ॥ सादर जाले इंद्र-चंद्र । सुर ब्रह्मामुनि राजेंद्र । नागनाथ तो भोगीन्द्र । अक्षई पद पावले॥२४॥ तुम्ही सत्त्वांशीचे म्हणऊन । यालागीं निरोपिलीं अमृतवचन । नाहीं तरी मुक्ताफळ अर्पून । कायजी वायसा ॥ २५ ॥ हिरा पाहुनीयां सद्गुणी । तया जडती कोंदणीं । नाहीं तरी काय गारा रोउनी । सुवर्णांत ॥ २६ ॥ पंडित पाहून व्युत्पन्न । यालागीं अर्पिती बहुत धन । नाहीं तरी काय मूर्खा देऊन । करील सार्थक ॥२७॥ सुवासीक सीतळ चंदन । यालागीं अंगिकारिती जन । काय दुजया काष्टा घांसून । तरी कां करील सीतळ पैं ॥२८॥ सागरीचे सिं-पले पाहून । वर्षाव करिती स्वातीचा घन। काय ओढियाच्या सिंपल्या पडोन । तेथें काय होतीं मुक्ताफळें ॥२९॥ ऐसा हा बहुत अर्थ । चित्तीं धरावा याचा

स्वार्थ । मूढामुखीं हा ग्रंथ । बोलविला सिद्धनाथें ॥ ३० ॥ ही नौका निर्मून । तरावयां तुम्हां लागून । भावभक्ति याजवर बैसोन । पार व्हावें पैलथडी ॥ ३१ ॥ कडवट लागलीं जरी हीं वचन । परी पिऊन अंतरीं ध्यावीं घन । कदां न बाधी हें भोजन । सुखसमाधीं निजाल ॥ ३२ ॥ हें वचन अमृतनिर्धार । पिउनी व्हावें जी अमर । कैलासवासी निरंतर । अक्षई ठाव शिवापासीं ॥ ३३ ॥ विषयें भजा कैलासनायका । परस्त्री विषय करूं नका । तेणें पावले बहुत धका । श्रेष्ठ श्रेष्ठ पैं ॥ ३४ ॥ मुनिजन संद उपसंद । पुरुरव्यादि नारद । मोहनीस भुलोनि जाला वध । समुद्रमंथनीं असुरांचया ॥ ३५ ॥ इंद्र ब्रह्मादिक भुलोन । तेही पावले निखुर पतन । मग इतरांचा तो पाड कोण । यालागीं असा सावध ॥ ३६ ॥ न प्रवर्तावें चाढी लागोन । तयाचें असे गा बहुत दूषण । चंद्रसूर्या लागतें ग्रहण । केवढें पातक पाहा त्याचें ॥ ३७ ॥ उदंड पुण्यें आचरती । हीं पातकें धरिलीं चित्तीं । तरी सर्वही पुण्यें विलया जातीं । नाहीं राखली पथ म्हणोनी ॥ ३८ ॥ औषध खावें चमत्कारी । तया पथ असे वो निर्धारी । तया वावडें भक्षिल्या अंतरीं । तंव होय शरीरनाश ॥ ३९ ॥ तैसीं बहुत केलीं तपसाधन । देवपूजा संध्यास्नान । दानधर्मयागहवन । तीर्थें हीं केलीं अपार ॥ ४० ॥ परी राखावी जी पथ । निंदा दोष बहुत अर्थ । सर्व सांडुनी धरावा स्वार्थ । एक्या शिवनामाचा ॥ ४१ ॥ नृपाचिया पुत्रालागुनी । पुरोहित कथिती बहुत वचनीं । रंकाचिया कुमरालागुनी । सांगितलें काय सार्थक ॥ ४२ ॥ पांडवाचा पूर्वज नहुष जाण । तयानें करून बहुत यज्ञ । जाला इंद्रपद पावन । परी नाहीं चालिला धर्मनीती ॥ ४३ ॥ आपण बैसोन सुखासनीं । ऋषी जुंपिले तयालागुनी । आरा टोंचुनी करी जाचणी । ऋषीला त्वरें चालावया ॥ ४४ ॥ गेली पुण्यसामुग्री सरोनी । ऋषीनें शापिलें क्रोधें वचनीं । भोगूं लागला सर्पयोनी । उन्मत्तपणें तो नृप ॥४५॥ तयाच्याच वंशीचा ययाती जाण । तेणेंही केलें तैसेंच पुण्य । तोही पावला अमरस्थान । परिणामीं पडे पतन तयासी ॥ ४६ ॥ असत्य साक्ष न वदे वचन । ब्रह्माविष्णु अहंमती भुलून । भैरव जाला तेव्हां उत्पन्न । तेणें उभयतां निरोपिलें ॥ ४७ ॥ विष्णूस वदला वचन । तुवां पाताळीं जाऊन । यावें शिवपादुका पाहून । पाहिलीयां श्रेष्ठ तूं ॥ ४८ ॥ विरंचीशी वदे वचन । त्वां जावें स्वर्गभुवन । यावा शिवाचा मुगुट पाहून । वधे तूं

श्रेष्ठ पैं ॥ ४९ ॥ विरंचि गेला स्वर्गभुवना । अंत न लागे मुगुटाचा जाणा । मग माघारी फिरला करी कल्पना । आला गायित्रिपासी ॥ ५० ॥ गाई केकती तया स्थानीं । तया विरंचि बोले वचनीं । असत्य साक्ष द्यावया लागोनी । चालावें मज सांगातें ॥ ५१ घेरुनि आला भैरवापासी । असत्य वदता न भिई मानसीं । पाहून आलों शीवमुगुटासी । साक्ष केकती कामधेनु ॥ ५२ ॥ भैरव वदे तयासी वचन । तव ते म्हणति देखिला यान । असत्य साक्ष ऐकतां पूर्ण । कोप आला काळभैरवा ॥ ५३ ॥ असत्य साक्ष तुह्मीं देतां । विष्टा भक्षी तुह्मीं उभयता । नखें जाला शीर खुडिता । असत्य वदतां विधीचें ॥ ५४ ॥ विष्णु पाताळास जाऊन । तया भेटला पाताळगण । तेणें तयाचि भ्रांति फेडून । हृदयीं पाहिल्या पादुका ॥ ५५ ॥ फिरोनि माघारी येऊन । भैरवा वदला सत्य वचन । परि ब्रह्मकल्प जाला म्हणऊन । धाऊन आला शंकर ॥ ५६ ॥ तयानें उठविलें विरंचिलागुन । ब्रह्मयानें धरिलें शीवचरण । मग करूं लागला स्तवन । भ्रांति फिटली तयाची ॥ ५७ ॥ शीवें होउन कृपावंतीं । पदीं स्थापिला सावित्रिपती । पाहा हो असत्य साक्षी अंति । केवढा जाला अनर्थ ॥ ५८ ॥ अनंत ब्रह्मांडें व्यापक जाण । चराचर शीवची पूर्ण । सर्व अर्थे सावधान । शीवभजनीं असावें ॥ ५९ ॥ पूर्वज ऐसे प्रतापकीर्ति । स्वामी वेताळ गिरजापति । धन्य सुकृत आचरलेती । कीं या ठाईं जन्म ॥१६०॥ तरी निवेदिलीं हीं उत्तरें । चित्तीं धरुनीयां निर्धारें । वर्तणूक करावी साचारें । तरी व्हाल पैलथडी ॥ ६१ ॥ वंशीं होतील सुपुत्र । मानवेल तुम्हा जगत्र । संतोषेल स्वामी त्रिनेत्र । अक्षयीं रक्षील तुम्हांते ॥ ६२ ॥ इतरही केल्या श्रवण । तेहि होतील गा पावन । परि निर्धार धरिलीया जाण । नाहिं तरि शब्द काय या ग्रंथा ॥ ६३ ॥ प्रत्यक्ष दिसतो सूर्यनारायण । तयासी कित्येक न करीती नमन । माता पीतृ दैवता सांडून । क्षुद्र दैवते धुंडिती ॥ ६४ ॥ यापरी जनाप्रति । पडिली असे थोर भ्रांति । पाहिलीया सावध चित्तीं । सन्निध असे परमेश्वर ॥ ६५ ॥ जाऊन बैसति गिरीकपाटीं । धांवताती द्वादश वाटी । करुनी साधनाच्या निकटी । नाना उपाये कैसे हो ॥ ६६ ॥ पाहातां उलट्या नयनीं । जवळ असे शूळपाणी । करूं नका व्यर्थ साधनीं । अंतर दृष्टि विलोका ॥६७॥ धरुनी भावार्थ निकटी । भजावा तो जगजेठी । निर्धार पाहातां कृपादृष्टी ।

वर्षला तो घन जेवीं ॥ ६८ ॥ ऐसा स्वामी त्रिलोचन। प्रत्यक्ष आनंदाचा घन। त्रैलोक्यनाथ उमारमण। त्यासी शरण असावें ॥६९॥ ही नव्हे कवीची दंतकथा। ऐकिली असेल संकलीत वार्ता। म्हणऊनि सविस्तर निरोपितां। जाला तो सिद्धनाथ ॥ ७० ॥ मांडवगण क्षेत्र पुण्यपावन। असती लक्ष्मीनारायण। सन्मुख तयाच्या तीर्थ जाण। तेथें उद्धरला नृप तो ॥७१॥ शापास्तव नृप जाण। पावला वानराजन्म। तयासी सहज घडतां स्नान। पावला दिव्य शरीर ॥ ७२ ॥ श्रीराम होते वननासीं। तें स्थापिलें रामेश्वरासी। पूजिलीया तया लिंगासी। होती पावन ॥ ७३ ॥ वामभागीं असे पैं माळ। तया स्थानीं द्वय वेताळ। ते महाकाळाचे काळ। रक्षिती निजभक्तां ॥ ७४ ॥ प्रत्यक्ष शिवनेत्रींचा वन्ही। तेच प्रगटले स्वरूपें दोन्ही। कल्पकाळाचे अवसानीं। भस्म करिती ब्रह्मांडा ॥ ७५ ॥ घेईं गा तयांचें दर्शन। ते रुद्राचे अंश जाण। सर्व भूतांचे स्वामी होऊन। सर्वभूतीं तेच पैं ॥७६॥ नंदिचिया संगमामाझारीं। गुंफा निर्मूनियां ऋषीश्वरीं। मांडव्यें बैसला असे विचारी। भक्तीलागीं शिवाच्या ॥७७॥ पाहाहो कैसा भक्तिनिधान। तारावया जनाकारण। घेऊन आला त्रिलोचन। जो कां काशीनिवासी ॥७८॥ दरिद्री पापी पातकी अपार। तया न घडे विश्वेश्वर। करूनियां मांडव्यें उपकार। विश्वनाथ आणिला ॥७९॥ कंठीं अक्षयीं झळझळ। भागिरथी निर्मळ। शुद्ध करी जाण सकळ। उदक तिचें प्राशितां ॥ ८० ॥ गणपति चंडी नारायण। अमृतकुंडीं भैरव जाण। सन्मुख नंदी शोभायमान। महिमा येथींचा अगम्य ॥८१॥ श्रावण वद्य तृतीयेसी। पर्व सोमवार दिवसीं। चतुर्थ प्रहरीं सायानिसीं। समाप्त जाला हा ग्रंथ ॥ ८२ ॥ ग्रंथरूपें सागर जाण। दृष्टांत परिकर जैसीं रत्न। उद्धवून विश्वेश्वरान। लिहविलें या ठायीं ॥ ८३ ॥ विर्सीं चरित्तां अकरावा। प्राप्त व्हाल सर्व भावा। अक्षयीं देईल विसांवा। कैलासनाथ निजपदीं ॥८४॥ इति श्री भूतेश आख्यान। वदविलें शिवें कृपेन। हा ग्रंथ पुण्यपावन। कथानक समाप्त ॥ १८५ ॥ अध्याय ॥ ११ ॥

अजिंक्य वीर मराठा

# मलोजीराव यादव

यांच्या

## घराण्याचा प्रतापशाली इतिहास.

कात्राबाद मांडवगण येथील प्रसिद्ध यादव देशमुख यांच्या घराण्यांतील जुन्या पुराण्या कागदपत्रावरून हा इतिहास त्यांच्याच घराण्यांतील पुरुषानें संकलित केला असून तो आम्ही संपादन करून संशोधन केला आहे. या इतिहासापासून मराठा जातीस पुष्कळ बोध होण्यासारखा असून, मराठ्यांचें शरीरसंबंध, चालीरीति, नीति, न्याय, शौर्य इत्यादि विषयीं पूर्वकालीन पद्धति कशी होती व हल्लीं कशी आहे. याची जाणीव सहज होणारी आहे. याचे हस्तलिखित ५००।६०० पृष्ठांचे दोन भाग आहेत. हे दोन्ही भाग पुस्तक रूपानें प्रकाशित करण्यास फारच खर्च होणारा असून ग्रंथांस खर्च भागण्यापुरतें वाचकहि मिळणें सांप्रत दुरापास्त दिसतें. म्हणून आम्ही हा ग्रंथ राष्ट्रीय मराठा पाक्षिकांतून येत्या आषाढापासून थोडथोडा देण्याचा विचार करणार आहोंत.

विषय:—वर्णविचार—वंशविचार—यादववंश—१. चंद्रावट ऊर्फ चांदवड येथील सिंघन यादवांचा वंश मूळपुरुष दृढप्रहार—सन ७९९ ते ११९५. देवगड होयसाळ यादव ११०१ ते १३१८. हरिश्चंद्रगड शाखेचा वृत्तांत—मांडवगणशाखेची वंशावळी—भूतोजीराव १४८८. मलोजीराव—जोमाजीराव व नरसिंगराव १४८९—१५५१ परसोजीराव १५५१—१५८१. व्यंकटराव १५८१—१६०२. कान्होजीराव १६३७—१६५८. चांदजीराव ऊर्फ चंद्रसेन भूपतीराव १६५८—१६८३. खंडोजीराव १६८३—१७००. चांदजीराव दुसरा १७००—१७१९. खंडोजीराव दुसरा १७१९—१७३१. रामचंद्रराव, दादजीराव, माधवराव १७३१—१७६१. संताजीराव व परसेसिंगराव १७६१—१७७६. खंडेराव १७७६—१८१९. चंद्रसेन ऊर्फ बळवंतराव १८२०—१८८२. कृष्णराव १८८२—१८८३. गोविंदराव १८८३ ते १९२५.

संपादक—त्र्यंबक हरी आवटे, मालक,

इंदिरा प्रेस, पुणें सिटी.